शनिवार । २५ जून १९७७

७५ पैसे

# माणूस

अशा या बाजारात एक माणूस असा आला की तो विक्रीयोग्य होता पण विकाऊ नव्हता. तो म्हणजे अलाहाबादचे न्यायमूर्ती सिन्हा. त्यांना पाच लाख रुपये देऊ केले, पण त्यांनी निकाल बदलला नाही. त्यामुळे सगळा बाजार अस्थिर झाला. दलालांची घबराट उडाली. खरेदीदार संतप्त झाले. ज्याला बाजारी घबराट म्हणतात ती उसळली. त्याला आपण नाव दिले आणीबाणी. —चक्रमचक्री

## ‘तरी आपण छत्तीसगड भागात जाऊन हे कार्य करावे’.... —श्री. गुरुजी

वाढत असलेला चांदा येथील कात्रे यांचा ‘भारतीय कुष्ठ निवारक संघ’....

## डॉ. बाबा आढाव यांना अनावृत्त पत्र

## साप्ताहिक माणूस

**वर्ष सतरावे–अंक चौथा**

**२५ जून १९७७**

**मूल्य पंचाहत्तर पैसे**



संपादक
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ निर्मला पुरंदरे
□
वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**
□
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही
□
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले
□
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
□
दूरध्वनी ४३४५९
□


# चक्रम्‌चक्री ( १७ )

दीर्घस्मृती विश्वनाथ

# दि जजमेंट

ही तात्काल इतिहासाची अमेरिकन टूम आपल्याकडेही आली वर का.

कशावरून म्हणता अस ?

पहा ना, अलीकडे आपल्याकडे निघालेली इग्रजी मराठी पुस्तक. एखादी घटना घडली की, ताबडतोब वर्तमानपत्राची कात्रण जोडून पुस्तक तयार केली जातात 'संजयची चाडाळचौकडी', 'इंदिरा गाधीची कारस्थाने', 'जोशी अभ्यकर हत्याकांड', 'एन्टेबी' ही मराठी पुस्तक पहा. यात काही नवी माहिती मिळते अस नाही सगळ्या माहीत असलेल्या गोष्टीच जरा खळबळजनक भाषेत लिहून टाकलेल्या असतात; त्याची आकर्षक जाहिरात करतात, किंमतीही तशा किरकोळच असतात थोडक्या काळात त्याचा बऱ्यापैकी खप होतो लेखक–प्रकाशकाना चार पैसे मिळतात तस त्यात वाईट काही नाही तापल्या तव्यावर पोळी भाजून घेण्यातलाच प्रकार आहे झाल

अमेरिकेत अशी पुस्तक फार मोठ्या प्रमाणावर निघतात, अस म्हणता का ?

तर. अमेरिकेत काळ आपल्याकडच्यापेक्षा अधिक वेगाने धावत असतो. आज झालेल्या महत्त्वाच्या गोष्टीविषयी पाच–पचवीस वर्षांनी कोणाला आस्था वाटेलच अशी खात्री नसते. त्यामुळे घटना ताजी आहे तोवर लोक आपले चुरचुरीत पुस्तक लिहून मोकळे होतात. आता निक्सनने राजिनामा दिला त्याला जेमतेम अडीच वर्षं होताहेत, पण इतक्यातच चागली दहा बारा पुस्तक निघून त्याचा लाखावारी खपही झाला आहे.

पण घटनेशी संबधित व्यक्तीने आपल्या आठवणी लिहिल्या तर त्या घटनेनतर थोड्या काळातच लिहिलेल्या असणार. चर्चिल आणि लॉइड जॉर्ज यानी महायुद्धाच्या आठवणी अशा लगेचच लिहिल्या.

चर्चिलने महायुद्धाच्या आठवणी महायुद्धे सपल्यानतर लगेचच लिहायला घेतल्या हे खर, पण लॉइड जॉर्जने मात्र चागला १२–१३ वर्षं दम खाल्ला, पण मी आठवणीना तात्काळ इतिहास अस नाव देत नाही मला अभिप्रेत आहेत ते खरेखुरे इतिहास म्हणजे, उदाहरणार्थ केनेडीच्या खुनानतर केनेडीचे सहाय्यक सोरेन्सेन आणि श्लेझिंगर यानी केनेडी–राजवटीचे इतिहास लिहिले; मँचेस्टर नावाचा एक पत्रकार अमेरिकेतील प्रत्येक अध्यक्षीय निवडणुकीनतर 'मेकिंग ऑफ दि प्रेसिडेंट' या नावाचे पुस्तक लिहीत असतो, किंवा विसाव्या शतकातील दुसऱ्या दशकाचा इतिहास सागणारी 'ओन्ली यस्टर्डे' आणि 'सिन्स यस्टरडे' ही दोन पुस्तक, अशाना मी तात्काळ–इतिहास अस नाव देतो

मग हे तात्काळ–इतिहास तुम्ही एरवीच्या इतिहासापासून निराळे कसे काढणार ?

पहिला आणि ढोबळ फरक म्हणजे इतिहाससहितेचा काळ आणि इतिहासघटनेचा काळ यातील अतर, तात्काल–इतिहास हा घटनेनतर लगोलग लिहिला जात असल्याने घटनेच्या सर्व परिणामाची कल्पना येऊ शकत नाही त्यामुळे घटनेतील सर्व घटकाच्या महत्त्वाचा अदाजही लागू शकत नाही. परिणामी तात्काल–इतिहास हा तोल गेलेला इतिहास होण्याचाही सभव असतो. आज आपण आणीबाणीच्या काळातल्या संजयच्या वर्तणुकीला जितके महत्त्व देतो तितके महत्त्व पचवीस वर्षानतर आणीबाणीचा इतिहास लिहिणारा माणूस देईलच असे नाही दुसरा मुद्दा असा की, घटना नुकतीच होऊन गेलेली असल्याने लेखक त्या घटनेत गुतल्यासारखा होतो वर्णिलेला प्रसग लेखकाच्या अवतीभवती घडलेला असल्याने

त्याने त्या प्रसंगात कळत न कळत कोणती तरी भूमिका पत्करलेली असते. साहजिकच त्या भूमिकेची सावली त्याने लिहिलेल्या इतिहासात डोकावल्याखेरीज राहात नाही. आपल्या न. र. फाटकानी रानडे, टिळक आणि गोखले याची चरित्रे लिहिली. ती प्रत्यक्षात जरी या तीनही व्यक्तीच्या मृत्यूनतर बऱ्याच वर्षांनी लिहिलेली असली तरी त्या चरित्रातील घटनात फाटक गुतून राहिले आहेत हे जाणवल्याखेरीज राहात नाही. तिसरे म्हणजे आपण आजवर ज्या प्रकारचे इतिहास वाचीत आलो त्यात तपशिलांचा अभाव असे. अमक्या दिवशी उष्णतामान किती होतं, कोणी कोणते कपडे घातले होते, खोलीतल सामान कस लावल होत हे इतिहासाच्या दृष्टीने बहुधा मृत तपशील असतात; परंतु तात्काल-इतिहासात असे तपशील मुद्दाम दिलेले असतात त्यामुळे लेखकाचा वर्णित घटनेशी अगर प्रसगाशी गाढ परिचय आहे असा ग्रह होतो, खेरीज एकूण पुस्तकाला अनौपचारिक गप्पागोष्टीचे स्वरूप येते. उदाहरणार्थ, 'सिन्स यस्टरडे' या पुस्तकात लेखकाने २९ साली अमेरिकन शेअरबाजार कोसळला त्या दिवशी ठिकठिकाणी किती उष्णतामान होते ते दिल आहे, तर मँचेस्टरने केनेडीच्या निवडणुकीचा इतिहास लिहिताना केनेडीने विमानात काय खाल्ल हे तपशीलवार सागितल आहे. एकदरीत तात्कल–इतिहासात घटित प्रसंगाच परिशीलन आणि चिंतन करण्यापेक्षा चुरचुरीत आणि जिवत वर्णन करण्यावर जास्त भर असतो बोध काही घ्यायचा असेल तर तो वाचकाने स्वत पुरता करून घ्यावा.

बोध आणि चिंतन सोडा हो, त्याची काही फारशी मातब्बरी आज उरली नाही, पण हे तात्काळ–इतिहास वाचनीय, खमग आणि सारी घटना तपशीलवारपणे डोळ्यापुढे उभे करणारे असतात, हे तर मान्य आहे तुम्हाला?

ते तर मी सुरुवातीलाच सागून टाकलय. त्यातून काही विषय असे असतात की ते तात्काल–इतिहासाच्या तत्रात अगदी समर्पक बसतात आणीबाणीचाच विषय घ्या. तात्काल–इतिहासासाठी तो अगदी योग्य विषय आहे.

### आणीबाणीचा इतिहास

ते कसे काय ?

आणीबाणी ही नुकतीच होऊन गेलेली घटना आहे आणि प्रत्येक माणसाचा आणीबाणीशी सबध आलेला आहे दुसरे असे की, आणीबाणीत घडलेल्या अनेक गोष्टी अजून उजेडात आल्या नसल्याने फार मोठे कुतूहल लोकात आहे याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्याप्रमाणे चित्रपटातील नट–नट्याच्या खाजगी जीवनात डोकावण्याची सामान्य माणसाला उत्सुकता असते त्याचप्रमाणे राजकारणी आणि अधिकारी–वर्गाच्या वर्तनाविषयी आपल्याला कुतूहल वाटते. त्यातून हे वर्तन संशयास्पद असेल तर प्रत्येकाला एक विकृत समाधान वाटते. आणीबाणीत सर्वच सत्तारूढ व्यक्तीचे वर्तन मलिन झाले होते. त्यामुळे या काळात हे अधिकारीवर्ग कसे वागले हे कळण्याची तीव्र इच्छा लोकाना आहे. या सर्व अपेक्षा पूर्ण करणारा आणीबाणीचा एक तात्काल–इतिहास कुलदीप नायर यांनी 'दि जज्मेट' या पुस्तकात लिहिला आहे.

वाचलं वाटत तुम्ही ते पुस्तक ?

अहो, त्या दोनशे पानी पुस्तकाची किमत ३० रु. आहे! त्याचे मराठी भाषातरही लवकरच बाजारात येणार आहे. ते मात्र १७ रुपये किमतीत. कदाचित् ते समग्र भाषातर नसेल. मला मात्र मूळ इग्रजी पुस्तक नुकतं वाचायला मिळाल.

काय नवीन माहिती आहे त्या पुस्तकात?

आणीबाणीविषयी पहिला कुतूहलाचा भाग म्हणजे ही कल्पना इदिराबाईंच्या मनात केव्हा आली ? नायरनी या पुस्तकात म्हटलय् की, बासष्ट साली चीनच्या आक्रमणानतर बाह्य आक्रमणविरोधी आणीबाणी पुकारण्यात आली त्याच वेळी अतर्गत आणीबाणी पुकारावी अशी कृष्ण मेनन यानी नेहरूना सूचना केली होती, पण अतर्गत आणीबाणी लोकशाही व्यवहाराला धोका देणारी आहे असे सागून नेहरूंनी ती सूचना धुडकावून लावली. ७५ च्या जानेवारीत जयप्रकाशाना पकडण्याची आणि संघावर बंदी घालण्याची योजना तयार करण्यात आली, पण मोठ्या प्रमाणावर विरोधी नेत्याची धरपकड करावी आणि वृत्तपत्रावर सेन्सॉरशिप लादावी ही कल्पना १५ जून ७५ नतर सजय गाधीच्या मनात आली त्यासाठी आणीबाणी पुकारावी ही कल्पना त्याची नव्हे. सिद्धार्थशकर रे यानी संजयच्या योजनेला आणीबाणीचे चिलखत पुरविले.

बाईंची निवडणूक कोर्टाने रद्द ठरविली याचा आणीबाणीशी काय सबध आहे ?

१२ जूनला बाईंची निवडणूक अलाहाबाद हायकोर्टाने रद्द केली आणि विरोधी पक्ष आक्रमक बनले. त्याना पायबंद घालण्यासाठी संजयने ही योजना आखली. सुप्रीम कोर्टाचे सुट्टीतील जज्ज कृष्ण अय्यर याच्यापुढे हायकोर्टाच्या निकालाला स्थगिति देण्याचा प्रस्ताव होता. त्याचा निकाल लागल्यावर ही योजना अमलात आणावी असे ठरले. २३ जूनला अय्यरसाहेबानी निकाल दिला निकालात बाईंनी पतप्रधान राहण्यास हरकत नाही असविनाकारणच –स्पष्ट म्हटले होत पण त्याहून वैशिष्टयपूर्ण वाक्य निकालपत्रात होते ते असे की, जुलमी कायदे कायदेमडळाने रद्द केले नाहीत तोपर्यंत कोर्टाला मानावेच लागतात. याचा अर्थ उघड होता की, त्या वेळी असलेल्या निवडणूक कायद्याने बाईंची निवड वैध ठरणे शक्य नव्हते. या निकालाने जगजीवनबाबूनी बाईंविरुद्ध कॉंग्रेसमध्ये उभे करायचे ठरवलेले बड विरून गेले २४ जूनला विरोधीपक्षाची दिल्लीत सभा झाली त्यात जयप्रकाशानी 'पोलिसानी जुलमी हुकूम मानू नयेत ' असे सागितले २५ च्या रात्री राष्ट्रपतीनी आणीबाणीच्या हुकुमावर सही केली.

आणीबाणीच्या शेवटाविषयी, मुख्यत. निवडणूक घेण्याच्या निर्णय'विषयी, काही माहिती आहे का या पुस्तकात ?

निवडणुका जिंकण्याची बाईंना पूर्ण खात्री होती. गुप्तहेरखात्याच्या पहिल्या अहवालात कॉंग्रेसला ३५० आणि दुसऱ्या अहवालात कॉंग्रेसला ३२० जागा मिळतील असे म्हटले होते. दिल्लीच्या इन्स्टिटयूट ऑफ पॉलिसी रीसर्च या सस्थेच्या अभ्यासपत्रात बाईंची लोकप्रियता सध्या शिगेला पोचली आहे असा अदाज व्यक्तविला गेला तेव्हा बाईंनी ठरविल की, संजयला उघडपणे अधिकारावर आणण्यासाठी निवडणुका घ्यायला ही वेळ चागली आहे. खरे म्हणजे सजय, बन्सीलाल आणि कॉंग्रेस खासदार या सगळ्याचा निवडणुका घेण्याला विरोध होता. बाईंचा निवडणुका जिंकण्याचा विश्वास इतका भक्कम होता की अनेक जागाचे निकाल जाहीर होऊन कॉंग्रेस हरत आहे हे

कळून चुकले असताही कॉंग्रेसला २२० – २४० जागा मिळतील आणि विरोधी पक्षाच्या २० – २५ खासदारांना विकत घेऊन आपण पुन पंतप्रधान बनू असं बाईंना वाटत होते.

## चघळण्याजोगे चुटके

बरं, या पुस्तकात गॉसिप–पॉइंट्स काही आहेत की नाही ?

म्हणजे सुखवस्तू लोकाना चहा पिता-पिता चघळता यावेत असे चुटके भरपूर आहेत. अहो, पुस्तकाचा खप ज्यावर अवलंबून त्या गोष्टी दिल्याच आहेत.

मग सागा दोन–चार.

एक प्रकाशचंद्र सेठीची हकीकत आहे. गुजरायेतले बाबुभाई पटेलाचे सरकार पाडल्यानंतर बाईंनी सेठींना गुजरायेतली परिस्थिती पहाण्यासाठी धाडले. तिथे एका सभेत ते इग्रजीत व्याख्यान देऊ लागले, तेव्हा एका मुसलमान कामगाराने त्यानी हिंदीतून बोलावे अशी सूचना केली. सेठीजी एकदम भडकले. 'पकडा त्याला ! माझा अपमान करतो !' असे ओरडत व्यासपीठावरून खाली उतरले. अहमदाबादच्या महापौरानी त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यानी महापौराना ढकलून दिले. नंतर हितेंद्र देसाई सेठीच्या मोटारीत बसू लागले तेव्हाही सेठींनी त्यांना हाकलून दिले.

दुसरा किस्सा आहे ग्यानी झैलसिंग याचा. एकदा विमानतळावर संजयची पायतणे हरवली. तेव्हा एखाद्या हुजऱ्याप्रमाणे ग्यानीजी पायतण शोधायला धावले.

मुंबईला नौदलाची एक मेजवानी होती. तिला संजय आणि बन्सीलाल आले होते. संजयला प्रत्यक्ष अधिकार काहीच नसल्यामुळे मुख्य टेबलावर त्याच्यासाठी जागा ठेवली नव्हती. त्याचा बन्सीलालला राग आला आणि नौदलप्रमुख कोहली याना त्याने शिवीगाळ केली. कोहलींनी ताबडतोब राजिनामा देण्याची तयारी दाखवली. तेव्हा बन्सीलाल चपापला.

आणखी एक चुटका आहे चव्हाण आणि जगजीवनराम याच्याविषयी २६ जून ७५ ला या दोघाना भेटण्याचा प्रयत्न नायरनी केला. चव्हाणानी नायरची भेटच घेतली नाही. 'त्यांना तसे धैर्य झाले नाही' असे नायर म्हणतात. बाबूजींनी भेट घेतली. ते म्हणाले की, 'मलाही अटक होण्याचा संभव आहे.' त्यांना असा संशय येत होता की, आपल्या टेलिफोनच्या तोंडात खोलीतील भाषण टेप करण्याचे यंत्र बसवले आहे.

या चव्हाण–जगजीवनरामाच्या भूमिकेविषयी काय म्हटलंय् हो ?'

चव्हाणाकडे नायरनी फारसे लक्ष दिलेले नाही आपले नशीब बाईंच्या पदराला बांधलेले आहे अशी खूणगाठ चव्हाणाची होती. बाईंविरुद्ध भूमिका घ्यावी असा त्यानी कधी प्रयत्नही केला नाही. शंकरराव चव्हाण संजयच्या प्रभावळीतले होते असेही लेखकाने स्पष्ट म्हटलय. यशवंतरावजींना विरोधी पक्षाकडेही फारसा भाव नव्हता.

जगजीवनरामांचे असे स्पष्ट मत होते की, हायकोर्टाच्या निकालानतर बाईंनी राजीनामा द्यावा. यंग टर्क लोकांशी त्यांचे बरेच मूतगूत होते, पण बाईंवर पूर्ण विश्वास व्यक्त करणारा ससदीय कॉंग्रेसपक्षाचा ठराव बाबूजींनीच माडला. इतकेच नव्हे तर तरुण तुर्कांनी त्याला विरोधाचे गालबोट लावू नये म्हणून त्याना गैरहजर रहाण्यासही बाबूजींनीच सागितले. जगजीवनरामाना असे वाटत होते की, सुप्रीम कोर्टाच्या स्थगिती अर्जावरील निकालानंतर बाईंना राजिनामा द्यावा लागेल आणि आपण पंतप्रधान होऊ, पण सुप्रीम कोर्टाच्या निकालात 'बाईंनी पतप्रधान रहाण्यास हरकत नाही' असे ठरल्याने ती अपेक्षाही सपुष्टात आली.

गंमत म्हणजे संपूर्ण पुस्तकात मराठी माणसाचे अगदी तुरळक उल्लेख आहेत. शकररावजींचे फक्त नाव एका यादीत येते. ना. ग गोऱ्यांनी विरोधी पक्षानी संसदेवर बहिष्कार टाकण्याचे ठरवले असल्याचे निवेदन वाचले इतकाच मजकूर आहे. गोखल्याविषयी फक्त पाचचार वाक्ये आहेत. त्यावरून गोखलेसाहेबाविषयी काही फारसे चागले मत होत नाही. गजेंद्रगडकराचा उल्लेख बाईंचा मिंधा माणूस म्हणून होतो. बाकी उडत उडत आलेली नावे म्हणजे मधु लिमये आणि विनोबा भावे याची. यशवंतरावजींची स्थिती वर सागितलीच. याउलट संपूर्ण आणीबाणी हा पंजाबी काश्मिरी माणसाचा खेळ होता असा समज या पुस्तकावरून होतो. कपूर, धवन, कौल, नेहरू, भिंडर, टंडन ही नावे वारंवार येतात.

## माणसं–विकाऊ, बिनविकाऊ आणि अविकाऊ

या आणीबाणी प्रकरणावर काही टीका–टिप्पणी केली आहे की नाही ?

मी तुम्हाला सांगितलं ना की हे तात्काळ-इतिहास लिहिणारे लोक फक्त निवेदनावर भिस्त ठेवतात. जे काही निष्कर्ष काढायचे ते वाचकाने स्वतःशी आणि स्वत पुरते काढावेत असा त्याचा खाक्या असतो. आता हे खरे आहे की, आणीबाणीतल्या बेबंदशाहीचा प्रसाद स्वत ला मिळाल्यामुळे नायरसाहेब स्वतः आणीबाणी विरुद्ध आहेत इंदिरा गाधींच्या एकूण राजवटीविषयीही पान-दीड पान मजकूर त्यानी लिहिला आहे, पण ते उगीच–फाजील चौकस वाचकाचे समाधान करण्यापुरते.

मग पुस्तक वाचून आपल्या मनावर ठसा उमटतो तो कोणता ?

पूर्वी ताराचदानी १८५७ च्या बडाचा इतिहास लिहिला. त्याला अबुल कलम आझाद याची प्रस्तावना आहे. तीत आझादानी म्हटले आहे की, 'हा इतिहास वाचून माझं मन विषण्ण झाल. या देशातील लोकाची नीतिमत्ता एवढी रसातळाला पोचली होती की, कोणाचा कोणावर विश्वास नव्हता. ही हकीकत बेचैन करणारी आहे.' हे पुस्तक वाचले की, आपल्याला असेच वाटते. ७४–७५ साली अशी स्थिती झाली होती की, प्रत्येक माणूस कपाळावर किंमत लिहूनच वावरत होता

काय म्हणता ?

तुम्ही पुस्तक वाचा म्हणजे तुम्हाला समजेल की, मी म्हणतोय त्यात काही अतिशयोक्ती नाही संजयचे तर असे मतच होते की, विरोधकाना विकत तरी घेता येते किंवा मोडून तरी टाकता येते. वर्तमानपत्रवाल्याना विकत घेता येते, अधिकाऱ्याना विकत घेता येते, न्यायाधिशाना विकत घेता येते, गर्दी विकत घेता येते, लोकप्रियता विकाऊ असते, ध्येयवाद विकत मिळतो. प्रत्येक गोष्टीला द्यायची किंमत निरनिराळी किंवा कमी-अधिक असेल; पण मूळ नियम निरपवाद आहे.

सारे पुस्तक म्हणजे मिंध्या, लाळघोट्या, लाचार आणि भेकड माणसाचे प्रदर्शन आहे. प्रत्येकावर किंमतीची चिठ्ठी आहे धवनने

दम भरताच दिल्लीचा पोलिस-कमिशनर भिंडर कोण्या अटकपत्रावर सह्या करतो; ब्रिगेडियरच्या तोलाच्या अधिकाऱ्याला बन्सीलालचा कारकून दम देतो, नौदल-प्रमुखाला शिवीगाळ होते, स्वतः पत्रकार सेन्सॉरशिपचे स्वागत करतात; न्याया-धिशाच्या बदल्या होऊ लागताच सरकार-विरोधी निर्णयाची संख्या कमी होते, ही सगळी कशाची उदाहरणे आहेत ?

अशा या बाजारात एक माणूस असा आला की, जो विक्रीयोग्य होता, पण विकाऊ नव्हता. तो म्हणजे अलाहाबादचे न्यायमूर्ती सिन्हा. त्याना पाच लाख रुपये देऊ केले; पण त्यानी निकाल बदलला नाही. त्यामुळे सगळा बाजार अस्थिर झाला. दलालाची घबराट उडाली. खरेदीदार संतप्त झाले. ज्याला बाजारी घबराट म्हणतात ती उसळली. त्याला आपण नाव दिले आणीबाणी.

पण बाजार फार दिवस बद राहू शकत नाही. एका बाईने साठेबाजी करून बाजार बद पाडला. तिलाच तो उघडावासा वाटला; पण बाजारात माल कुठाय ? तेव्हा बिन-विकाऊ–तुमच्या-आमच्यासारखी सामान्य माणसे–बाजारात आणण्यात आली निवड-णुकांच्या निमित्ताने. बन्सीलाल म्हणतच होता, 'बहेनजी, त्याना भाकरी द्या, ते तुम्हाला मत देतील.' मतदाराची किंमत किती ? तर एक भाकरी

मागे दादा धर्माधिकारीनी एक सुदर वाक्य सांगितले होते : 'गांधीजींनी शस्त्र-हीनाना निःशस्त्र विरोध शिकविला, उपाशी माणसाना उपोषण शिकविले.' त्यात एक भर टाकली पाहिजे ती अशी की, गांधीजीनी बिनविकाऊ किंवा बेकिंमत माणसाना विकले जाऊ नये, हे शिकविले. निवडणुका जाहीर होऊन काँग्रेसला पुरेसा पाठिंबा मिळत नाही हे दिसताच सरकारने ज्या सवलती जाहीर केल्या त्याची यादी नायरनी दिली आहे; पण सामान्य माणूस बधला नाही.

तुम्ही–आम्ही राजकारणाच्या बाजारात टिकतच नाही, कारण आपल्याला किंमतच नाही,, पण कोणी आम्हाला बाजारात आणलेच तर आम्ही विकले मात्र जाणार नाही. ☐

---

# लेकिन बिहार जैसा था वैसाही रह गया !

**प्रा. प्रवीण सप्तर्षी**

---

पाटलीपुत्र !

हे नाव तसे आपल्याला परिचित ! पाटलीपुत्र म्हणजे पटना शहर होय. पाटलीपुत्र ही राजधानी ज्या भागात वसलेली होती त्यास सध्या पटना–साहेब असे म्हणतात. रेल्वेस्टेशनच्या दृष्टीने पहायचे झाल्यास पटन्याचे पटनासाहेब व पटना-जक्शन ही दोन स्टेशने आहेत. पटना-साहेब हा भाग 'मध्यपटना' या निवडणूकक्षेत्रात येतो, तर पटना-जक्शन 'पश्चिम–पटना' या क्षेत्रात येते गंगानदीवर वसलेले हे राजधानीचे शहर तिला अनुसरूनच पूर्व–पश्चिम पसरलेले आहे. त्यामुळे पूर्व, मध्य व पश्चिम असे तीन निवडणूकविभाग या शहराचे केलेले आहेत. प्रथमपासूनच राजधानीचा दर्जा लाभलेल्या या शहरा-मध्ये पुरातनकाळी सरजामदारांचे वास्तव्य होते. आजही बड्या जमीनदाराच्या हवेल्या नजरेत भरतात. गंगाकाठावरील विटांच्या भट्ट्या आणि सिमेंटच्या कारखान्याखेरीज येथे उद्योगविकास फारसा दिसून येत नाही. त्यामुळे ज्या वेठबिगारीच्या न्यायाने खेड्यापाड्यात जमीनदार शेतमजुराचे शोषण करतो त्याच न्यायाने पटना शहरा-तील वीट–भट्टीवालाही शोषण करतो. रेल्वेच्या व गंगानदीच्या साहाय्याने मिळणाऱ्या वाहतुकीचा फायदा म्हणून बाजारपेठही येथे मोठ्या प्रमाणावर दिसते. अशा तऱ्हेने खेड्यातून शोषण करणारा जमीनदारवर्ग व व्यापारीवर्ग एका बाजूला आणि सायकलरिक्षावाले व तत्सम दर्जाचा गरीबवर्ग एका बाजूला अशी परिस्थिती येथे दिसते. आर्थिक वर्गीकरण करताना या दोन प्रमुख वर्गांचाच विचार करावा लागतो. विद्यापीठ, महाविद्यालये व शाळा आणि सरकारी कार्यालये यामुळे मध्यमवर्ग आपले थोडेफार अस्तित्व दाखवून जातो. निवडणूक–राजकारणात गरीबवर्ग मात्र फारसा रस घेत नसलेलाच दिसून येतो.

सात–आठ दिवसापूर्वी पाटण्यास १–१॥ तास थाबूनच पुढे बिहारच्या खेड्यापाड्यामध्ये गेलो होतो. त्या वेळी शहरातून चक्कर मारताना विधानसभेच्या निवडणुका या शहरात आहेत की नाही अशी शंका येत होती. आज मात्र पोस्टर्स दिसत आहेत. सायकल-फेऱ्यातून दिल्या जाणाऱ्या घोषणा ऐकू येत आहेत तरीसुद्धा निवड-णुकांच्या निमित्ताने गोरगरीब जनता हलल्यासारखी वाटत नाही. एका सायकलरिक्षावाल्यास विचारले तर तो 'मालूम नही' असे म्हणाला. 'भाईसाब कौनसा भी गव्हर्मेंट आवे, हमारे रेट नही बढावे।' हा निराशावाद व्यक्त करून त्याने वाढत्या भाववाढी-बद्दल, जनतापक्षाबद्दल बरीच नाराजी व्यक्त केली. जनतासरकार-स्थापनेनतर अनेक वर्षांतून प्रथमच त्याना आशेचे किरण दिसू लागले होते; परंतु थोड्याच दिवसात निराशा पदरी आली असे त्याना वाटत होते. याचे नेमके कारण काय ? 'सरकार बदलले' अशी भावना सर्वसामान्यापर्यंत पोहचली नाही कारण गरिबाचे राज्य आले, नैतिकतेचे राज्य आले असे त्याना वाटत नाही. अजूनही त्याच्याकडून रिक्षा उभी करण्याबद्दल ठेकेदार पैसे घेतो, सरकारी अधिकारी, पोलीस लाच घेतच आहेत. लोकही त्याना अरेरावीतच बोलत असतात. रिक्षावाल्याने लाचलुचपतीबद्दल सांगितल्यावर मी एकदा वेळ काढून अर्धा तास पटना–जक्शनच्या दारावर उभ्या अस-लेल्या टी. सी. वर नजर ठेवली. स्टेशनाबाहेर पडणारे काही सराईत लोक त्याच्या हातावर ५० पैसे–रुपया ठेवून बाहेर पडत होते.

एकजण ५० पैसे देऊन बाहेर चालला असता त्याला परत बोलावून दोन दिवसापूर्वीची उधारीही त्याने वसूल केली. सर्वसामान्याना विशेषत: श्रमिकवर्गास ' राज्य बदलले ' असा सेन्स हवा आहे जनतापक्ष अजून तरी तो देऊ शकलेला नाही. कॉंग्रेसवाल्याच्या गुडगिरीला आणि भ्रष्टाचाराला लोक इतके त्रासलेले आहेत की त्यांच्या नादी पुन्हा लागायचे नाही अशी भावना बराच काळपर्यंत राहील. त्यामुळे आज तरी पटन्याचा सर्वसामान्य नागरिक निवडणुकाबद्दल निराश दिसतो. ज्या शहरात तीन वर्षांपूर्वी जे पी. नी ८–१० लाखाचा मोर्चा काढन आशावाद निर्माण केला होता. त्याच शहरातील लोक आज म्हणतात, 'जे. पी. जी हमारी आशा है, लेकिन वो तो अब बिमार है। उनकी बिमारीके साथ हमारी आशा भी बिमार हो गयी।'

□

पटन्यातील नागरिकांमध्ये हा आशावाद पुन्हा जागृत करण्याच्या दृष्टीने कोणता पक्ष क्रियाशील आहे हे पाहण्याच्या दृष्टीने शहरात फेरफटका मारला निवडणुकाच्या मोहिमेतील शेवटचा भाग म्हणजे कार्यकर्त्यांच्या प्रचारफेरीचा कार्यक्रम हा ठिकठिकाणी दिसत होता. पटन्यातील तीन मतदारसंघापैकी दोन मतदारसघामध्ये जनता विरुद्ध कॉंग्रेस आणि पश्चिम विभागात जनता विरुद्ध कम्युनिस्ट असा सामना दिसून येत होता. अपक्ष उमेदवार एकूण २३ असूनही त्याच्यापैकी एकही महत्त्वाचा ठरणार नाही असेच दिसले. प्रथम एका अपक्ष उमेदवाराच्या कचेरीत गेलो. उमेदवाराचा एक नातलग, भाड्याच्या ५–६ रिक्षा आणि त्याचे ड्रायव्हर्स याखेरीज कार्यकर्ता असे ज्याला म्हणता येईल असा एकही माणूस तेथे नव्हता. सकाळचे १० वाजले तरी प्रत्यक्ष उमेदवार जलपान करून घरून ऑफिसमध्ये आलेले नव्हते. त्या उमेदवाराचा जोर कमी आहे हे ओळखून मी त्याला त्याबद्दल विचारले तर त्याने थोडेसे चिडूनच सांगितले की, 'ही द्विपक्षीय पद्धत म्हणजे सर्वसामान्याचे दमन आहे. या दोन्ही पक्षांखेरीज राजकारण करताच येणार नाही. अशी व्यवस्था जनता सरकारने केलेली आहे.' 'देखो साब, कॉंग्रेसके गुंडोको टी. व्ही और रेडिओपर चान्स मिलता है, हमको नही।' एकदरीत अपक्ष उमेदवारानी आपल्या प्रचारासाठी सरकारी साधनसामुग्री व वृत्तपत्रे यांचे पाठबळ नसल्याबद्दल नापसती व्यक्त केली.

□

विद्यार्थिवर्गाचा निवडणुकीमध्ये कितपत सहभाग आहे हे पाहण्यासाठी 'नगर टोली'मधील अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या ऑफिसमध्ये गेलो. तेथे पूर्णपणे शुकशुकाट होता. आश्चर्य वाटले. ऑफिस झाडणाऱ्या मुलास विचारल्यावर सर्व कार्यकर्ते प्रचारासाठी विविध क्षेत्रांमध्ये गेल्याचे त्याने सांगितले. चौकशीअंती समजले की, पटना शहरातील तीनही जनता–उमेदवारांपैकी एकही उमेदवार पूर्वीच्या जनसंघाचा नाही. अ. भा. वि. प., समाजवादी युवजन सभा इ. युवक–सघटना सध्या छात्र सघर्ष समितीमध्ये विलीन झालेल्या आहेत तरीसुद्धा आपली वेगवेगळी कार्यालये व त्यांवरील पाट्या त्यांचे वेगळे अस्तित्व दाखवितात. छात्र संघर्ष समितीच्या ऑफिसमध्ये गेल्यावर मात्र कार्यकर्त्यांची गर्दी दिसली. मध्यविभागामध्ये महंमद शहाबुद्दीन हे जनतापक्षाचे उमेदवार उभे आहेत. त्यांचे प्रचाराचे मध्यवर्ती ऑफिस छात्र संघर्ष समितीच्याच ऑफिसमध्ये आहे त्याच्या प्रचाराचा जोर कार्यकर्त्यांच्या उत्साहामुळे स्पष्ट दिसत होता. तेथील कार्यकर्त्यांची नावे विचारल्यावर कोणी कंचनबाला, कोणी अशोक, कोणी रवींद्र अशी नावे सांगत होते. आडनाव कोणीही सागितले नाही. जे. पी. च्या आदोलनानंतर जात पाळायची नाही अशी शपथ या कार्यकर्त्यांनी घेतली होती त्यानुसार जातिवाचक आडनाव ते सागत नाहीत. विद्यापीठाच्या परीक्षाफॉर्मवरही दाक्षिणात्याप्रमाणे आडनावाचे फक्त इनिशियल ते देतात. एकदरीत या कार्यकर्त्यांबरोबर माझी विचाराची तार चागलीच जुळली बरीच चर्चा झाली एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे जनतापक्षाच्या पटन्यातील मध्यवर्ती ऑफिसमध्ये आम्ही पुण्याहून येथे आलो याचे अजिबात कौतुक नव्हते; पण या कार्यकर्त्यांना आम्ही इतक्या लाबून आलो याबद्दल फारच कौतुक दिसले. अत्यत अदबीने विचारपूस करणाऱ्या या कार्यकर्त्यांनी आमची मने त्वरित जिंकली. जनतापक्षाबद्दल सध्या आमची सहयोगाची भावना आहे; परतु जनता सरकारशी सघर्ष करण्याची वेळ आली तरी आम्ही मागे हटणार नाही असे ते सागत होते. 'शहाबुद्दीनभाई तो जीतनेवाले हैं, लेकिन वे 'सपूर्ण क्रांती 'के बारेमे कुछ नही कर पाएँगे तो वापस आनेवाले है।' एका विद्यार्थिनीने स्पष्ट शब्दात सांगितले.

## सी. पी. आय., कॉंग्रेस व जनता

कॉंग्रेसची स्थिती अपक्षाप्रमाणे पटन्यात तरी होती. फरक एवढाच की, अपक्ष उमेदवाराच्या ऑफिसच्या बाहेर रिक्षा उभ्या होत्या तर कॉंग्रेसच्या ऑफिसबाहेर जिप्स व कार्स उभ्या होत्या कॉंग्रेसच्या वतीने सायकल-फेऱ्या काढण्यात प्रामुख्याने कम्युनिस्ट कार्यकर्त्यांचाच अधिक वाटा आहे कॉंग्रेस व कम्युनिस्ट याची युती असली तरी सायकल-फेऱ्यामध्ये तिरंगी झेंड्यापेक्षा लाल बावटेच अधिक होते. कम्युनिस्टपार्टीच्या मध्यवर्ती कार्यालयात गेलो. आत प्रवेश करताना १४–१५ वर्षांच्या दोन गणवेशधारी मुलानी सावधान होऊन आम्हाला सॅल्यूट ठोकला. बिहारमध्ये आल्यापासून इतकी शिस्तबद्धता प्रथमच दिसत होती. ऑफिसमधल्या वेटिंगरूम नावाच्या दालनात आम्हाला अदबीने बसवून पुन्हा सॅल्यूट करून दोन्ही शिपाईगडी दारात जाऊन बूट वाजवून 'सावधान' झाले. पार्टीचे सेक्रेटरी ऑफिसच्या वरच्या मजल्यावरच राहतात परंतु ते घरी असूनही कोणालाही (?) भेट वगैरे देत बसत नाहीत प्रथम त्याचे पी ए. येऊन आमची चौकशी करून गेले त्यानी तासाभराने परत येऊन अजून एक तासाने 'कॉम्रेड' आपल्याला भेटतील असे सांगितले. आम्ही बाहेर पडलो. जाताना पुन्हा एक एक सॅल्यूट स्वीकारून त्या मुलाना विचारले, 'क्यो भाई, आपको तनखा कितना मिलता है?' त्या दोघातील एका थोरल्या पोराने सांगितले, 'मुझे पचीस और इसको बारह मिलते है। उसका ट्रेनिंग खतम होनेके बाद उसको भी पचीस मिलेंगे। बाकी चाय–पानी और एक टाइम का खाना यहांही होता है। अच्छा है साब।' तर अशी आहे येथील कम्युनिस्टपार्टी. यानी म्हणे जे पी च्या मोर्चाला उत्तर म्हणून ५–६ लाखाचा मोर्चा पटन्यात आयोजित केला होता आज मितीस मात्र त्याच्या सायकलफेरीत २५–३० सायकलस्वाराखेरीज जास्त सख्या ते आणू शकत नाहीत. या निवडणुकीत त्याचा पश्चिम विभागातून एक उमेदवार उभा होता. परतु इतक्या 'शिस्तबद्ध (?)' वागण्यामुळे बिहारी कामगारवर्गामध्ये त्याची सैद्धान्तिक भूमिका पोहचत नाही. शिवाय भाषणातून जे पी च्या विरुद्ध बोलणारे असल्याने लोकांना या पक्षाबद्दल फारसे प्रेम वाटत नसलेले दिसले. एका सभेत एक कम्युनिस्ट पुढारी सागत होता, 'हम लोक इमर्जेन्सिके खिलाप जो सघर्ष हुआ उसमे नही थे ऐसा बोला जाता है। लेकिन कॉंग्रेसको पार्लमेंटमे सच्चा विरोध करनेवाली पार्टी हमारी पार्टी थी।' एकदरीत त्याच्या भाषणाचा सूर आणीबाणीतील

पृष्ठ ३० वर

# अवती-भवती

शरद कृष्णन्

## □ सिद्धार्थ बांदोडकर प्रकरण

गोव्यामधील निवडणुका हातातोंडाशी आल्या होत्या. नेमक्या त्याच वेळी कै. सिद्धार्थ बांदोडकर यांच्या पत्नी, चित्रपटअभिनेत्री लिना चंदावरकर यांनी केंद्रीय गृहमंत्र्याकडे आपल्या पतीच्या अपघाती निधनाबाबत चौकशी करण्याची मागणी केली होती. लिनाची याबाबत भूमिका तरी काय आहे? चौकशी व्हावी असे तिला का वाटते? अपघाती निधनानंतर तिला काही त्रास झाला का? बांदोडकरांच्या मालमत्तेमध्ये तिचा वाटा कोणता? या सगळ्या अनुत्तरित प्रश्नांची उत्तरे लिनाच देऊ शकणार ..पण तिच्या भोवती तर आप्तेष्टांचा, पोलिसवाल्यांचा गराडा, तो तोडून तिच्यापर्यंत पोचले तर तीही मोकळेपणाने असे बोलेल असे नाही अशा या सगळ्या नकारात्मक पार्श्वभूमीवर तिची मुलाखत घेण्याची किमया 'ऑनलूकर' या पाक्षिकाने करून दाखवली आहे.

लिनाच्या चेहऱ्याकडे पाहिले तरी ती आपले स्वास्थ्य हरवून बसली आहे हे चटकन लक्षात येते. लपवू म्हटले तरी तिच्या चेहऱ्यावरील भीती लपत नाही. मोकळे बोलण्याची तिची इच्छा असली तरी ती तसे करू शकत नाही कारण तिने मोकळेपणाने कोणाजवळ बोलावे असे तिच्या कायदेशीर सल्लागारांना वाटत नाही आणि सिद्धार्थ-प्रकरणी तिने कोणतीही मुलाखत देऊ नये अशी पोलिसांचीही इच्छा आहे त्यामुळे कितीही खोदून खोदून विचारले तरी ती जास्त बोलत नाही तिच्या बरोबरील बातचितीचा सिद्धार्थप्रकरणाशी संबंध असल्याने त्याबाबतचा थोडाफार तपशील प्रथम नोंदविणे आवश्यक वाटते. बांदोडकर-कुटुंब हे गोव्यामधील एक अतिधनाढ्य कुटुंब. कै. भाऊसाहेब बांदोडकर यांनी प्रचंड आर्थिक साम्राज्य निर्माण केले तरी गोव्यामधील सामान्य माणसाला ते कधी विसरले नाहीत. कोणीही कुळवाडी अडीअडचणीला 'भाऊ' म्हणून त्यांना साद घालीत असे आणि तेही त्याला मदत करून सल्ला देत असत अगणित व्यक्ती आणि असंख्य संस्थांना भाऊंनी ऋणी करून ठेवले होते. असेही सांगतात की अबोल दान देणारा त्यांच्यासारखा धनी शोधून मिळणे कठीण! स्वाभाविकपणे भाऊसाहेब जेव्हा राजकारणामध्ये उतरले, त्या वेळी जनता त्यांच्या मागे मजबूतपणे उभी राहिली. कै भाऊसाहेब अगदी अचानक हृदयविकाराच्या झटक्याने निधन पावले. त्यांच्या आर्थिक मालमत्तेचा वारसा सिद्धार्थकडे आणि राजकीय पुण्याईचा वारसा त्यांच्या कन्या सौ शशिकला काकोडकर यांच्याकडे आला. सिद्धार्थ-लिना-विवाहाबाबत बांदोडकरांच्या घरामध्ये असंतोषच होता सिद्धार्थच्या चार बहिणीपैकी एकीलाही हा विवाह मान्य नव्हता. विशेषत: शशिकलाबाई आणि त्यांचे पती याबाबत जास्त संवेदनाक्षम होते, पण हा सगळा विरोध मोडून काढून सिद्धार्थने लिनाशी विवाह केला. त्यांचे वैवाहिक आयुष्य केवळ दहा दिवसांचे. एका मध्यरात्री अडीच वाजता-पिस्तुल साफ करीत असताना गोळी उडून सिद्धार्थ यांना जबर जखम झाली. त्यांच्यावर प्रथम गोव्यामध्ये आणि नंतर मुंबईच्या जसलोक हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यात आले. सिद्धार्थची प्रकृती बऱ्यापैकी सुधारली गोव्यामध्ये तो परत आला त्या वेळी त्याचे शाही स्वागत करण्यात आले पुढे २० ऑक्टोबर १९७६ रोजी पत्नीबरोबर मोटरने जात असताना त्यांच्या गाडीला अपघात झाला अपघातामध्ये जखमी झालेल्या नरेंद्र शिरोडकर या सहा वर्षे वयाच्या मुलाला सिद्धार्थने हॉस्पिटलमध्ये पोहोचविले, पण या अपघातामध्ये त्यालाही चांगलीच दुखापत झाली होती पहिल्या अपघातातून सावरत असतानाच हा दुसरा अपघात झाला. सिद्धार्थ कसाबसा घरी आला आणि घरात येताच कोसळून पडला. तो पुन्हा कधीही उठला नाही

सिद्धार्थच्या मृत्यूने लिना-विलक्षण हादरून गेली आजही तिची अशी भावना आहे की तिच्याही जिवाला धोका आहे ती स्वच्छच म्हणते-मी वेडी तरी व्हावे अथवा ठार मरावे अशी इच्छा बाळगणारे अनेक लोक आहेत माझ्याबाबत अशीही अफवा पसरविली गेली आहे की-मला दिवस गेले होते आणि मूल होऊ नये म्हणून मी शस्त्रक्रिया करवून घेतली. माझी धास्ती ही केवळ मनाचा खेळ आहे असे समजू नका मला ठार मारण्याच्या धमक्या देणारे फोन येतात. माझ्या घरामध्ये मला मारण्याच्या हेतूने एका व्यक्तीने प्रवेश केला होता; परंतु माझ्या इमानी कुत्र्याने त्याला पळवून लावले आपण अतीव संकटामध्ये आहोत अशी आज लिनाची भावना आहे. ती विलक्षण निराश दिसते तिच्या आवती-भवतीच्या माणसामध्ये अथवा अन्य कोणत्याच गोष्टीमध्ये तिला रस वाटत नाही. तिच्या बोलण्यामध्ये असलेली निराशेची धार ते बोलणे ऐकणाराला अस्वस्थ करून सोडते. अभिनेत्री म्हणून लिना मोठी नसेल; परंतु तिच्या सौंदर्याने अभिनयाबाबत असलेल्या उणेपणाची कसर भरून काढली आहे तिला कामाची कधीच वानवा नव्हती. लक्ष्मी सतत प्रसन्न होती आणि असंख्य चित्ररसिकांना ती अतिशय प्रिय होती अशा या अभिनेत्रीला दुर्दैवी संकटपर्वामधून जावे लागल्याबद्दल तिच्या चाहत्यामध्ये आणि चित्रपटव्यवसायिकांमध्ये विलक्षण खंत आहे. जे नशिबामध्ये वाढून ठेवले होते ते होऊन गेले, पण जे झाले ते कसे झाले याचा शहानिशा झाला पाहिजे असे लिनाला प्रामाणिकपणे वाटते. म्हणूनच आपली कैफियत मांडणारा एक सहा पानी अर्ज तिने केंद्रीय गृहमंत्र्यांना दिला असून आपल्या पतीच्या निधनाच्या चौकशीची मागणी केली आहे आपल्या वकिलाबरोबर तिने गृहमंत्र्यांशी समक्ष भेट घेतली आणि एक तासभर त्यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करून त्यांना आपल्या शंका समजवून दिल्या. गृहमंत्र्यांना या प्रकरणामध्ये चौकशी करण्याइतके तथ्य वाटल्याने केंद्रीय गुप्तचर

खात्याने या प्रकरणी हालचाल सुरू केली आहे. पोलिसखात्याने या प्रकरणी एक प्रश्नावली तयार केली असून ती लिनाच्या हाती सुपूर्त केली आहे. चौकशी प्रकरणाची मागणी तुम्ही आत्ताच का केली ? असा प्रश्न विचारल्यावर लिना म्हणाली-ही मागणी आत्ताच करण्याचे प्रमुख कारण म्हणजे नवीन शासनावर माझा पूर्ण विश्वास आहे माझ्या या मागणीबाबत लोक नाही नाही ते बोलतात याची मला जाणीव आहे; परंतु माझ्या मागणीचा विचार करून मला न्याय देऊ शकेल, असे सरकार केंद्रस्थानी आल्याबरोबर मी चौकशीची मागणी केली आहे.-माझ्या पतीच्या निधनाबाबत असलेले रहस्य या चौकशीनतर पूर्णपणे उलगडू शकेल असा मला विश्वास वाटतो.

प्रश्न : तुमच्या अर्जामध्ये तुम्ही नेमक्या कोणत्या शंका व्यक्त केल्या आहेत ?

लिना . माझ्या पतीच्या निधनाबाबत मला जे वाटते ते सारे मी या अर्जामध्ये नोदविले आहे. त्यामध्ये काही व्यक्तीची नावेही घातलेली आहेत. तथापि हा तपशील आता तुम्हाला प्रसिद्धीसाठी देऊन त्या लोकाना सावध करण्याची माझी इच्छा नाही.

प्रश्न · तुमच्या सासरच्या मडळीबरोबर तुमचे सबध कसे होते ?

लिना . आमचे सबंध कधीच चांगले नव्हते त्या सगळचाना माझ्याबद्दल विलक्षण राग होता, दुस्वास होता त्याला अनेक कारणे होती; परतु मी चित्रपटअभिनेत्री आहे ही गोष्ट ते कधीच विसरू शकले नाहीत. अपवाद फक्त सिद्धार्थचा. त्याचे माझ्यावर निरतिशय प्रेम होते आणि मी चित्रपटव्यवसायामधील असूनही माझ्यावर पूर्ण विश्वास होता.

प्रश्न अपघातानतर तुमचे आणि सिद्धार्थचे संबंध कसे होते ?

लिना · संबधाच्या कसल्या गोष्टी करता-अहो, त्याच्या वहिणीनी मला पुढे सहा महिनेपर्यंत त्याचा सहवासही धड लाभू दिला नाही. १८ डिसेबर १९७५ रोजी अपघात झाला आणि तेव्हापासून मी सतत एका अस्वस्थ करणाऱ्या अनाहूत भीतीच्या दडपणाखाली वावरत आहे. अपघात झाला त्या वेळी सिद्धार्थच्या बहिणी, त्याचे पती आणि मुले यानी खोलीमध्ये प्रवेश केला. एकटचा शशिकलाबाई तेथे नव्हत्या. त्याच्याशी फोनवर सपर्क साधण्यात आल्यावर त्यानी गोवा मेडिकल कॉलेजला फोन केला. या अपघातामुळे-लिनाच्या मनाचा तोल गेला, तिला वेगळचा खोलीत कुलूप लावून ठेवण्यात आले. या झगडचामध्ये तिच्या हातातील बांगडचा फुटल्या त्या बांगडचाचे तुकडे पोलिसाना मिळाल्याचेही ती सागते.

प्रश्न · जखमी सिद्धार्थवर लगोलग उपचार झाले का ?

लिना : नाही. असे सागितले जाते की, हॉस्पिटलमध्ये पोचल्याबरही त्याच्यावर ४० मिनिटे कोणतेही उपचार करण्यात आले नाहीत मुख्य मत्री शशिकलाबाई आल्यानंतरच उपचाराना प्रारंभ झाला. हा अपघात झाला त्या रात्री सिद्धार्थ आणि त्याच्या कुटुबामधील इतर मडळी याच्यामध्ये खटका उडाला. लिनाच्या हुडयाबावत, तसेच मालमत्ता तिच्या नावे करण्याबाबत वाद चालू होता लग्नानंतर केवळ दहा दिवसानी हा असला विषय निघावा आणि इतक्या खालच्या पातळीवरून चर्चा व्हावी ही गोष्ट लिनाला रुचली नाही. ती खोलीवाहेर निघून गेली. त्यानंतर काही वेळाने भांडयांची आदळआपट झाल्याचे आवाज आले आणि लगोलग सिद्धार्थही त्या खोलीतून बाहेर आला.

प्रश्न : सिद्धार्थची प्रकृती सुधारल्यानंतर तुम्ही कोठे राहात होतात ?

लिना · अपघातानतर सहा महिन्यानी आम्ही मुबईमध्ये एका वेगळचा फ्लॅटमध्ये राहात होतो. सर्वसाधारणपणे आम्ही समाधानी होतो. तथापि अपघाताचा विषय काढला की तो काही बोलत नसे आणि गंभीर होत असे. बादोडकर कुटुबियानी या प्रकाराची नोद 'अपघात' अशी करवून घेतली असल्याने पोलिसांनी कधी चौकशी केली नाही अथवा सिद्धार्थवर खटला भरला गेला नाही (खटल्याचा संदर्भ अर्थातच आत्महत्येच्या प्रयत्नाचा असावा.) पुढे उपचारानंतर त्याला केवळ सहा महिन्याचे आयुष्य मिळाले, पण या अल्पकाळामध्ये त्या अपघाती म्हणून नोदल्या गेलेल्या प्रकाराबाबत त्याने कोणाजवळही कसलीही प्रतिक्रिया नोदविली नाही अथवा हा प्रकार कसा घडला याची माहितीही दिली नाही.

सिद्धार्थची प्रकृती चागली सुधारली होती आणि म्हणूनच त्याच्या निधनाचे वृत्त आले त्या वेळी लिनाच्या आईला हा आणखी एखादा अपघात असावा असे वाटले, परतु प्रत्यक्षामध्ये शस्त्रक्रिया चालू असताना त्याचे निधन झाले.

प्रश्न : त्याच्या निधनाबावत तुमची काय प्रतिक्रिया आहे ?

लिना मला एकाच गोष्टीचे राहून राहून आश्चर्य वाटते. नॉव्हेल्जिन त्याला अजिबात मानवत नसे ही गोष्ट कुटुबातील प्रत्येकाला माहिती होती आणि तरीसुद्धा त्याला हे औषध का दिले गेले ? ते कोणी दिले ? ते मुद्दाम दिले गेले का ? अशा किती तरी शका माझ्या मनामध्ये आहेत. माझ्या अनुत्तरित प्रश्नाची उत्तरे मला हवी आहेत.

प्रश्न सिद्धार्थच्या मृत्यूनंतर तुमचे बादोडकर-कुटुंबियांशी कशा प्रकारचे संबध आहेत ?

लिना : सिद्धार्थच्या मृत्यूनतर मला अतिशय वाईट वागणूक मिळाली. पतिनिधनाबद्दलच्या माझ्या भावनाही कधी मला मोकळेपणी व्यक्त करता आल्या नाहीत माझ्या अश्रूंची, दुःखाची टर उडविली गेली. नाटक करते अशी कुचेष्टा करण्यात आली. पुन्हा दुसरे लग्न करण्याचा सल्ला वारंवार दिला गेला. या साऱ्या गोष्टी लिना सुस्पष्टपणे बोलते असे नाही. ती तुटक तुटक बोलते. अर्थ आपला आपल्याला लावून घ्यावा लागतो तिच्या बोलण्यावरून स्पष्ट होते ते एवढेच की, ती सिद्धार्थच्या निधनानतर मुबईला निघून आली.

प्रश्न : मालमत्तेबाबत काय ?

लिना : त्याबाबत मला काहीही गोडी नाही. गोव्याच्या लोकासाठी मला जर काही करता आले तर मी अवश्य करीन अशी एक वदता आहे की, पतीच्या मालमत्तेवर आपला कोणताही हक्क नसल्याचे नमूद करणाऱ्या कागदपत्रावर तिच्या इच्छेविरुद्ध तिच्या सह्या घेण्यात आल्या आहेत या प्रकाराबाबत ती कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त करीत नाही.

प्रश्न : पुन्हा लग्न करण्याबाबत विचारणे जरा धाडसाचे वाटते; पण तरी सुद्धा...

लिना : नाही, पुन्हा लग्न करण्याचा आपला मानस नाही. निदान नजीकच्या काळात तर नाहीच नाही. विवाह न करता असेच राहणे अजून तरी मला अवघड वाटत नाही.

मुख्य मंत्र्याच्या घरून जो फोन आला त्यावरून या अपघात-प्रकरणाची माहिती पोलिसइन्स्पेक्टर जुवरकर याना समजली. ते लगोलग सिद्धार्थच्या घरी गेले; परंतु त्यापूर्वी एक तास सिद्धार्थला हलविण्यात आले होते. खोलीमध्ये आढळलेले पिस्तूल, बागडयाचे तुकडे आणि रक्ताचे थारोळे याचा तपशील नोंदवून त्यानी खोलीला कुलूप घातले. हे कुलूप घरामधील नोकरानेच दिले आणि ते अगदीच तकलादू होते. गोव्याचे पोलिसप्रमुख कौशल यानी जुवरकराकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पुढील तपशील नोंदवून या कामात स्वत: लक्ष घातले. हा सगळा प्रकार कसा घडला असावा याची त्यानी नोंद करवून घेतली. मधुचंद्राहून हे नवीन जोडपे १८ डिसेंबर १९७५ रोजी परत आले. सिद्धार्थ व लिना यानी भोजन केले. श्रीमती बादोडकराबरोबर काही भजने ऐकली. नाताळानिमित्त आयोजित केलेल्या एका नृत्यकार्यक्रमाला त्याना जायचे होते. त्या दिवशीचा तो शेवटचा कार्यक्रम होता. दोघेही वर आपापल्या खोल्यामध्ये गेले. रात्री ११ वाजून ४० मिनिटानी लिनाला गोळीबार झाल्याचा आवाज ऐकू आला. ती घाईघाईने शेजारच्या खोलीत आली. जखमी सिद्धार्थ जमिनीवर पालथा पडला होता. पुढे त्याला हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. रुग्णाला ऑपरेशनटेबलवर घेतल्यावर एका गोळीने पुरेसा हाहा कार उडवून दिल्याचे डॉक्टराच्या लक्षात आले. गोळी अगदी जवळून झाडण्यात आली होती हीही गोष्ट स्पष्ट झाली. बाहेर मुख्य मंत्री शशिकलाबाई यानी पोलिसप्रमुखाना आदेश दिला की, त्याची संमती घेतल्याखेरीज पचनाम्याच्या कामास प्रारंभ करू नये. लिना बाहेर होती; परंतु तिला कुटुंबियापासून कटाक्षाने दूर ठेवण्यात आले होते आणि पतीपासूनही तिला दहा दिवस दूर ठेवण्यात आले. या साऱ्या गोष्टींची नोंद ती पुढे चरणसिंग याना दिलेल्या चौकशीअर्जामध्ये करणार होती. घाईगर्दीने आलेल्या लिनाच्या गळ्यामध्ये मंगळसूत्र नव्हते. कपाळी कुंकू नव्हते. श्रीमती बादोडकरानी मंगळसूत्र आणवून ते तिच्या गळ्यामध्ये घातले आणि नर्सकडून एक तांबडे बॉलपेन घेऊन तिच्या कपाळी कुंकुमतिलक लावला.

पोलिसप्रमुखांनी एक छोटेसे निवेदन अत्यंत काळजीपूर्वक-पद्धतीने तयार करून ते वृत्तपत्राकडे प्रसिद्धीसाठी दिले. प्रत्येक शब्द तोलून-मापून वापरण्यात आला होता. प्रथमदर्शनी हा अपघात असल्याचे दिसत असले तरी आता काहीही निश्चितपणे सांगता येणार नाही. मुख्य मंत्र्याच्या सूचनेकडे दुर्लक्ष करून पोलिसप्रमुखानी गुप्तहेर-खात्यामधील दडपणाला भीक न घालणाऱ्या एक कार्यक्षम अधिकारी जो डिसूझा याना या प्रकारची चौकशी करण्यास सांगितले. पंच-नाम्याला प्रारंभ केल्यावर डिसूझा याना असे दिसून आले की, जुवरकर यानी सिद्धार्थच्या खोलीला लावलेले कुलूप तोडण्यात आले आहे. खोली स्वच्छ करण्यात आली होती. तपशिलामध्ये नोंदल्या-प्रमाणे तेथे रक्ताचे थारोळे दिसत नव्हते. एका कोपऱ्यात असलेल्या छोट्या पाकिटावर रक्ताचे काही थेंब पडल्याचे दिसत होते. पुढे असेही आढळून आले की, पिस्तुलावर कोणाच्याही हाताचे ठसे नसून ते काळजीपूर्वक पुसून ठेवण्यात आलेले आहे. याच पिस्तुलातून गोळी झाडली गेली आहे हेही निर्विवादपणे कधी सिद्ध होऊ शकले नाही. पिस्तुलाचा परवाना नव्हता. इतकेच नव्हे तर अशीच आणखी काही पिस्तुले पुढे मुख्य मंत्र्याच्या निवासस्थानातून जप्त करण्यात आली. पंचनाम्याच्या वेळी मुख्य मंत्र्यानी घेतलेल्या हरकतीना डावलून जेवढे व्यवस्थित काम करणे शक्य आहे तेवढे करण्यात आले. डिसूझा यानी कसून शोध करूनही वापरलेली गोळी त्याना शेवटपर्यंत मिळू शकली नाही.

पुढे पोलिसतपासामध्ये असेही निष्पन्न झाले की, स्वत मुख्य मंत्री शशिकलाबाई आणि समीर या स्थानिक पत्रिकेचे संपादक असलेले त्याचे पत्रकारपती गुरुदत्त काकोडकर या दोघानाही लिना आवडत नसे. त्यातच बादोडकर याच्या मालकीच्या सात लोह-खाणीपासून येणाऱ्या उत्पन्नाचा मोठा भाग महाराष्ट्रवादी गोमातक पक्षाकडे जाऊ नये असा सल्ला मॅनेजर रोईलकर यानी दिला आणि सिद्धार्थने तो प्रमाण मानला. ही गोष्ट अर्थातच मुख्य मंत्र्याना आवडली नाही.

लिना आणि सिद्धार्थ याचा विवाह स्वत: भाऊसाहेबानीच निश्चित केला होता. तथापि हा विवाह होऊ नये यासाठी काकोडकर-दापत्याने प्रयत्न केले असे बोलले जाते. या विरोधाला न जुमानता सिद्धार्थने लिनाबरोबर विवाह केला आणि मुंबईमध्ये एक शानदार स्वागतसोहळाही आयोजित केला.

मनाजोगती जोडीदारीण मिळाल्यानंतर प्रसन्न मानसिक अवस्थे-मध्ये असलेल्या सिद्धार्थला अपघात झाला असे मानले तरी गंभीर अपघातानंतर तो पिस्तुलाचा ट्रायगर बंद कसा करू शकेल? हा अपघात नसेल तर आपण मरावे असे सिद्धार्थला का वाटले असावे?

मध्यरात्री कधी कोणी भरलेले पिस्तूल साफ करतो काय? त्यातून सिद्धार्थ हा उत्तम नेमबाज. त्याच्या हातून हा असला वधळा अपघात होईलच कसा? तीनच महिन्यापूर्वी नागपूर येथे झालेल्या अखिल भारतीय नेमबाजी-स्पर्धेमध्ये सिद्धार्थने तिसरा क्रमांक मिळविला होता, ही गोष्ट कशी विसरता यईल? जखमेचा जागा छातीच्या इतक्या वरच्या बाजूला होती को, त्याने स्वत. पिस्तूल चालविले असणे शक्य वाटत नाही. लिनाने पुढे असे सांगितले आहे का, पिस्तूल सिद्धार्थच्या डाव्या बाजूला पडले होते. जखम उजव्या बाजूला असताना पिस्तूल डावीकडे कसे गेले? शशिकलाबाईंना हॉस्पिटलमध्ये पोचण्यास एक तासाहून जास्त अवधी कसा लागला? सिद्धार्थला मुंबईकडे नेण्यापूर्वी लिनाची व त्याची एकदाच गाठ पडली. त्या वेळी 'काळजी करू नकोस, सर्व काही ठीक होईल!' असा दिलासा त्याने दिला. महाराष्ट्राच्या मुख्य मंत्र्याच्या ज्या विमानाने सिद्धार्थला मुंबईमध्ये आणण्यात आले त्या विमानात लिनाला प्रवेश देण्यात आला नाही. इंडियन एअर लाइन्सच्या नियमित वाहतुकीपैकी १६८नंबरच्या फ्लाइटने तिने यावे असे तिला सांगण्यात आले आणि तो सल्ला प्रमाण मानण्याखेरीज तिला इलाज नव्हता. जसलोकमध्ये चमत्कार घडला आणि सिद्धार्थला पुनर्जन्म मिळाला. त्याला गोव्याला जाण्यास पर-वानगी देण्यात आली तरी त्याच्या बोलण्यामध्ये दोष राहिला, चालणेही त्याला अवघड होऊन बसले. जसलोकच्या डॉक्टर मेहता यानी त्याला स्पष्ट सल्ला दिला की, बाबा रे...तुला अति जपून रहावे लागेल, दगदग तर मुळीच सोसणार नाही; पण होणारे

टळणार नव्हते. पुढे झालेल्या मामुली अपघातामध्ये त्याचे निधन झाले. हजारो गोवेकरानी ..भाऊसाहेबांच्या या एकुलत्या एक चिरंजिवासाठी अश्रू ढाळले. असंख्य मडळीच्या उपस्थितीमध्ये त्याच्या पार्थिव देहावर अत्यसंस्कार करण्यात आले दु खावेग सहन न होऊन त्याच्या मातोश्री आणि विधवा पत्नी लिना बेशुद्ध झाल्या. त्या वेळी गुरुदत्त काकोडकर लिनाला हा नाटकी प्रकार थाबव असे म्हणाले. हे शब्द ऐकणाऱ्या अनेकाना आश्चर्याचा धक्का बसला.

बादोडकराच्या कुटुबियाना आपण नकोसे आहोत हे माहीत असल्याने सिद्धार्थचे दिवसपाणी झाल्यावर लिना मुबईस परतली. आता या साऱ्या प्रकाराची केंद्रीय गृहखात्यामार्फत चौकशी होणार असल्याने या प्रकरणी गोवेकराच्या मनात असलेल्या शंका दूर होतील आणि या प्रकाराबाबत असमाधानी असणाऱ्या लिनाच्या मनातील प्रश्नाना उत्तरे मिळतील. बादोडकर – कुटुबियाविरुद्ध जो गदारोळ उठविला जातो तोही कायमचा शमेल आणि म्हणूनच शशिकलाबाईनी या प्रकरणी होणाऱ्या चौकशीचे खुल्या मनाने स्वागत केले आहे त्याच्या राजकीय भवितव्याच्या दृष्टीनेही हा ठपका दूर होणे अगत्याचे आहे आणि त्या स्वतःही याबाबत अतिशय उत्सुक आहेत. ◻

## ◻ आता लक्ष राष्ट्रपतिभवनाकडे....

निवडणुकाची वावटळ सपली निकाल अपेक्षेप्रमाणे लागले आहेत असे म्हणता येणार नाही. जनतापक्षामधील बडखोर त्रासदायक ठरतील, असा अनेकाचा अदाज होता तो साफ चुकला. जनता पुन्हा मजबूतपणे जनतापक्षाच्या पाठीशी उभी राहिली. दिल्ली, मध्य-प्रदेश, बिहार आणि उत्तर प्रदेश यामध्ये जनतेची सरशी अपेक्षितच होती, परंतु कांग्रेसची पुन्हा एकदा इतकी केविलवाणी रेवडी उडेल, असे अनेकाना वाटत नव्हते, पण लोकानी ते करून दाखविले. ओरिसामधील नदिनीबाईंचा विजय अनपेक्षित नाही, परतु जनता-पक्षाला जे प्रचंड बहुमत मिळाले आहे ते थोडेफार अनपेक्षित आहे. एखादे वेळी देशात सर्वत्र एकाच पक्षाचे सरकार राहण्याचे दिवस आता सपले आहेत आणि लोकशाही रुजण्याच्या दृष्टीने ते काही वाईट नाही. पजाबमध्ये अकाली गटाची ताकद ओळखून जे शहाण-पण जनतापक्षाने दाखविले तेच शहाणपण बंगालच्या सेनबाबूनी दाखविले असते तर डावे कम्युनिस्ट जरा तरी आवाक्यात राहिले असते आणि पश्चिम बंगालमध्ये जनतापक्षाचा असा फजितवाडा उडाला नसता. सत्ता काबीज करण्याच्या गोष्टी करीत डाव्या कम्यु-निस्टावर यथेच्छ तोडसुख घेणाऱ्या सेनबाबूना आणि त्याच्या सग्या-सोयऱ्याना बगालच्या मतदारानी माती चारली. तिकडे मद्रासकडे फिल्मी सितारा एम्. जी. रामचद्रन स्वतःला मुख्य मंत्रीपदाचा राज्याभिषेक करवून घेणार हे स्पष्ट झाले आहे. बगाल आणि तामिळनाडूमध्ये राजकीय अस्थिरता निर्माण होईल असे जे वाटत होते– ते राजकीय निरीक्षकाचे मतही साफ खोटे ठरले दोन्ही ठिकाणी मतदारानी सुस्पष्ट कौल देऊन पाच वर्षे निरंकुश राज्य करू शकणाऱ्या राजवटीची स्थापना केली आहे. पाँडेचरीमध्ये – अण्णा डि. एम. के. ला टेकू देण्यास जनतापक्ष तयार आहे... कारण आता जनतापक्षाचे लक्षही राष्ट्रपतिभवनाकडे लागले आहे. राष्ट्रपति-भवनाचे दरवाजे आता कोणासाठी उघडणार ?... नावे तर खूप आहेत. लोकसभेचे सभापती निमल सजीव रेड्डी, विजयालक्ष्मी पडित, त्रिदिव चौधरी, छागला आणि बाबू जगजीवनराम इतकी नावे सध्या घेतली जात आहेत. जनतापक्ष आता कोणाची निवड करतो हे पाहायचे पतप्रधानानी राष्ट्रपति– निवडीबाबत विरोधी पक्षाशी बोलणी सुरू केली आहेत खरी, परतु या चर्चेचे स्वरूप पुष्कळसे सल्लामसलतीपेक्षा माहिती देण्यासारखे आहे. निलम, सजीव रेड्डी याची निवड म्हणजे इदिराबाईंना आणखी एक भीमटोला असे अनेकाना वाटते. ज्या रेड्डीच्या उमेदवारीअर्जावर सही करून बाईनी अखेरच्या क्षणी स्वत चे राजकारण मार्गी लावण्यासाठी त्याना तोडघशी पाडले त्या रेड्डीना राष्ट्रपतिभवनामध्ये नेऊन बसवावे असे बाईवर विशेष राग असणाऱ्या मडळीना वाटते. तसे केल्याने दक्षिणेमध्येही जनतापक्षाबाबत सहानुभूतीचे वातावरण निर्माण होईल असाही एक आडाखा आहे. विजयालक्ष्मी आणि छागला याना असलेली प्रतिष्ठा, प्रदीर्घ अनुभव आणि आणीबाणीच्या काळामधील त्याचे सुस्पष्ट धोरण यामुळे त्याच्या नावाचा उल्लेख केला जातो. छागलांचे वय त्याना त्रासदायक ठरेल, त्याची प्रकृतीही नरमच असते. विजयालक्ष्मी पंडित याच्या नावाला व्यापक पाठिबा मिळेल असे वाटत नाही. विजयालक्ष्मीबाईंनी निवडणूक प्रचारामध्ये हिरीरीने भाग घेतला असला तरी आणीबाणीची टागती तलवार डोक्यावर असताना त्यांनी केवळ गप्प राहून मूक – विरोध नोदविणे पसत केल्याने – जनतापक्षाने राष्ट्रपतिपदी त्याची निवड करू नये असे मानणारा एक गट आहे. बाबूजीनी– मंत्रिमडळामध्ये दीर्घकाळ काम केले आहे. १५ ऑगस्ट १९४७ पासून ते केंद्रीय मत्रिमडळा-मध्ये आहेत त्याना स्वत ला सर्वोच्च बहुमानाची ही मुकी खुर्ची स्वीकारणे कितपत पसत पडेल आणि त्याच्या नावाचा विचार झालाच तर चरणसिंग काय भूमिका घेतील हे स्पष्ट असल्याने त्यांचे नावही तुलनेने मागे हटते. जनतापक्षाचा उमेदवार ठरविला जात असताना जयप्रकाशजी आणि पक्षाध्यक्ष चंद्रशेखर याच्या मताला विशेष महत्त्व असणार आहे हे स्पष्टच आहे. पतप्रधान मोरारजीभाई आपला कल कोणाच्या बाजूने व्यक्त करणार यावरही पुष्कळसे अवलंबून आहे, पण आज जे वारे वाहात आहेत त्याची दिशा लक्षात घेता बहुधा निलम सजीव रेड्डी याचे पारडे जास्त जड वाटते. ◻

# टेक इट लाईटली

संजीव मंगरूळकर

## माजी मुख्य मंत्री शंकरराव

शंकरराव चव्हाण हे एक तसे मोठे भारदस्त आणि पीळदार व्यक्तिमत्त्व आहे. त्यांची आणीबाणीच्या काळातील कार्यतत्परता आणि कर्तव्यकठोरता सर्वश्रुत आहे. आणीबाणीपूर्वकाळातला शासकीय कर्मचाऱ्यांचा संप त्यांनी ज्या रीतीने हाताळला आणि नंतर त्या कर्मचाऱ्यांना जी यथायोग्य वागणूक दिली तेव्हापासूनच त्यांच्या या व्यक्तिमत्त्वाचे एकेक पैलू आमच्या निदर्शनास येऊ लागले होते आणीबाणी लागू झाल्यानंतर तर इंदिराजी आणि त्यांचे कुटुंब यांची तनमनधन अर्पून सेवा करणारे भावुक यांत्रिक म्हणूनच त्यांची कीर्ती दिगंतात पसरू लागली होती इतकेच नव्हे तर आणीबाणी उत्कृष्ट रीतीने राबविण्याच्या त्यांच्या वाकबगारीचे तर साक्षात बाईंनीही कौतुक केल्याचे ऐकून होतो. आता निवडणुकीतल्या निकालानंतर आणि मुख्य मंत्रीपदावरून सक्तीची निवृत्ती झाल्यावरही त्यांचा हा पीळ तसाच असेल अशी काहीची अपेक्षा होती; पण परवाच त्यांनी दिलेल्या एका मुलाखतीतून मात्र शंकररावांचे आणखी काही नवेच पैलू रसिकांच्या ध्यानात आले.

या विलक्षण मुलाखतीत शंकररावजी म्हणतात –

**मी श्री संजय गांधी यांच्याविरुद्ध होतो...परंतु त्यांना महाराष्ट्रात दौरा करण्याचे निमंत्रण द्यावे म्हणून माझ्या काही सहकाऱ्यांनी माझ्यावर दबाव आणला. माझी सतावणूक केली**–या वाक्यातून शंकररावांचे एक वेगळेच चित्र आमच्या डोळ्यासमोर येते. त्यांच्या बाणेदार व्यक्तिमत्त्वाचा हा पोकळ भित्रा पैलू आम्हाला बराच नवीन आहे. शंकररावांवर दबाव आणून त्यांनाही सतावणाऱ्या या सहकाऱ्यांची नावे त्यांनी वस्तुतः सांगायला कुठलीच हरकत नसावी. आम्ही या सहकाऱ्यांच्या धैर्याचे चाहते आहोत. याच सहकाऱ्यांनी शंकररावांना पुढे असेही सांगितले की संजय गांधी हे युवकांचे राष्ट्रीय पातळीवरील नेते आहेत ! अशाच आशयाचे वाक्य स्वतः शंकररावांच्याच भाषणात त्यांच्या तोंडून ऐकल्याचे आम्हाला पुसटसे स्मरते. तेव्हा अर्थातच शंकरराव संजयची आरती ओवाळण्याच्या स्पर्धेत उच्च उच्च उडया मारीत असावेत. त्या वेळी तर त्यांनी संजय गांधी हे केवळ युवकांचेच नेते नसून थोरामोठयांचेही नेते असल्याचे स्फोटक शुभवर्तमान ऐकवून 'त्यांनीच आम्हाला मार्गदर्शन करावे' अशी करुणाही भाकली होती ही करुणाही त्यांनी आपल्या त्या सहकाऱ्यांच्याच दबावाने भाकली असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

आपल्या मुलाखतीत शंकरराव पुढे म्हणतात – **'श्रीमती गांधी अथवा श्री. संजय गांधी यांना पराभवानंतर दूषण देणे हे नीतीला धरून होणार नाही. ते शूरपणाचे ठरणार नाही. त्या वेळी माझ्या अंगी शूरपणा असता तर मी आक्षेप घेतला असता; परंतु आता मी त्यांना दूषण देणार नाही.'** या विधानात शंकररावांची नीतिविषयक जाण दिसून येते. फक्त एक शंका अशी की पराभवानंतर कुणाला दूषण देणे जर अनैतिक ठरते तर आणीबाणीच्या काळात कुणाची भरपूर स्तुती करून आणीबाणी उठविल्यावर 'तो मी नव्हेच' म्हणणे नैतिक कसे काय ठरते ? शंकररावांच्या नीतिविषयीच्या कल्पना खूपच लवचिक आणि सापेक्ष दिसतात. आणीबाणी चालू असता तिला विरोध करण्याचा शूरपणा शंकररावांजवळ नव्हता असे सांगण्यात त्यांचा स्पष्टवक्तेपणा दिसतो. फक्त मग प्रश्न एवढाच की आपल्या नामर्दपणाची जाणीव असलेल्या माणसाने सत्तास्थानावर हट्टाने चिकटून राहाणे नैतिक कसे ?

**आपल्या या सर्व कमकुवतपणाची कबुली देऊनही शंकरराव स्पष्ट शब्दात सांगतात– आणीबाणी आणण्यात माझा प्रत्यक्ष हात नव्हता. तो निर्णय माझा नव्हता.** हे विधान शंकररावांच्या विनोदीपणाची साक्ष देते. आणीबाणीच्या निर्णयाशी शंकररावांचा अगदी दूरान्वयाने सुद्धा संबंध असेल अशी आम्हाला मुळीसुद्धा शंका नव्हती. आणीबाणीचा निर्णय बराच महत्त्वाचा आणि धाडसी निर्णय होता. तो निर्णय घ्यायलासुद्धा बरेच 'गट्स्' लागणार हे उघड आहे. शंकररावांच्याने होणारे हे काम नाही याची सगळ्यांनाच बालंबाल खात्री असताना, 'माझा त्याच्याशी काही संबंध नाही अशी भुई धोपटण्याची वस्तुतः काहीच गरज नव्हती, पण आपल्या विनोदी विधानाबद्दल शंकरराव पूर्वीपासूनच प्रसिद्ध आहेत

तर अशा रीतीने या मुलाखतीतून शंकररावांच्या बहुढंगी व्यक्तिमत्त्वाचे काही अज्ञात पैलू आपल्याला दिसतात. एवढे असूनही शंकररावांचे आणीबाणीशी इमान कायम आहे. आणीबाणीचे समर्थन ते अगदी हिरीरीने करतात. आणीबाणीचे फायदे मनापासून सांगतात. भीतीशिवाय शिस्त नाही असाही सिद्धान्त मांडतात. आणीबाणीच्या अतिरेकाची जबाबदारी मात्र नोकरशाहीवर ढकलून देतात. बिचारी नोकरशाही ! मुकी असल्याने नोकरमंडळी असले आरोप उलथू शकत नाही आणि काँग्रेसी मंडळींना त्याचा मोठाच फायदा होत असतो, पण जनतेने काँग्रेसचे पाणी जोखले आहे लोकसभेपाठोपाठ विधानसभा– निकालही हातात येत आहेत. ते ऐकूनही शंकररावांचे हे नैतिक शौर्य अढळ राहो ही ईश्वराचरणी प्रार्थना ! ◘

## पुन्हा एकदा १०+२+३

दहा अधिक दोन अधिक तीन या आपल्या नवीन शिक्षणपद्धतीच्या रोमांचकारी प्रगतीचा एक धावता आणि रंजक आढावा मागच्या एका लेखात मी घेतलाच आहे. वेगवेगळ्या

वृत्तपत्रा – साप्ताहिका–मासिकातून त्यावर अगदी भरपूर आणि साधंत चर्चाही झाली आहे तेव्हा त्याबद्दल आता पुन्हा काही तसेच लिहिण्याचा माझा मानस अर्थातच नाही. कारण कुठलाही विनोद फार वेळा चघळला की त्याची मजा जाते. त्यातून शिक्षणातले असले विनोद हे भारीच नाजूक प्रकृतीचे असतात. राजकारणातल्या दणकट विनोदांप्रमाणे ते काही सारखे चघळूनही टिकत नाहीत. तरीदेखील काही थोड्याच दिवसापूर्वी या संदर्भात घडलेली एक घटना थोडीशी वैशिष्टयपूर्ण आहे. म्हणजे घटना तशी नेहमीसारखीच आहे, पण तीवरच्या प्रतिक्रिया मात्र 'खास' चिंतनीय आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा या विषयावर लिहिण्याची दुःखद वेळ येत आहे.

नुकतेच आपले ( म्हणजे महाराष्ट्राचे ) नूतन मुख्य मंत्री पुण्यात आले आणि त्यांच्या आगमनाच्या या पवित्र समारंभाला गालबोट लागावे असा एक प्रसंग पुण्यनगरीत घडला. बारावी – एफ्. वाय्. च्या काही सतप्त विद्यार्थ्यांनी आपल्या लाडक्या मुख्य मंत्र्यांना घेराव घातला आणि आपले तेच तेच गाऱ्हाणे ( जे आता आपल्या मुख्य मंत्र्यानाही चागले तोडपाठ झाले असेल ! ) पुन्हा पुन्हा मांडण्यास सुरुवात केली. येथपर्यंत सारे ठीक झाले. जिवंत लोकशाही राष्ट्रामध्ये आपल्या प्रिय नेत्यांना एकटे गाठून त्याची अशी भेट घेण्याचे प्रसंग येणारच; पण या वेळी मात्र नुसते गाऱ्हाणे मांडून शांतपणे परत न जाता विद्यार्थ्यांनी चक्क अरेरावीची, उद्धटपणाची, शिष्टपणाची, उर्मट वगैरे भाषा वापरली. काहीनी तर आपल्या मुख्य मत्र्यांनी खुर्चीच सोडावी अशीही एक टूम काढली. आता लोकसेवेसाठी आपला राजकारणसंन्यास सोडून सत्तेच्या खाईत उडी घेणाऱ्या आपल्या मुख्य मंत्र्यांनी खुर्ची सोडावी असा आग्रह धरणे म्हणजे शुद्ध वेडेपणाच नव्हे काय ? याही पुढे जाऊन काही विद्यार्थीमंडळींनी अर्वाच्य, अश्लील, आचरट भाषा वापरली असे ऐकतो. मी स्वतः काही या वेधक समारंभाला उपस्थित नसल्याने 'ती भाषा कुठली याविषयी मी अगदीच अजाण आहे आणि ती भाषा अगदी कमालीची अरेरावीची असल्याने वृत्तपत्रानाही ती छापणे संकोचाचे वाटले असावे. आता असा समरप्रसंग उद्भवूनही महाराष्ट्राचे मुख्य मंत्री शांतचित्त राहिले आणि विद्यार्थ्यांशी तशाच सौम्यपणाने वागून त्यानी तो प्रसग निभावून नेला.

तर असा हा एवढा सनसनाटी प्रसंग घडल्यावर त्याचे पडसाद पुण्याच्या चौकाचौकात, वृत्तपत्रावृत्तपत्रात उमटणारच. त्यानुसार सर्वच उत्साही मंडळींनी आपली प्रतिक्रिया मनापासून नोंदविली. विद्यार्थ्यांचा निषेध करण्यात आला. पुण्यातली ही छोटी मुले इतकी बिघडावीत याबद्दल विषाद व्यक्त करण्यात आला. हल्लीच्या मुलाना अगदीच पाचपोच नसून ती संस्कारशून्य बनत चालली असल्याचे काहीना जाणवले. काहीना या सर्व गोष्टीमागे हिंदी सिनेमांचा हात असावा असेही वाटले. सारांश विद्यार्थ्यांकडून हा महान प्रमाद घडल्याचे सर्वांनाच अगदी मनापासून जाणवले. कमीत कमी मुख्य मंत्री व आपण (विद्यार्थी) यातील वयाचे अंतर तरी त्यानी लक्षात घ्यावयाला पाहिजे होते असे त्याना वाटले आणि यावर तोड म्हणून सदरहू वात्रट विद्यार्थी हे 'आपले विद्यार्थी' नव्हते असेही विद्यार्थी परिषदेने जाहीर केले. अशा रीतीने या प्रकारावर थोडाफार पडदा पडला.

तरीदेखील प्रतिक्रियांच्या या सर्वसामान्य प्रवाहाहून भिन्न असा थोडा स्वाभाविक विचार यावाबत कुणी तरी करावा अशी अपेक्षा आहे विद्यार्थ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर निर्णय घेण्यास आपल्या शासनाला एवढा दीर्घ कालावधी लागावा हे कदाचित आपल्या शासनाच्या सावधानतेचे, विचारप्रवृत्तीचे द्योतक असले तरी त्यामुळे बापड्या विद्यार्थ्यांचे हाल झाले हे जगजाहीर आहे तेव्हा हे हाल विद्यार्थ्यांनी शांतचित्ताने आणि हसतमुखाने स्वीकारावेत, त्यावर थड चर्चा कराव्यात हे विचारही तात्त्विक दृष्टीने अगदी योग्य असले तरी हे होणे खूप अवघड आहे. तरुण विद्यार्थ्यांनाही अन्यायाची चीड येणे शक्य आहे आणि त्यावर प्रत्येकाची प्रतिक्रिया वेगळी असणेही स्वाभाविक आहे. कुणा एकाची प्रतिक्रिया थोडी तीव्र असली तरी ते समजण्यासारखे आहे. मुख्य मंत्र्याचा शातपणा ही काही फार विशेष स्तुत्य गोष्ट नाही. कारण अन्याय विद्यार्थ्यांवर झालेला आहे आणि दिरंगाईच्या असल्या कामात हा असला शातपणाच नडतो. विद्यार्थ्यांकडून शातपणाची अपेक्षा आम्ही नेहमीच करीत राहू; पण उद्या याबाबत अजूनही दिरंगाईचेच धोरण राहिले तर काही विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया आणि निषेधाचे मार्ग बदलण्याचीही शक्यता आहे. हा बदल स्तुत्य नसेलही; पण तो अपरिहार्य असेल. सामान्य माणसांना विनोबाजींसारखा समतोल थोडाच साधतो ! □


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य
या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

। मॅक्झिम गॉर्की ।

। सुमती देवस्थळे ।

मूल्य दहा रुपये

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ पुणे ४११ ०३०

पोलंड, चेकोस्लोव्हाकिया, पूर्वजर्मनी....

# आयर्न ट्रँगलमधला सामान्य माणूस कसा जागा होत आहे...

चन्द्रशेखर पुरंदरे

पोलंड, चेकोस्लोव्होकिया आणि पूर्व जर्मनी ही कम्युनिस्ट आधिपत्याखालील तीन राष्ट्रे युरोपात 'आयर्न ट्रँगल' म्हणून ओळखली जातात. रशियाच्या धर्तीवर राज्यव्यवस्था असल्याने या राष्ट्राच्या घटनेत अभिव्यक्ती स्वातंत्र्य अनुस्यूत नाही प्रस्थापित शासनाविरुद्ध मूलभूत स्वातंत्र्याच्या मागणीसाठी या देशातील सामान्य माणूस कसा जागा होत आहे आणि अनंत काळपर्यंत समाजवादाच्या गोंडस नावाखाली स्वातंत्र्याच्या गळचेपी करणाऱ्या या सरकाराना आपल्या कुवतीनुसार कसा आव्हान देतो आहे हे पहाणे देशाच्या इतिहासात आपण नुकतेच एक महत्त्वपूर्ण वळण घेतले असल्याने उचित ठरेल.

प्रथम् पोलंडचा विचार करू. दुसऱ्या महायुद्धानंतर कम्युनिझमची पकड घट्ट झालेला हा देश. डिसेंबर १९७५ पासून असंतोषाला वाचा फुटायला सुरुवात झाली. एडवर्ड गीरेक या पक्षनेत्याने (पोलंडवर राज्य करणाऱ्या पक्षाच्या नेत्याने) या सुमारास घटनादुरुस्तीची कलमे मांडली. त्यातील दोन कलमाना विरोध झाला. पहिले कलम 'रशिया आणि पोलंड यांच्यातील अतूट मैत्रीसंबंधाची ग्वाही देणारे व भविष्यात तिची अशीच प्रगती होत राहो अशी आशा करणारे होते. दुसरे कलम अधिक धूर्त होते. ते नागरिकाचे हक्क हे त्याने देशाच्या केलेल्या सेवेनुसार त्याला मिळणारे असावेत असे होते. याचा अर्थ असा की, जोपर्यंत सरकारच्या अपेक्षेनुसार नागरिक कर्तव्य पूर्ण करीत नाही, तोपर्यंत त्याला सरकारकडून कोणतेही हक्क मंजूर होणार नाहीत. यावर तीव्र प्रतिक्रिया उमटली. देशातील ३९ बुद्धिवंतांनी पोलंडचे पार्लमेंट—'सेज्म' याला एक उघड पत्र पाठवून विरोध दर्शविला. पाठोपाठ आणखी चारशे बुद्धिवंतानी या पत्राला पाठिंबा दर्शविला.

कॅथॉलिक चर्च या जबर संघटनेने 'अस्तित्वाचे भविष्यकालीन हनन' असा दृष्टिकोन या कलमात असल्याचे सांगून प्रवचने, उपदेश व भाषणे यांद्वारे आपला विरोध नोंदवला. त्याचप्रमाणे सरकारी अधिकाऱ्याच्या खाजगी भेटी घेऊनही मतभिन्नता दर्शविण्यात आली.

वातावरण अशा रीतीने पुरेसे तापत असतानाच प्योत्र जारोस्झेविक्ज या पोलंडच्या पंतप्रधानाने २४ जून १९७६ ला नवी भाववाढ जाहीर केली. भाववाढ होईल अशी लोकाची अपेक्षा होती; पण अपेक्षित किंमतीच्या दुप्पट या किंमती होत्या. दुसऱ्या दिवशी देशव्यापी हरताळ पडला आणि सध्याकाळी पंतप्रधानाने किंमती उतरविल्या. या हरताळाचे देशव्यापी स्वरूप सरकारला अनपेक्षित होते. लोक आपल्याच पाठीमागे असण्याचा हस्तिदंती मनोऱ्यातील दावा लक्तरे होऊन डोळ्यांपुढे लोंबू लागताच सरकारने कडक उपाययोजना सुरू केली.

या हरताळात भाग घेतलेल्या कामगारावर फार अत्याचार करण्यात आले. त्याच्या रक्षणासाठी एक समिती स्थापन झाली. कुरॉं हा इतिहासतज्ज्ञ तिचा प्रमुख नेता आहे. ही समिती लोकांच्या स्वतंत्र जीवनाच्या आकांक्षाचे प्रतीक बनली आहे. सामूहिक दडपशाही विरुद्ध चौकशीसमिती नेमावी अशी तिची प्रमुख मागणी होती. चौकशीसमितीचा एक फार्स करण्यात येऊन पोलिसानी केलेल्या अनन्वित अत्याचाराचे ढळढळीत पुरावे नाकारून ५ जानेवारी १९७७ ला प्रॉसिक्युटर जनरलने कामगाराच्या समितीचे आरोप निराधार असल्याचे जाहीर केले.

या साऱ्या प्रकाराविरुद्ध संपूर्ण पोलंडमध्ये प्रचंड जनमत जागृत होत आहे. संपूर्ण प्रेस कामगार या हक्क रक्षण समितीला 'देशद्रोही, लोकशाहीविरोधी, समाजवादविरोधी' ठरवून मोकळा झाला आहे. परंतु तरीही किंबहुना त्यामुळेच लोकांचा अनपेक्षित पाठिंबा या कामगार–हक्क–रक्षण-समितीला मिळाला आहे.

या मालिकेतला दुसरा देश चेकोस्लोव्हाकिया आतापर्यंत राजवटीविरुद्ध आवाज सगळ्यात तीव्रतेने या देशात उठलेले आहेत आणि अजून लोक दडपणाखाली असल्याने सरकार तो दडपण्यात यशस्वी झाले आहे; परंतु 'चार्टर ७७' या नावाने प्रसिद्ध झालेल्या जाहीरनाम्याने परत एकदा संघटित आवाज याविरुद्ध उठविला आहे.

आन्तरराष्ट्रीय करारान्वये १९६८ साली जे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय हक्क सर्व देशाना देण्यात आले, त्याला मूर्त स्वरूप चेकोस्लव्हाकियात १९७६ साली मिळाले. मार्च १९७६ ला तसा कायदाच पास करण्यात आला. हा प्रकार म्हणजे ढोंगीपणाची परिसीमा आहे. जे हक्क त्या जनतेला कधी मिळालेच नाहीत ते पूर्वीपासून चेक लोक उपभोगीत आहेत आणि भविष्यातही उपभोगीत रहातील असे सरकारने जाहीर केले. भोंदूपणाचा संताप येऊन एका पत्रकान्वये २४२ बुद्धिवंतानी सरकारने जनतेचा विश्वासघात केला आहे असे जाहीर

केले. त्यापाठोपाठ आतापर्यंत कधीच राजकीय क्षेत्रात नसणाऱ्या २५० बुद्धिवतानी त्याला पाठिबा दर्शविल्यावर सरकारचे पित्त खवळले. हे पत्रकही चेक वृत्तपत्रात, ती सरकारच्याच कक्षेत येत असल्याने, प्रसिद्ध झाले नाही. ते प्रसिद्ध झाले पश्चिम युरोपीय वृत्तपत्रात ७ जानेवारी १९७७ ला.

तावडतोब दमनशाहीची चक्रे फिरू लागली. ६ व्यक्तींनी पत्रकावर सह्या केल्या म्हणून त्यांना पकडण्यात आले, चौघावर देशद्रोहाच्या आरोपावरून खटले भरण्यात आले. बाकी चारशेजणांना तृतीय दर्जाच्या गुन्हेगाराप्रमाणे रोज पोलिसचौकीवर हजेरी लावण्याचा आणि चौकशीला उत्तरे देण्याचा अपमानास्पद हुकूम देण्यात आला. त्यांना जामीन नाकारण्यात आले. चेक प्रेसने नेहेमीच्याच सुरात यांना बूर्ज्वा, भांडवलशाहीचे हस्तक, ट्रॉट्स्कीचे अनुयायी, झिऑनिस्ट, प्रतिक्रियावादी क्रान्तिद्रोही वगैरे विशेषणे बहाल केली.

पण चेक सरकारलाच 'आश्चर्य म्हणून चार्टर' ७७ च्या मागण्या–ज्या मूलभूत मानवी स्वातंत्र्याची निःसंदेह घोषणा करण्याबद्दल होत्या– त्या युरोपातील इतर राष्ट्रातील कम्युनिस्ट पक्षानी (इटली, फ्रान्स, स्पेन, इंग्लंड, स्वीडन, डेन्मार्क आणि बेल्जियम) उचलून धरल्या. त्यानी एकमुखाने रशियन धर्तीवरच्या दडपशाहीचा धिक्कार केला आणि साडेचारशे बुद्धिवंतांच्या छळाबद्दल सरकारला पूर्ण दोषी धरले. ऑस्ट्रेलियाने या लोकाना राजकीय आश्रय देण्याची तयारी दर्शविली आणि कार्टर सरकारने पहिले आन्तरराष्ट्रीय राजकीय परिस्थितीवरचे मत म्हणजे चार्टर'७७ ला संपूर्ण पाठिंबा दर्शविला. त्यामुळे आणि ग्रीस, जपान, रुमानियातील प्रमुख लेखकांनी तसेच रशियाच्या सखारोव्हने या सरकारचा धिक्कार केल्याने सरकारला प्रकरण जड जात आहे. त्यात भर म्हणून अटक केलेल्यावर देशद्रोहाच्या आरोपाखाली खटले भरले हे पूर्वयुरोपातील एकमेव प्रकरण आहे. त्या सहा जणातले चार ज्यू असल्याने सरकारच्या हेतूविषयी आणखी संशय उत्पन्न झाला आहे.

तिसरा देश पूर्व जर्मनी. हा इतर दोन देशाच्या मानाने समृद्ध आहे, पण याच्या पुढचा प्रश्न चांगलाच बिकट आहे येथे सर्वत्र हालचाल नाही, पण सामान्य माणूस वैयक्तिकरीत्या राजवटीला किती कटाळला आहे ते दर्शवणारी प्रमुख घटना म्हणजे जून १९७५ पासून आजपर्यंत एक लाख लोकानी (वैयक्तिकरीत्या) निरनिराळ्या सबबींवर देश सोडून जाण्यास अनुमती मागितली आहे. यावरून लोकाच्या मनातून स्वदेश किती उतरला आहे हे लक्षात यावे. बहुतेकांनी देश सोडण्याचे प्रमुख कारण व कायदेशीर आधार म्हणून हेलसिंकी कराराकडे बोट दाखवले आहे. या वर्षीच्या जानेवारीत पूर्व जर्मनीतील पूर्व बर्लिनमधील पश्चिम जर्मनीच्या वकिलातीसमोर देश सोडण्याच्यासंबंधी कायदेशीर सल्ला घेण्यासाठी प्रचड रांगा लागल्या होत्या. सरकारने सैनिकाचा पहारा बसवला; पण भावी असतोषाचे परिणाम कळताच दोन दिवसात पहारा उठला. त्यात भर पश्चिम जर्मनीच्या पद्धतशीर प्रचाराची पडली आहे. विली ब्रांटच्या कारकीर्दीत दोन्ही देशांत दळणवळण सुरू झाले आणि हेल्मुट श्मिटच्या गेल्या चार वर्षांच्या राज्यात जे जे पश्चिम जर्मनीला भेट देऊन परत पूर्व जर्मनीला आले, ते अस्वस्थ होऊनच.

या प्रकाराला आतापर्यंत दोघानीच तोड फोडले. एक वोल्फबीरमान हा बॅलेलेखक व गायक जो आज हद्दपार आहे, आणि दुसरा प्रोफेसर रोबेर्ट हावमान. प्रोफेसरसाहेबाची युनिव्हर्सिटीतील जागा, पक्षाचे सभासदत्व रद्द करण्यात आले. नोव्हेंबर ७६ पासून तो त्याच्याच घरात स्थानबद्ध आहे. १९६४ साली त्याने सार्वत्रिक निवडणुका, वृत्तपत्रविचार वगैरेची स्वातंत्र्ये अशी मागणी केली व आजतागायत ती करत आलेला आहे. 'नॉयएस डॉइचलाण्ड' या वत्तपत्राने सरकारच्या बाजूनेच बुद्धिवत कसे आहेत ते दाखवण्यासाठी अनेक सास्कृतिक क्षेत्रातील विद्वानाची हावमानवर टीका करणारी पत्रे प्रसिद्ध केली. याचा नेमका उलटा परिणाम झाला. ज्या अर्थी एवढ्या सख्येने लोक एकट्यावर तुटून पडत आहेत त्या अर्थी तो काही तरी जबर म्हणत असला पाहिजे असे मत झाले. बीरमान हा गायक युवकात व विद्यार्थ्यांत फारच प्रिय आहे हीही सरकारला संभाव्य धोक्याची निशाणी वाटते; पण इतर दोन देशासारखा इथला प्रश्न साधा नाही. जेव्हा सामान्य माणूसच देशाला विटतो तेव्हा प्रश्न फार गंभीर बनतो.

तीनही सरकारे आता थातुरमातुर सवलती जाहीर करून व त्याच वेळी मुस्कटदाबी जोराने सुरू करून जनतेचा आवाज लुप्त करण्याचा प्रयत्न करत आहेत. तीच सरकारे जनौघात केव्हा लुप्त होतात ते पहायचे. □


# पॅपिलॉन
# पॅपिलॉन

लेखक : हेन्री शॅरीयर
अनुवाद : रवींद्र गुर्जर

किंमत : पंचवीस रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

कथा

# माझ्या तीन सास्वा

सौ. मंदाकिनी चिपळूणकर

उगीचच चाळत असलेलं हातातलं मासिक पटकन खाली फेकीत, मी माझ्या सासूबाईंकडे नर्व्हसपणे पाह्यलं. मनाशी हजारदा ठरवलेलं भाषण मी पार विसरून गेले. माझ्या तोंडून काही वेगळंच बाहेर पडलं, 'आई, अशोकन आज मला लग्नाबद्दल विचारलं...' विणकाम करणारे त्यांचे हात एक निमिषमात्रच स्थिरावले. त्यांचे घारे डोळे एक निमिषच माझ्यावर रोखले गेले. मग नजर विणकामाकडे परत वळवीत त्यांनी शांतपणे पण हलक्या आवाजात विचारलं, 'मग तू काय उत्तर दिलंस?' 'मी—मी, अद्याप काहीच उत्तर दिलं नाही!' माझ्या नेहमीच्या घाबरट सवयीनुसार मी माझ्या वेणीशी खेळत उत्तर दिलं 'आधी तुम्हाला सागावं, विचाराव, अस मला वाटलं...' विणकाम परत सुरू करीत त्या म्हणाल्या, 'हे बघ मेधा, आता माझा तुझ्यावर काही हक्क नाही, अधिकार नाही राह्यला बेटी!' त्याच्या या खिन्न उद्गारावरून, माझ्या बातमीन त्या खूपच दुखावल्या गेल्या असाव्यात असं मला वाटल. मी पटकन उठले. त्याच्या पायाशी बसून त्याच्या मांडीवर डोके टेकीत आसूभरल्या आवाजात मी म्हटल, 'अस नका म्हणू आई, असं नका म्हणू! तुम्हीच माझ्या आई आहात. श्री गेल्यापासून आणि त्याआधीपासूनही तुम्ही मला मुलीसारखं वागवलंत. माझे आईबाबा कसे होते, केव्हा गेले हे मला आठवतही नाही तुम्ही मला तुमच्या पंखाची सतत सावली दिलीत. श्री गेल्याचं दुःख, त्या धक्क्यान झालेल माझ abortion, सगळ्यासगळ्यातून मला सावरलत ते तुम्ही, आई! तुमची एकुलती एक आधाराची काठी श्री, ती पण देवान हिरावून नेली; पण ते दुःख विसरून, पचवून तुम्ही मला सावरलत. डोंगराएवढे उपकार आहेत तुमचे माझ्यावर!' 'ते जाऊ दे मेधा, तुझं अशोकवर प्रेम आहे का?' डोळे वर उचलून न पाहताच आईंनी विचारले सुस्कारत मी उत्तरले, 'होय, आहे, पण श्रीवरचं प्रेम नि हे प्रेम वेगळं आहे. माझी चूक झाली का आई? नवरा, मुलंबाळं याची इच्छा धरणं... आई, आत्ता कुठं मला चोविसाव पुर होत आहे..'

'नाही, नाही पोरी, तुझं यात काहीच चुकल नाही. मीच स्वार्थी आहे. मला तू सारखी जवळ असावीस असं वाटतं. तू जाणार ही कल्पनाच सहन होत नाही मला!' आई आवेगानं म्हणाल्या.

'आई, स्वार्थी तुम्ही नाही, स्वार्थी आहे मी! आई, क्षमा करा मला. मी माझ्याच सुखाच्या विचारात दग राह्यले. आई, अशोकशी लग्न केलं तरी मी तुम्हाला माझ्याबरोबर घेऊन जाईन!'

माझ्या केसावर स्नेहभरानं हात फिरवीत आई किंचित हसत म्हणाल्या, 'वेडी रे वेडी. पण मेधा, या लग्नान तू कोणती परिस्थिती स्वीकारत आहेस, याचा पूर्ण विचार केला आहेस ना?' 'होय आई, पूर्ण विचारान्तीच मी हा निर्णय घेतला आहे. अशोकला मी पूर्ण सुखी करीन. त्याच्या मुलाची पण इतकीशी काळजी करीत नाही. त्याला मी नक्की आपलासा करीन. मला काळजी, भीती वाटते आहे ती अशोकच्या सासूबाईंची. त्याच्या लेकीची जागा मी घेत आहे अरुणा गेल्यापासून आज तीन वर्षं त्या जावयाची देखभाल करीत आहेत. त्याना हे लग्न कितपत आवडेल, जरा शंकितच होतं मन. शिवाय अशोकचे आईबाबा—पण ते बिचारे अशोकच्या सुखातच आपलं सुख मानताते... अय्या, आई, या लग्नानं काय गंमत होणार आहे, लक्षात आल का तुमच्या? अहो, मला तीन सास्वा लाभणार आहेत...हो, पण खऱ्या तर तुम्ही मला सासू वाटतच नाही! तुम्ही नावाच्या सासूबाई, अरुणाची आई ती अशोकची सासू—म्हणजे पर्यायान माझी पण—आणि अशोकच्या आई, त्या तर माझ्या हक्काच्याच सासूबाई. आई, माई न् सासूबाई.. बाई बाई, या सर्वांशी मी कसं जमवून घेऊ?' मी विचारमग्न होत असतानाच मला उमदा, बलवान, शांत अशोक न् छोटा गोड अजित आठवला काही हरकत नाही. या माझ्या दोन लाडक्या जिवाकरिता मी सगळ करीन.

लग्नाच्या दिवशीसुद्धा मी कुठल्याच शंकाकुशंकाना मनात थारा दिला नाही. अगदी साध्या समारंभान आम्ही एकमेकाचे झालो नतर छोट्या अजितला हातानं पुढ ओढीत अशोक त्याला म्हणाले, 'अजित, ही तुझी आई बर का!' अजितनं पटकन माझ्या हातात हात गुंफीत मला हाक मारली. 'आई!' झपकन खाली वाकून त्याचा पापा घेतला. आम्हा दोघाच्या डोळ्यात पाणी आलं. मी सहज सगळीकडे नजर फिरवली अन् मला दिसली अरुणाची आई—माई! त्याच्या दृष्टीत मला दिसला द्वेष, दिसली असूया! अशोकचे आई-वडील आनदान हास्यान त्याचे चेहेरे फुलले होते—आणि आई—आसू नि हसू याच मजेदार मिश्रण त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होत. आम्ही दोघानी खाली वाकून सर्वांना नमस्कार केले......सर्वांचे आशीर्वाद ग्रहण करून आम्ही निघालो—

लग्नानतरचे पधरा दिवस आम्ही उत्तर भारताच्या सफरीत घालविले. माझ न् अशोकचं छान जमलं. आम्हा दोघाना जणू एकमेकाकरताच निर्माण केल होत ईश्वरानं—मी पुनर्लग्न करण्यात चूक केली अस एकाही क्षणी मला वाटल नाही. स्वर्गात विहार करीतच मी घरी परतले. घरी परतताच मात्र मी दणकन पृथ्वीवर आदळले. कारण, दाराशी आमची टॅक्सी थाबली तेव्हा अजित बाहेरच खेळत होता. टॅक्सी पाहताच तो जो धूम घरात पळाला! त्याला प्रेमान पकडून अशोक म्हणाला, 'हे काय अजित, पळायचा

काय झालं ? आम्हाला 'या' नाही का म्हणायच? 'तरी पण अजित काही न बोलता सटकलाच आत. 'झालंय काय या पोराला ?' अशोक अचंब्यानं म्हणाला, पण अजितच्या या वागण्याच्या मुळाशी कोण असणार हे माझ्या पटकन् ध्यानात आलं; पण ते मी अशोकला कस सांगणार ? 'जाऊ दे रे, पोर आहे तो, येईल दोन दिवसांनी ताळयावर' 'पण आपण गेलो तेव्हा तर हा असा वागत नव्हता!' विचार करीत अशोक पुटपुटला. तेवढ्यात माई दारात दिसल्या तशी सर्वजण आत गेले. दोघांनी माईंना नमस्कार केला तो त्यांनी जरा नाराजीनंच स्वीकारला. पटकन सैंपाकघराकडे वळत त्या म्हणाल्या, 'चला जेवायला हातपाय धुऊन!' वरपांगी चेहरा हंसरा न् आवाज गोड वाटत होता खरा! 'इतका त्रास कशाला घेतलात माई, मी केला असता ना सैंपाक!' असं मी म्हणताच भुवयांची कमान उभी राहली. 'नेहमीच जेवण मी बनवते, त्यात त्रास कसला!' रागानं मी ओठ चावले; पण म्हटल आल्याआल्या वादावादी नको मुकाट्यान जेवण झाली सबंध जेवणभर अजित गप्पगप्पच होता. आम्ही पण त्याला बोलता करण्याचा प्रयत्न केला नाही. जेवण होताच मी मागच्या आवराआवरीला सुरुवात केली. मला अडवीत माई म्हणाल्या, 'मी आवरते, तू जाऊ शकतेस! नाही नाही माई, – मी तुम्हाला माई म्हटलं तर चालेल ना ?' त्या जरा घुटमळत म्हणाल्या 'हो, चालेल ना!' लवकर लवकर आवरायला पाहजे. टी. व्हीवर माणिक वर्माचं गाणं आहे.' 'अय्या! तुम्हाला पण माणिक वर्मा आवडते-मला पण! मग लवकर आवरायला माझी मदतच होईल की!' तोडानं बडबडत, त्याना गुंतवत ठेवत मी झटपट सर्व आवरल, त्याच्या नकळत! टी. व्ही. बघायला जोडीन कोचावर टेकलो तेव्हा अशोकचं पसतीच स्मित बघून मला इतक बर वाटल. नंतर जरा वेळानं मी आईंना फोनवरून आम्ही आल्याचं कळवलं. 'सगळ ठीक आहे, आई, पण तुम्ही स्वत:च येऊन भेटा ना उद्या दुपारी; मग केव्हा येता ? मी तुमच्यासाठी खास भेटवस्तू आणली आहे' मी त्याना बोलावलेल माईंना आवडेल का, हा विचार मला नंतर सतावू लागला. थोड्या वेळानं मामजी आणि सासूबाई आल्या. त्यांनी प्रेमभरानं आम्हा दोघांना थोपटलं. सासूबाईंनी मला खांद्याला धरून प्रेमानं जवळ घेतलं तेव्हा तर माझ्या डोळ्यात नकळत पाणी उभं राह्यलं माईंकडे वळत सासूबाई म्हणाल्या; 'बऱ्या आहात ना माई ?' दोघींच्या चेहऱ्यांवरचे भाव निरखीत मी मनात म्हटलं, 'इथं पण काही सरळपणा नाही दिसत!' म्हणजे परिस्थिती आणखीच बिकट आहे म्हणायची! दुसरे दिवशी आई आल्या अन् माझी भीती खरी ठरली. 'ही कोण नाक खुपसणारी आली' अशा तऱ्हेचं माईंचं वागणं होतं अस्थिर अशी १५।२० मिनिट गेल्यावर माई एकदम उठत म्हणाल्या, 'अजितची झोपेची वेळ झाली. त्याला आता मी...' माईंना पुरतं बोलू पण न देता पटकन उठत मी म्हटलं, 'मी झोपवते अजितला, तुम्ही दोघी निवांत गप्पा मारीत बसा!' 'नाही, 'नाही नाही, तो माझ्या कामाचा एक भागच आहे. जावयाच्या घरी फुकट राहणं मला आवडत नाही!' अस तिरकं न् तिखट उत्तर माझ्या तोंडावर फेकून बाई चालूही लागली.

'सगळं खोटं! आपल्या मनाप्रमाणे घर चालाव म्हणून ही सबब आहे झालं!' माना वेळावीत आईंनी टीका केली–मला काही ती पसंत पडली नाही. माईंच्या प्रत्येक गोष्टीत आई दोष काढीत होत्या. 'असेल तसही! पण अरुणा गेल्यापासून आईंनी दोघाचं सर्व केलं आहे. त्याना दुसरं कुणीच नाही जवळचं. मी हट्ट धरला तर त्या बिचाऱ्या एकट्या पडतील.' मी सरस करीत म्हटलं, तेवढ्यात धारदार आवाजात आई उद्गारल्या, 'हो, माझ्यासारख्याच! अन् मी अजून जगते आहे.'

'आई, अस म्हणू नका. मला कुणालाही पोरकं करायच नाही. काही काळानंतर सर्व ठीक जमेल–नक्की! खात्री आहे माझी.'

दीर्घ सुस्कारा सोडीत आई म्हणाल्या, 'कुणास ठाऊक! पण माझं चित्त ठिकाणावर नाही बघ मेधा! ही बाई कशी वागते बघशील तू!' आणि झालं तसंच. मी किती प्रयत्न केले तरी माई काही स्वयंपाकाला हात लावू देईनात. 'माझ्या माणसाना काय आणि कसल जेवण आवडतं ते मलाच माहीत आहे,' असं म्हणत त्यांनी मला झिडकारून टाकलं. याचा अर्थ त्या मला 'त्याच्या माणसांतली' समजायला तयार नव्हत्या अद्याप! मी एखादी खुर्ची किंवा सेंटरपीस जरा जरी हलवला तरी त्याच्या ते लक्षात येई व त्या ते पूर्वीसारख करून ठेवीत. माझी कुठलीच कृती त्यांना पसंत पडायची नाही. एक दिवस संध्याकाळच्या जेवायच्या वेळी त्यानी अजितला आम्हाला बोलवायला सांगितलं. हॉलच्या दरवाजाशी येऊन अजितनं हाका दिल्या, 'बाबा, मेधाताई, आजी म्हणते जेवायचं झालंय!' अशोक एकदम उठून त्याच्या अंगावर ओरडला, 'काय म्हणालास तू तुझ्या आईला ?' अजित घाबरत, चाचरत म्हणाला, 'आजी म्हणते, तिचं नाव मेधा आहे.' अजितला पकडून त्याला हलवीत अशोक म्हणाला, 'हे बघ अजित, आजी कांहीही म्हणू दे, मेधाला तू आईच म्हणायला पाहिजे!' अजित हट्टीपणानं, ओठ मुडपून नुसताच उभा होता. परत त्याला दरडावीत ओरडला, 'काय, ऐकू आलं ना ?' 'हो!' असं हलकेच पुटपुटत अजित डोळे पुसत सैंपाकघरात गेला. त्याला जवळ घेऊन समजवावं अशी तीव्र ऊर्मी मला आली; पण अशोकच्या शिस्तीत व्यत्यय आणण मला बरं वाटेना. त्या रात्री कुणीच धड जेवलं नाही.

खोलीत गेल्यावर अशोकला मी म्हटलं, 'त्या बिचाऱ्या पोरावर इतका का रागावलास रे ? त्याचा काय दोष आहे ?' मला जवळ घेत तो म्हणाला, 'हे बघ मेधा, तू इतकी गोड मुलगी आहेस, आयुष्यात एकदा तरी तू कुणावर रागावली आहेस काय ? पण मला वाटत, अजितनं तुला मानाव, आई म्हणून मान द्यावा अस मला...'

'अरे, पण हळूहळू येईल गाडी वळणावर...'

'हं, गाडी वळणावर कोण येऊ देत नाही, घरात काय चालतं आहे हे मला कळत नाही अस समजू नकोस तू मेधू...'

'पण अशोक...' मला मध्येच तोडीत अशोक उत्तरला, 'पणबीण काही नाही. अरुणा गेल्यापासून त्यानी आमचं घर खूप छान सांभाळलं, कबूल आहे मला...पण आता हे घर तुझं आहे. तू माझी पत्नी आणि अजितची आई आहेस...हे त्यांना पटत नसेल किंवा पटवून घ्यायचं नसेल, पसंत नसेल...

तर त्यांनी दुसरीकडे राहावं. मी त्यांचा खर्च चालवीन...'

मला सगळं कळत होतं पण वळत नव्हतं. मला माझं घरातलं स्वामित्व हवं होतं; पण त्याकरता माईंना दुसरीकडे घालवायचं ही कल्पनाच मला सहन होत नव्हती...काय करावं ?

माईंच्या गुलाबाच्या झाडांना काही गेंदेदार फुलं आली होती. त्याचं कौतुक करीत मी अंगणात उभी होते तोच माई हर्षानं उद्गारल्या, 'यंदा खूप बहरणार हं गुलाब!' मी पण उत्फुल्ल नजरेनं गुलाब निरखीत म्हटलं, 'खरंच माई, कसे हो तुमचे गुलाब फुलतात–काय टप्पोरे नि सुंदर फूल आहे एकेक !' माई हसत म्हणाल्या, 'हं, त्याची युक्ती आहे. सर्वांनाच नाही साधत ते !' मी टाळी वाजवीत म्हटलं, 'खरं हो खरं ! मी आणि आईंनी गुलाब फुलवायचे लाख प्रयत्न केले; पण एकदासुद्धा मेले ते गुलाब टपोरलेच नाहीत. त्यांना केव्हा तुमची फुलं दाखवीन असं झालंय मला !' 'मी एक गेंद कापून देऊ का त्यांना द्यायला ?' त्यांनी असं विचारताच मी त्यांचा हात पकडीत विचारलं, 'खरंच देता ? कित्ती चांगल्या आहात तुम्ही माई. आईंना इतकं नवल वाटेल तुमचा हा गुलाबगेंद पाहून !' गुलाबाच्या एका अर्धोन्मीलित कलिकेकडे पाहत माई पुटपुटल्या, 'अरुणाला गुलाब फार आवडत असत ग !' त्यांच्या त्या एकाच वाक्यातून इतका एकलेपणा, पोरकेपणा उदासी डोकावली...

त्या उदासीन उद्गारांतून माझ्या मनात एक कल्पना घिरट्या घालू लागली– असं केलं तर– महिन्याभरानं माईंची पन्नाशी– येत होती. त्यांच्या लेकीसारखं– अरुणेसारखं –आपण त्यांचा वाढदिवस साजरा केला तर– बायकांच्यासाठी करीत नाहीत म्हणे ! आपण पन्नाशी करून त्यांना चकित केलं तर... अशोकानं तर मला वेड्यातच काढलं. 'वेडपट आहेस तू ! वाढदिवसानं काय माई खूष होतील असं वाटतं तुला ?' 'वेडगळ कल्पना आहे खरी– पण मला वाटतं, त्यांना आनंद वाटेल त्यापासून– आपला वाढदिवस कुणी तरी लक्षात ठेवून मुद्दाम साजरा करीत आहे– बायका बारीकसारीक गोष्टींनी सुद्धा खूष होतात. अशोक– तुला कल्पना नाही यायची त्याची– !' त्यांच्या माहेरची दोन माणसं, आई, बाबा आणि सासूबाई– अजितचे १।२ मित्र एवढीच माणसं बोलवायची. 'अरे, पण त्यांचं आजपर्यंत काय झालं आहे ? नवरा लवकर गेला, मुलीकडे राहायला आल्या तो तोही आसरा दुरावला. तू त्यांना आईसारखं मानतोस, अजितसारखा गोड नातू– एवढंच समाधान त्यांच्या गाठी आहे. आपण हौसेनं कौतुक केलं तर त्यांना खचितच आवडेल. छानपैकी गर्भरेशमी नऊ वारी साडी, चांदीचं ताट-वाटी...' माझ्या कल्पनेच्या एकेक धाग्यात अशोक पण अखेरीस गुंतत गेला. ... पण हे सर्व माईंच्या नकळत कसं घडवायचं ?... मी माझ्या मसलतीत सर्वांना सामावून घेतलं अन् ठरवलं– माईंचे भाऊभावजय त्यांना आदल्या दिवशी काही तरी निमित्ताने घेऊन जाणार– अजितला पण माझ्या बेताची कल्पना दिली– मात्र 'आळीमिळी गूप चिळी' चा संदेशही दिला. आश्चर्यानं त्यानं विचारलं म्हणे, 'तुला आजी इतकी आवडते ?' माझ्या होकारार्थी उत्तरानं तो जरा विचारातच पडला. मग मात्र माझी धावपळ सुरू झाली. मी माईंच्या आवडीची मद निळसर गर्भरेशमी– साडी– चांदीची भांडी, तसंच त्यांच्या गुलाबाच्या गेंदाकरता सुंदरशी फुलदाणी खरीदली. अशोक, अजितनं त्यांना थंडीकरता मऊ मुलायम लोकरीचा शुभ्र स्वेटर घेतला– तर अशोकच्या बाबांनी त्यांना काश्मिरी शाल घेतली. मी जेवणाचा स्पेशल मेन् आखला– अर्थात सासूबाई व आईंच्या मदतीनं– सर्व ठीक जमलं– आदल्या दिवशी ठरल्याप्रमाणे माईंना भाऊ येऊन त्यांना घेऊन गेला. दुसऱ्या दिवशी जेवायच्या वेळेपर्यंत आणून सोडतो असं सांगून– ( अर्थात् भाऊभावजय जेवायला येणारच होते; पण ते माईंना माहीत नव्हतं. आम्ही साग्रसंगीत सैपाक केला. माईंना नवी ताटवाटी मांडली. पलीकडच्या टेबलावर साडी व इतर प्रेझेंट्स ठेवली. त्यांच्या पानाभोवती सुंदर फुलांच्या रांगोळीत पन्नास हा आकडा गुंफला. माईंनी घरात पाऊल ठेवलं मात्र. सर्वजण एकसुरात ओरडले 'अभिनंदन, माई ५० वर्षं झाल्याबद्दल !' माई चकित झाल्या; पण त्याहून जास्त आनंदित झाल्या. तो सर्व थाटमाट केवळ आपल्याकरता, इतक्या खटाटोपानं केलेला पाहून त्यांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. ते लपविण्याकरता त्यांनी झरझर डोळ्यांची उघडझाप केली; तरी पण दोन आनंदाश्रु सांडलेच– मी व अजितनं दोन्ही हात धरले व त्यांना पानावर बसवलं– अजितनं तर त्यांना चक्क घास पण भरवला. त्याला पटकन कुरवाळीत गहिवरल्या आवाजात त्या म्हणाल्या, 'तुम्हाला माहीत नसेल, पण आयुष्यातलं माझं हे पहिलं कौतुक !' 'आता नेहमी होईल हो माई तुमचं कौतुक. तुमची नवी लेक फार हौशी, अगत्याची आहे हो !' सासूबाईंनी एका दगडात दोन पक्षी मारले. हसतखेळत जेवणं उरकल्यावर माई नवी साडी नेसल्या. त्यांना झालेला हर्ष त्याच्या चेहऱ्यावर मावत नव्हता. अशोकच्या आईंनी माईंना शाल पांघरविली व हातात



सोन्याचे दोन विलवर चढवले, तर आईंनी सोन्याची बारीक चेन त्यांच्या गळ्यात घातली व काय आश्चर्य, अगदी माझ्याच-सारखी फुलदाणी पिशवीतून काढून त्यांच्या हातात दिली.

'म्हणजे माझ्या सुंदर गुलाबांचाच विचार दोघींच्या डोक्यांत घोळत होता तर–काय सुंदर फुलदाण्या आहेत!' माई उद्गारल्या.

गमतीजमतीत वेळ कसा गेला, कळलाच नाही–बोलता बोलता आईंनी आपलं विणकाम काढलं–माईंनी थोडा वेळ पाहिलं ते, मग एकदम त्या म्हणाल्या, 'कसा हो तुमचा हात असा पटपट चालतो–अजित लहान असताना मी त्याला एक स्वेटर करायला घातला होता–अजून तस्सा अर्धवट पडला आहे पेटीत–काय घोटाळा न् गुंता झालाय त्या लोकरीचा कुणास ठाऊक! कुणी मला शिकवलं नाही अन् अभिमानानं मी कुणाला विचारायला पण गेले नाही–' 'हरकत नाही, मी शिकवीन तुम्हांला हां हां म्हणता–' आईंच्या या बोलण्यावर माईंच्या कपाळावर नेहमीच्या आठ्या चढू लागलेल्या मला दिसल्या; पण तेवढ्यात आई पुढे म्हणाल्या, 'आपण असं करू या का, तुम्ही मला गुलाब फुलवायची युक्ती सांगायची, मी तुम्हांला विणकाम शिकवायचं-कसं?' माईंच्या आठ्या पटकन उतरल्या. वा वा! उत्तम आहे-पण मी नक्की सांगते, विणकामापेक्षा गुलाब फुलवणं नक्की सोपं आहे–' 'छे तसं मुळीच नाही–पण बघू याच आता आपण!' दोघींचं संभाषण चाललं असताना मी सहज सासूबाईंकडे पाहिलं तो त्या माझ्याकडे बघून डोळे मिचकावीत होत्या–मी पण माझं हास्य रुमालात दडवलं. एवढ्यात अजित चमचा-वाटी घेऊन वाजवीत मला म्हणाला 'आई, मला फ्रूट सॅलड देतेस परत आणखी?' त्याच्या त्या अचानक 'आई' या संबोधनानं मी इतकी हर्षले की मी त्याला पटकन उराशी कवटाळून त्याच्या गालाचा मुका घेतला. तो गुलाम पण असा बिलगला! अशोकनं प्रेमानं माझा हात दाबला.

या घटनेनंतर आई–माईंच्या एकमेकींकडे अव्याहत फेऱ्या सुरू झाल्या. त्यांचे बरेचसे कार्यक्रम एकत्रितपणे होऊ लागले. कधी नाटक, कधी व्याख्यान, तर कधी कीर्तन, तर कधी मंडई. उरलेला वेळ त्या एकमेकींच्या सहवासात, विणण्यात वा बागेत घालवू लागल्या–दोघींच्या कॉमन ओळखीची मंडळी पण निघाली, त्या खूपच एकमेकींजवळ आल्या. एक दिवस जेवणानंतर माई आम्हांला म्हणाल्या, 'मेधा अशोक, तुम्ही मला कृतघ्न म्हणाल, तुम्ही दोघं मला इतक्या प्रेमानं आदरानं वागवता...पण पण मेधा इकडे आल्यापासून आई बिचाऱ्या एकट्याच घरात खुडबुडत असतात. धड पूर्ण जेवण पण त्या बनवीत नाहीत...म्हणून मला असं वाटतं की, आम्ही दोघींनी एकत्र रहावं-यात्राकंपनीबरोबर काशी–रामेश्वर करावं असं ठरवावं म्हणतो-आमचं दोघी समवयस्क असल्यामुळं छान जमतं–मेधा, मी सुरुवातीला तुझा दुस्वास केला–माझ्या अरुणाची जागा घेतल्याबद्दल–पण तुझ्या सालस, नम्र वागणुकीनं तू मला मैत्रीण मिळवून दिलीस–आता तुमचं घर तुम्ही संभाळा–' 'अरुणा गेल्यापासून तुम्ही चांगल्याच गुरफटला होतात माझ्या संसारात!' अशोकच्या या उद्गारावर सारवासारव करीत त्या म्हणाल्या, 'तसं मला मुळीच वाटत नव्हतं पण...आता' 'आता स्वच्छंदी पाखरासारखं उडावंसं वाटतं आहे ना दोघींना?' मी हसत हसत प्रश्न केला–'सगळं तुझ्या लक्षात येईल असं वाटतच होतं मला मेधा!' माई मला प्रेमानं जवळ घेत म्हणाल्या. 'पण माई, जायच्याआधी तेवढं तुमचं गुलाबांचं रहस्य...' या माझ्या उद्गारावर माईंनी मला एक हलकीशी चापट मारली–अजित नाचत ओरडला, 'आजीनं आईला मारलं! आजीनं आईला मारलं!' □




लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी
१९४८-४९

**लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे । मूल्य : वीस रुपये**



पुस्तके

## कादंबरीचा नायक सहानुभूतीला, क्षमेला पात्र होता काय ?

# इनामदारांचा औरंगझेब

**श्री. के. क्षी.**

हरिभाऊंच्या नंतर मराठी कादंबरी. पोकळ तंत्र आणि शैली यांच्याखेरीज खऱ्या आशयात पुढे गेलीच नाही, असे म्हणतात, आणि स्थूलमानाने ते खरे आहे. वास्तववादी समाजचित्रण, खोल स्वभावदर्शन, गंभीर जीवनदृष्टी यांच्या बाबतीत हरिभाऊंनंतर प्रगती झाली नाही, हे खरे. जी काय प्रगती झाली, ती वर्णनातील शुष्क तपशील, सामाजिक वा राजकीय कादंबऱ्यांतील अप्रस्तुत वादविवाद, चटकदार शैली यांतच झाली.

पण असे म्हणताना, आपण कादंबरीचे एक महत्त्वाचे दालन विसरतो. ते म्हणजे ऐतिहासिक कादंबरीचे होय. हरिभाऊंनीही मोठमोठ्या ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या. मी विद्यार्थिदशेत असता, 'पण लक्षात कोण घेतो ?' या हृदयस्पर्शी आणि वास्तवदर्शी कादंबरीपेक्षाही, हरिभाऊंची उषःकाल ही ऐतिहासिक कादंबरीच लोकांच्या तोंडी अधिक होती; पण पुढे, मला जेव्हा बी. ए. च्या विद्यार्थ्यांना ती शिकविण्याची वेळ आली, तेव्हा तिच्यातील ते वरवरचे ऐतिहासिक वातावरण आणि त्या काळच्या वाचकांना प्रिय असलेली ती ठराविक रहस्यप्रियता पाहून मला उषःकाल या कादंबरीचे इतके कौतुक का होत आहे, असा प्रश्न पडला. त्यामानाने चिंतामणराव वैद्यांची दुर्दैवी रंगू ही कादंबरी अधिक 'ऐतिहासिक' आहे, असे वाटले. अर्थात चिंतामणरावांनी त्या कादंबरीत, 'भाऊसाहेबांची बखर' बेसुमार कोंबली आहे, हा मात्र दोष आहे. पण, हरिभाऊ वारल्यानंतर सुमारे चाळीस वर्षांनी ऐतिहासिक कादंबरीने एकदम वेगळीच पातळी गाठली. सत्तावन्नचा सेनानी (वरखेडकर), स्वामी रणजित देसाई, झेप (इनामदार) या एकापेक्षा एक सरस कादंबऱ्या गाजल्या, त्या केवळ रहस्यमयतेच्या तंत्राने नव्हे. या पिढीच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांत एखाद्या काल्पनिक पात्राला नायक बनवून त्याच्या भोवती ऐतिहासिक कादंबऱ्यांत एखाद्या काल्पनिक पात्राला नायक बनवून त्याच्या भोवती ऐतिहासिक घटनांची आणि पात्रांची आरास करण्याचे तंत्र मराठी कादंबरीकारांनी झुगारून दिले. किंबहुना स्वामी, झेप, मंत्रावेगळा या कादंबऱ्यांत काल्पनिक पात्रांना जागाच नाही. ऐतिहासिक कागदपत्रांचा अफाट अभ्यास करणे व तो कल्पनाशक्तीच्या मुशीत घालून, फिरून त्याचा जिवंत इतिहास उभा करणे, हे तंत्र आजकालच्या ऐतिहासिक कादंबरीकारांनी आत्मसात केले आहे. या तंत्राची अत्यंत गाजलेली पहिली कादंबरी रणजित देसाईंची 'स्वामी' ही होय. इनामदारांची 'झेप' १९६३ मध्ये प्रसिद्ध झाली, तीही तितकीच गाजली. त्यानंतर 'झुंज'ही गाजली आणि अलीकडे १९७६ मध्ये त्यांनी एका अत्यंत अवघड ऐतिहासिक विषयाला हात घातला. तो विषय म्हणजे शहेनशाह औरंगझेब हा होय.

इनामदार औरंगझेबावर कादंबरी लिहीत आहेत, हे मला जेव्हा कळले तेव्हा मी त्यांना "हा विषय म्हणजे, ऐतिहासिक कादंबरीकाराला एक आव्हानच होय" असे लिहिले. या कादंबरीपर्यंत इनामदारांचे ऐतिहासिक कादंबरीचे तंत्र पुरते बसून गेले होते. पहिल्या दृश्यातच वाचकांना आपण रंगवीत असलेल्या ऐतिहासिक कालखंडात खोल नेणे, बारीकसारीक तपशिलातही तो काळ सहीसही उभा करणे, इतिहासकारांनी उपेक्षिलेल्या किंवा विपर्यासिलेल्या प्रसिद्ध व्यक्तींच्या इतिहासाची अगदी वेगळी बाजू दाखविणे वगैरे इनामदारी तंत्र आता वाचकांच्या परिचयाचे झाले आहे. सूक्ष्म ऐतिहासिक तपशील देण्याच्या दृष्टीने औरंगझेब हा विषय इनामदारांना आव्हानदायकही होता आणि सोयिस्करही होता. 'मंत्रावेगळा' करिता किंवा 'झेप' करिता इनामदारांना ऐतिहासिक कागदपत्रांचे जेवढे गठ्ठे उपलब्ध होते, त्याच्या किती तरी पट ऐतिहासिक साहित्य औरंगझेबावर लिहिणाऱ्या इंग्रज, मुसलमान आणि महाराष्ट्रीय इतिहासकारांनी वाढून ठेवलेले होते. इनामदारांना अडचण एकच होती, ती म्हणजे शिवाजीच्या महाराष्ट्रात, मोगल बादशहा औरंगझेब याची गेली दोनअडीचशे वर्षे दृढमूल असलेली काळीकुट्ट प्रतिमा ! इनामदारांना औरंगझेबाचे रूढ चित्र चितारावयाचे नव्हते. अर्थात, त्यांच्या सातशे पानांच्या या कादंबरीतील तपशिलाला वाचकांच्या टाळ्या आणि प्रमुख दृष्टिकोनाला कडवा विरोध अशी या कादंबरीची गत होणार होती.

अस्सल ऐतिहासिक तपशील भरीत भरीत आपले नवे ऐतिहासिक प्रमेय क्रमशः स्थापित करणे, हे इनामदारी तंत्र आहे. तरी पेशवाईवरील कादंबऱ्या आणि औरंगझेबावरील ही कादंबरी यांच्या तपशिलाच्या उद्दिष्टात तफावत आहे. पेशवाईवरील कादंबऱ्यांतील तपशील, त्या वेळची सामाजिक स्थिती व त्या वेळचे राजकीय हेवेदावे टिपण्याकरिता आहे. शहेनशाह या कादंबरीतील तपशिलाचा हा उद्देश तर आहेच; पण शिवाय आणखी एक सौंदर्यवर्धक उद्देश तत्कालीन इतिहासानेच कादंबरीकारावर लादलेला आहे. तो उद्देश म्हणजे मोगल सम्राटांच्या जीवनातील स्वर्गतुल्य वैभवाची हवा

कादंबरीच्या पानापानातून खेळविणे निसर्गाच्या व स्त्री-सौंदर्याच्या वर्णनानी वाङमय खुलविणे हा वाङमयातील राजरस्ताच आहे; त्याला लेखकाच्या कल्पनेचे साहित्य पुरेसे असते, पण शहेनशाह कादंबरीत कादंबरीकाराला जे वैभव रंगवावयाचे आहे, त्याला विसाव्या शतकातील कादंबरीकाराची कल्पनाशक्ती पुरेशी नाही. त्या वेळचे गालीचे, तक्के-लोड, दास-दासी, त्या वेळचे ते अनैसर्गिक 'खोजे', त्या वेळच्या बागा, यातील प्रत्येक तपशिलागणिक बिनचूक ऐतिहासिक माहितीची अपेक्षा असते यात लेखकाच्या सूक्ष्म अभ्यासाची जेवढी कसोटी, तेवढीच वाचकाच्या ऐतिहासिक ज्ञानात भर! म्हणूनच अलीकडच्या ऐतिहासिक कादबऱ्या जेवढ्या मनोरंजक आहेत, त्याहीपेक्षा ज्ञानवर्धक आहेत, असें म्हणता येईल. 'मंत्रा-वेगळा' आणि 'शहेनशाह' या कादबऱ्या वाचल्यावर तर मला जुन्या डेक्कन कॉलेजचे विख्यात प्रो. बेन याच्या प्रक्षोभक उद्‌गारांची आठवण झाली. ते स्वत राजकीय बाबतीत 'टोरी' मताचे होते. म्हणून त्यांचा 'व्हिग्' पक्षीय इतिहासकारावर राग असे. ते म्हणत,

" There is more history in the novels of Sir Walter Scott, than in the histories written by Whig historians!"

बेनसाहेबांचा रोख मुख्यत्वे करून लॉर्ड मेकॉलेसारख्या 'व्हिग' इतिहासकारावर असे. आमच्याकडे इतिहासलेखकात व्हिग् आणि टोरी असा भेद नसला तरी विपर्यस्त आणि खोट्या इतिहासाचेच राज्य बरेच दिवस होते. त्यातील खोटे सिद्धान्त व खोट्या हकीकती आजही अनेक इतिहासांत रेंगाळताना दिसतील. या खोटेपणाचे मूळ कारण, आमचा इतिहास आमच्यावर राज्य करणाऱ्या आणि आम्हाला तुच्छ लेखणाऱ्या इग्रज लेखकांनीच प्रथम लिहिला व आम्ही तोच खरा धरून चाललो. म्हणून, अलीकडच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांसबधी मी असे म्हणेन की, " इग्रजांच्या आधारे लिहिलेल्या 'इतिहासा'पेक्षा, इनामदारांसारख्या अभ्यासू आणि प्रतिभावंत कादबरीकाराच्या 'कादबऱ्यां'तूनच इतिहासाचे ज्ञान अधिक मिळते."

शहेनशाह या नावावरून व या कादबरीच्या पानांच्या सातशे या सख्येवरून इनामदारानी तिजमध्ये केवढे व किती प्रकारचे ऐतिहासिक वातावरण भरले आहे, याची कल्पनाही येणार नाही. इतिहासाभ्यासकाला सामान्यतः शहाजानानंतर तख्ताकरिता झालेल्या लढाया माहीत असतात; त्याला औरंगझेबाच्या दरबारात मुसलमान अमीरांइतकेच रजपूत राजे व महाराजे यांचे प्रस्थ होते, हेही माहीत असते; दक्षिणेतील शिवाजीमहाराज आणि उत्तरेतील शीख लोक यांचा तडफदार स्वातंत्र्यलढा माहीत असतो; पण ज्या मोगल बादशहाविरुद्ध हे लढे चालू होते, त्याचे खाजगी जीवन आणि वैभव तितकेसे माहीत नसते. ते आकड्यांनी, सनावळ्यांनी आणि नामावळ्यांनी माहीत होण्यासारखे नसते. कोणी तरी या निर्जीव सांगाड्याच्या पलीकडे जाऊन मोगल बादशहांच्या दरबारात, अत.पुरात आणि तबेल्यात शिरून ते खोलून दाखवावे लागते. इनामदारानी ते काम कल्पनेबाहेर वाकबगारपणे केले आहे. इतिहासपडितानीही त्याच्या या अतरंगचित्राचे व अफाट अभ्यासाचे कौतुक केले आहे; पण ही चित्रे म्हणजे केवळ गालीच्यांची, बगीच्यांची, कारज्यांची आणि बेगमांच्या मुलायम त्वचेची तीच ती वर्णने नाहीत. त्या त्या काळातील राजकीय घडामोडी आणि घरगुती हेवेदावे यांच्या जिवत चित्रांच्या सदर्भाने भरलेला तो तपशील आहे. आपण इतिहासात जनानखाना हा केवळ शब्द वाचतो, पण त्यातही किती सेवक, किती अधिकारी आणि किती हेवेदावे असत, बेगमांच्या त्या पडद्यात आणि खोजे लोकांच्या गर्दीत केवढे राजकारण चाले, हे या प्रचड कादबरीवरून लक्षात येईल, पण या वैभववर्णनाइतकेच कौतुक शेकडो ठिकाणी कादबरीकाराला चितारांव्या लागलेल्या सवादप्रसगाचे वाटेल. सवादाची एवढी मोठी संख्या असूनही त्यात बेचव, अनैतिहासिक किंवा 'मचूळ' अशी दोन वाक्येही काढून दाखविता येणार नाहीत. दास-दासी असोत, शहाजादे असोत की बेगमा असोत, त्यांच्या सवाल-जवाबात जितकी आदब तितकीच खोच आणि जितकी खोच तितकाच समर्पक ऐतिहासिक सदर्भ भरून राहिलेला आढळेल. प्रत्यक्ष उर्दू भाषा क्वचितच वापरूनही आपल्या ऐतिहासिक सवादाना मानक उर्दूचा स्वाद लावणे इनामदाराना चागले साधले आहे सपूर्ण कादबरी वाचून जेवढा आनद होतो, तेवढाच आनद प्रत्येक पानातील खोचदार ऐतिहासिक सवादानी होतो. साराश, कादबरी वाचीत असता आणि वाचून झाल्यावरही काही दिवस आपण दिल्ली, आग्रा, बुऱ्हाणपूर, औरंगाबाद येथील दरबारात आणि अंतःपुरातच वावरत आहोत, असे वाचकाला वाटते या कादबरीचा पचाहत्तर टक्के प्रभाव या बिनतोड वातावरणनिर्मितीतच आहे. हे वातावरण मनात मुरविल्यानंतर वाचक त्यातील प्रसिद्ध ऐतिहासिक घटनाचा विचार करू लागतो.

## शृंगारप्रसंगांची बहार

हेवेदावे आणि कारस्थाने यांच्याइतकीच लज्जत औरंगझेबाच्या जीवनातील शृगारप्रसगानी आली आहे. सर्वसामान्य अभ्यासकाला औरंगझेबाच्या जीवनात एक हिराबाईचे म्हणजे झैनाबादी बेगमेचे प्रकरण सोडल्यास, शृगारचित्राना फारसे स्थान नाही, असे प्रथमदर्शनी वाटते, परतु, इनामदारानी अनेक बेगमांशी औरंगझेबाचे झालेले शृगारप्रसग बहारीने चितारून दाखविले आहेत. नवाबबाई, उदेपुरी बेगम यासारख्या बेगमांशी रगलेल्या शृगारप्रसगात शृगार, जनानी कारस्थान आणि बेगमाबेगमातील स्पर्धा या तिहींची लज्जत आहे. स्वतःचा सख्खा भाऊ दाराशुको याचा निकाल लावल्यावर त्याच्या अल्पवयस्क उदेपुरी बेगमेकडे औरंगझेबाने प्रारभी दुर्लक्ष केले होते. तिला दिल्लीच्या सुहागपुऱ्यात एका वेगळ्या हवेलीत ठेवले होते. दाराशुकोने मध्यआशियातून मुद्दाम माणसे पाठवून ही सुदरी पैदा केली होती. औरंगझेबाची बहीण आणि जनानखान्यावरील प्रमुख रोशन आरा हिने चाळिशीच्या घरात आलेल्या आणि झैनाबादी बेगमेला कोणी विषप्रयोग केल्यानतर उदास बनलेल्या, नव्या प्रेमाची गरज असलेल्या औरंगझेबाला या उपेक्षित बेगमेची आठवण करून दिली. या वीस वर्षांच्या तारुण्य सुदरीचा आणि चाळीस वर्षांच्या भावी आलमगिराचा शृगारप्रसग इनामदारानी फडक्यानाही हेवा वाटावा अशा बहारीने रगविला आहे. यात आणखीही एक गोष्ट लक्षात येते, नुसत्या चुबनानी, आलिंगनानी आणि अनावृत्त स्त्रीशरीरानी शृगारदृश्ये रगत नाहीत; तो 'कुणाचा' शृगार आहे व त्याचे बाकीचे जीवन वाचकाना कितपत व्यापून टाकीत आहे, यावर शृगारप्रसगांचे वजन अवलबून असते. निरुद्योगी आणि भाव-

रट मध्यमवर्गीय नायकांचा शृंगार वाचकांचे मन जेवढे वेधून घेतो, त्यापेक्षा अनेक महत्त्वाच्या आणि धोक्याच्या घडामोडीत गुतलेल्या वीरपुरुषाचा शृंगारप्रसंग वाचकाचे मन अधिक व्यापून टाकतो. या दृष्टीने तरुण गतधवा उदेपुरी बेगम आणि मध्यमवयीन महत्त्वाकांक्षी औरंगझेब यांच्या शृंगारप्रसंगाला किती तरी अधिक 'पदर,' किती तरी अधिक 'डायमेन्शन्स्' असतात. इनामदार वर्णन करतात–

'हिंदुस्थानचा बादशहा हात समोर पसरून आपल्या नव्या बेगमेकडे येत होता. उदेपुरीनं औरंगझेबाच्या पगडीतल्या मोत्यांच्या तुऱ्यापासून ते पायांतल्या पढावांपर्यंत एकवार त्याला न्याहाळून पाहिलं. मग चेहऱ्यावर हसू खेळवीत आपली नाजूक पावलं गालिच्यावर हलकेच टेकवीत औरंगझेबाला ती सामोरी गेली. कमरेतून किंचित वाकून तिनं सलाम करण्यासाठी मेंदीनं रंगवलेले आपले गोरे हात खाली झुकविले. तेवढ्यात औरंगझेबानं पुढं होऊन सलाम करणारे ते हात आपल्या हातामध्ये पकडले उदेपुरीला जवळ ओढीत तिची हनुवटी वर उचलून तिच्या डोळ्यात पाहात औरंगझेब म्हणाला, 'जानेमन, हे हात पहिल्याच भेटीत सलाम करण्यासाठी खुदानं इतके नाजूक केले नाहीत!'

"लेकिन शहेनशहा ..." शरमेनं मान आणखी झुकवून उदेपुरी डोळे मिटून ओठातल्या ओठात पुटपुटली.

"नही, नही, प्यारी बेगम, या तुझ्या महालात आम्ही शहेनशहा नाही. औरंगजेब आहोत!"

या पहिल्याच भेटीत मोगली आदब आणि शृंगारभाव याच्याबरोबरच या दोघाच्या अंतरंगात अनेक भावनांची ओढ होती. औरंगझेबाच्या मनात जनानखान्यातील इतर अनेक लावण्यमंजिरींचे स्मरण होते; तर उदेपुरी बेगमेच्या मनात जनानखान्यावर वर्चस्व मिळविण्याची ईर्षा उसळी खात होती. ही शृंगाराची रात्र मोतीमशिदीतून ऐकू येणाऱ्या पहाटेच्या नमाजाच्या बांगेनेही सपुष्टात आली नाही! इनामदार म्हणतात, "आणि बादशहाच्या आयुष्यात प्रथमच नमाजाची वेळ चुकली!"

ज्याला अलीकडचे लेखक वर्णनातील वा कथानकातील 'ताण' म्हणतात, तो या प्रसंगात किती विविध तऱ्हांनी जाणविला गेला आहे, ते पहाण्यासारखे आहे बेगमेच्या मनावरील स्त्रीसुलभ स्पर्धेचे दडपण, औरंगझेबाच्या मनावरील राजकारणाचे व धर्मभावनेचे दडपण या सर्व दडपणानाही भारी होणारी शृंगारभावनेची धग लेखकाने या प्रसंगात रंगविली असल्याने, त्या शृंगाराला एक दर्जा प्राप्त झाला आहे. ऐश्वर्य आणि दरबारी आदब याच्यामुळे त्या शृंगारप्रसंगाला एक उंची लाभली आहे.

औरंगझेबाच्या अठ्ठेचाळिसाव्या वाढदिवसाची उदेपुरीच्या महालातील रात्र इनामदारानी अशीच बहारीने रंगविली आहे. महालात येण्याला औरंगझेबाला बरीच रात्र होते; पण त्यालाही कारण, औरंगझेबाच्या दैनंदिन कार्यक्रमात राजकारणाला असलेले प्रमुख स्थान हेच होते. हिंदुस्थानाच्या चारी कोपऱ्यातून आलेली हेराची बातमीपत्रे वाचतावाचता त्याला आपल्या तरुण बेगमेकडेही दुर्लक्ष करावे लागले होते. महालातील भेटीचा प्रारंभ उदेपुरीच्या लटक्या-रुसव्याने आणि वाढदिवसानिमित्त एका विचित्र मागणीने होतो तिने त्या रात्री औरंगझेबाकडून विख्यात कोहिनूर हिऱ्याची मागणी केली होती. तिच्या जवानीने आणि खूबसुरतीने वेडावलेला औरंगझेब, ती अवघड मागणीही मान्य करतो. त्यानतर दासीचे गझल-गायन आणि हजरजबाब याचे दृश्य रंगविले आहे पुन्हा पहाट होते, औरंगझेबाला नमाजाची आठवण होते आणि तरी तो बेगमेच्या सौंदर्यात आणि तिच्या दासीच्या चतुर भाषणात तेही विसरून जातो. शेवटी तो म्हणतो,

"या अल्ला! गजब केला तुझ्या या दासीनी. उदेपुरी, प्यारी बेगम, आम्ही खुष आहोत!"

यावर इनामदार एकच वाक्य लिहितात--

"उदेपुरीच्या काचोळी नसलेल्या छातीवर चुंबनांचा वर्षाव झाला!"

□

शृंगारप्रसंगाइतकेच कौशल्य राजकीय प्रसग पेश करण्यातही कादंबरीकाराला वापरावे लागले आहे. औरंगझेबासंबंधीची कादबरी म्हटली की, महाराष्ट्रीय वाचकाला त्यातील बराच भाग शिवाजीने व्यापला असेल, अशी कल्पना होते, पण इनामदारांनी औरगझेबाच्या नव्वदाहून अधिक वर्षांच्या जीवनातील असख्य व्यक्तींना आणि घटनांना योग्य त्या प्रमाणात जागा दिली आहे हेही या ऐतिहासिक कादंबरीच्या कलात्मकतेचेच एक अंग आहे. शिवाजीमहाराजाचे नाव प्रारंभी मधूनमधून आणि प्रसंगाप्रसंगानेच डोकावते. झैनाबादी बेगम हिंदू होती. शिवरात्रीच्या दिवशी औरंगाबादेनजीकच्या प्रसिद्ध शिवमदिरात घृणेश्वरमदिरात जाण्याचा तिचा बेत होता. देऊळ भ्रष्ट होईल या सबबीवर त्या मंदिराच्या ब्राह्मण पुजाऱ्यांनी बेगमेच्या मंदिरप्रवेशाला विरोध केला. या प्रसंगात तत्कालीन हिंदू-मुसलमान-संबधाचा तर रंग आहेच, पण लेखकाने त्या प्रसगाच्या रूपाने तरुण शिवाजीच्या बडखोरीचे पडसाद औरंगझेबापर्यंत पोहोचविण्याचे कार्य साधून घेतले आहे ते ब्राह्मण औरंगझेबासमोरही शिवमदिर भ्रष्ट होण्याची भाषा करतात, याला कारण शिवाजी नावाचा कोणी बडखोर जमीनदाराची फूस असली पाहिजे, असे औरंगझेबाचे अधिकारी औरंगझेबाला सागतात.

शिवाजीच्या नावाचा बोभाटा अधिकाधिक होतो, तो जसवंतसिंगासह गेलेल्या शाहिस्तेखानाच्या फजितवाड्यान तर होतो. तो अपमान औरगजेब गिळतो न गिळतो तोच सुरत लुटल्याची खबर वजीर जाफरखान ताज्या बातमीपत्रावरून देतो. महाराजाची ही एकाहून एक साहसे चालू असता, औरगझेबाच्या अतपुरातील आणि दरबारातील कारस्थाने, जबाब-सवाल चालूच होते. अखेर जयसिंगाच्या मुत्सद्देगिरीने आणि लष्करी डावपेचानी शिवाजी महाराजांना शरण यावे लागले. यानंतर आग्र्याच्या दरबारातील शिवाजीमहाराजाच्या तडफदार वर्तनाचा प्रसगही रंगवला आहे. त्यासंबधीच्या विविध प्रचलित हकीकती आणि वादविवाद यांतून इनामदारानी आपल्या मताप्रमाणे एकच Version किंवा त्या प्रसंगाचे एकच स्वरूप निवडले आहे.

संपूर्ण कादबरीत एखाद्या विशिष्ट ऐतिहासिक घटनेचा विस्तार न करता, सर्वच घटनांचा उपयोग, औरंगझेबाचे व्यक्तिमत्त्व रंगविण्याकरिता केलेला आढळेल. जनानखान्यातील हेऱ्यादाऱ्यानी काय, की उमरावाच्या उघडकीस आलेल्या बेइमानीने काय, औरंग-

झेबाच्या कठोर संयमात काडीचाही फरक पडत नाही, हे या प्रदीर्घ चित्रणाचे सार म्हणता येईल; पण त्याच्या कठोरपणाला आणि संयमालाही अपवाद आहेत. बुर्‍हाणपुरात औरंगझेब आपल्या मावशीच्या नवर्‍याच्या बागेत झैनाबादी बेगमेला प्रथम पाहातो, तेव्हा तो पस्तीस वर्षांचा होता आणि आधीच राजकीय जबाबदार्‍या, दरबारी हेवेदावे आणि शहाजहानची गैरमर्जी यांमुळे तो पक्का व्यवहारी बनलेला होता. तो धर्माचरणातही फार कडक होता; पण इतक्यातूनही झैनाबादी बेगमेच्या रूपाचा आणि मोहक हालचालीचा त्याच्यावर विलक्षण परिणाम झाला, असे इतिहासकारही सांगतात आणि कादंबरीकार इनामदारही रंगवतात. बालिशपणे बगीच्यातील आंब्याच्या डहाळीपयत उडी मारणारी ती तरुण सुंदरी पाहून मध्यमवयीन औरंगझेब म्हणे मूर्छित पडला! औरंगझेबाच्या स्वभावाची हीच नाजूक बाजू झैनाबादी बेगमेच्या आकस्मिक मृत्यूने तर अधिकच दिसून येते. या बेगमला कोणी तरी विष घातले. कोणी घातले यावर इतिहासही मूग गिळून बसला आहे आणि कादंबरीकारानेही ते केवळ भीतभीत सूचित केले आहे. या प्रसंगीचा औरंगझेबाचा शोक इतका अनावर होता की, त्यात तो विषप्रयोग करणार्‍या व्यक्तीवरचा रागही गिळू शकतो. झैनाबादीच्या निधनाचे, दफनाचे आणि औरंगझेबाच्या त्या वेळच्या असीम शोकाचे इनामदारानी फारच समर्थपणे चित्र काढले आहे. शत्रूशी, मित्राशी, सख्ख्या भावाशी, नव्हे प्रत्यक्ष जन्मदात्या बापाशी निर्घृणपणे वागणारा औरंगझेब, झैनाबादीच्या निधनप्रसंगी आपण साफ विसरून जातो. आपल्यासमोर, सौंदर्याने घायाळ होणारा, एका भेटीतच अलोट प्रेमात पडणारा आणि प्रेयसीच्या निधनाने शोकसागरात बुडून जाणारा मोगल राजपुत्र उभा राहतो. एवढा एक प्रसंग सोडला, तर इनामदारानी बाकी सर्वत्र अहोरात्र जागरूक असलेला, स्वतःच्या उद्दिष्टाकरिता निष्ठुर वा मेहेरबान होणारा, बोलण्यात डावाला प्रतिडाव करणारा, जयसिंग, जसवंतसिंग यासारख्या वीराना नुसत्या नजरेच्या इशार्‍यावर खेळविणारा व या सर्व राजकारणातूनही जपाची माळ, इस्लामचा कलमा आणि दिवसातल्या पाचही नमाजाची वेळ रणांगणावर वा अंतःपुरातही न विसरणारा औरंगझेबच आपल्याला या कादंबरीत दिसतो.

### वस्तुनिष्ठ कादंबरीकला

इनामदारांच्या कादंबरीतील प्रसंग आणि संवाद प्रायः सर्वच्या सर्व साधार असतात. म्हणजे ते प्रसंगच केवळ इतिहासात घडलेले असतात असे नव्हे; तर त्यातील उद्गारही ऐतिहासिक कागदपत्रावर आधारलेले असतात. त्यामुळे, कादंबरीतील एखाद्या खोचदार राजकारणी जबाबाला (repartee) ला टाळी द्यावी, तर तो मूळ इतिहासातच आहे, असे आपल्याला इनामदार सांगतात! पण अशा प्रत्यक्ष घडलेल्या प्रसंगातही इनामदाराची कादंबरीकला दिसून येते. सुमारे पन्नास वर्षांच्या इतिहासातील शेकडो प्रसंग कथानकाच्या ओघात गुफणे हे, ते प्रसंग कल्पनेतून उभे करण्याइतकेच अवघड काम आहे. स्वतः औरंगझेबाचा 'अथांग' स्वभाव, वेगवेगळ्या बेगमांचे वेगवेगळे रागलोभ, मुत्सद्द्याचे कावे हे सर्व तर त्यानी रंगविले आहेतच; पण येसूबाईसारखी मराठा राजस्त्री, दुर्गादास राठोडसारखा धीरोदात्त दुष्मन यांचाही चित्रे इतिहासाला धरूनच आणि बहुतेक ठिकाणी औरंगझेबाच्या डोळ्यानीच इनामदाराना रंगवावी लागली आहेत व अशा ठिकाणी इनामदाराची वस्तुनिष्ठ कला कसोटीला लागली आहे. सामान्यतः औरंगझेबाची कौतुकास्पद बाजूच रंगविणारे इनामदार योग्य प्रसंगी त्याची लंगडी बाजू तितक्याच निर्भयपणे दाखवितात. या कादंबरीत औरंगझेबाचे दोष दाखविले नाहीत, असा समज करून घेणारे वाचक मी पाहिले आहेत; पण दुर्गादास आणि औरंगझेब याच्या प्रसंगात इनामदारांनी महाबलाढ्य, परम 'धार्मिक' आणि महाधूर्त औरंगझेबाचेही कोणते मानसिक दारिद्र्य होते, ते मोठ्या खुबीने दाखविले आहे. औरंगझेबाचा नातू शहाजादा अकबराचा मुलगा पंधरा वर्षे दुर्गादासाच्या ताब्यात होता. आपल्या नातवाचा त्या काफीर रजपुतावरील गाढ विश्वास पाहून औरंगझेब खजील झाला होता. एवढा विश्वास तू कसा संपादन केलास, असे तो दुर्गादासला विचारतो. दुर्गादास म्हणतो, 'शहेनशाह, माणसाला जिंकता येतं ते प्रेमानं, निव्वळ धाकदटपशा आणि हुकूमशाहीन नाही!'

अर्थात, औरंगझेबाने दुर्गादासाचे प्रेमही सहेतुक आणि स्वार्थीच ठरविले! 'आमचे शहाजादे हातात ठेवून त्यांच्यामार्फत मारवाडचं राज्य लुबाडण्याचा हेतू दुर्गादासजींनी मनात ठेवला नसता तर त्यांनी आमच्या शहाजाद्यावर एवढं प्रेम केलं असत, असं आम्हाला वाटत नाही......खुदान माणसाला असं बनवल आहे की, त्याच्या आतल्या कोणत्या भावना केव्हा जोरावर असतात, हे कुणाला समजणार नाही!'

औरंगझेबाचे हे उद्गार वाचून महात्मा गांधींच्या एका प्रसंगीच्या उद्गाराचे स्मरण होईल. राजाजी आणि गांधीजी याच्या सुप्रसिद्ध मतभेदाच्या वेळचे ते उद्गार आहेत. राजाजींनी जेव्हा अंतःकरणाची ग्वाही द्यायला सुरुवात केली, तेव्हा गांधीजींनी उद्गार काढले, 'मनुष्याच्या अंतरंगात काय आहे, ते एक त्याला स्वतःला तरी माहीत असते, नाही तर परमेश्वराला तरी माहीत असते!'

ज्या वेळी संताजीसारखे वीर बादशाही शामियान्यावर निधडेपणाने छापे घालीत होते, तेव्हाच दुसरे काही मराठी सरदार आणि किल्लेदार स्वराज्याशी निमकहरामी करण्याकरिता बादशहाच्या छावणीत खेटे घालीत होते. पन्हाळगडच्या किल्लेदाराची वहीण असेच एक कपटी राजकारण घेऊन बादशहाकडे आली होती तो प्रसंग इनामदारानी बहारीने रंगविला आहे. अखेर बादशहा आपल्या दरबारातला ज्ञानी तत्त्ववेत्ता दानिष्मदखान याला म्हणतो, 'या मराठ्याच्या स्वभावातलं एक कोडं आम्हाला उलगडलं नाही... एकीकडे काही मराठे, आम्ही त्यांच्या राजाला सजा दिली म्हणून आमच्या छावणीवर हल्ले करीत आहेत, तर दुसरीकडे त्याचेच लोक, किल्ले वतनासाठी आमच्या हवाली करीत आहेत!'

पण, मराठ्यासंबंधीच्या या मानसशास्त्रीय कोड्यात अडकून बसायला औरंगझेबाला फुरसत नव्हती. तो लगेच पुढे म्हणतो, 'दानिष्मदखान, वतनासाठी आपला मुलुख आमच्या हवाली करणार्‍या लोकाना आम्ही उत्तेजन दिलं पाहिजे।'

धूर्त उमरावाना आणि प्रतिस्पर्ध्याना औरंगझेब हां हां म्हणता निरुत्तर करीत असला, तरी त्याच्याशी प्रेमानं आणि हितबुद्धीनं बोल

णारे स्त्री–पुरुष कधीकधी त्याला निरुत्तर करीत असत. संभाजीला ती भयंकर सजा फर्माविल्यावर त्याच्याबद्दल रदबदली करायला शहाजादी झीनतुन्निसा अपरात्री आपल्या बापाकडे येते, त्या वेळचा त्या दोघाचा संवाद औरंगझेबाच्या स्वभावावर आणि जीवनविषयक तत्त्वज्ञानावर प्रकाश पाडणारा आहे 'जो राज्य करतो, त्याला कठोर बनावेच लागते. तसेच, काय करायचे आणि काय करायचे नाही, हे माणसाची परिस्थिती ठरवीत असते; स्वत: ते माणसाच्या हातात नसते.' म्हणजे औरंगझेबाविरुद्ध बंड करणाऱ्या आणि इस्लामचा अवमान करणाऱ्या संभाजीचे डोळे काढण्याचा हुकूम देणे, हे प्रत्यक्ष विधिलिखित आहे! ते 'बेटी झीनत'ला कळत नसेल, तर ते तिचे अज्ञान आहे, असे बादशहा औरंगझेब थंडपणाने आपल्या मुलीला पटवितो. अपरात्रीपर्यंत एकान्तात पवित्र कुराण वाचल्यानतर निर्घृणपणा आणि दैववाद याचाच हा सदेश त्या दिवशी त्याला आपल्या सुदर आणि सदय मुलीला द्यायचा असतो!

याहूनही रोमाचकारी प्रसंग दाराशुकोची मुलगी जहानझेबबानू औरंगझेबापुढे आणून उभी केली गेली तेव्हाचा आहे. ती फार हट्टी आणि उद्धट आहे, अशी तक्रार जनानखान्यावरील प्रमुख रोशनआरा बेगम हिने आपला भाऊ औरंगझेब याच्याजवळ केली होती. तरीही तिला आपल्यासमोर आणण्याचा औरंगझेबाने आग्रह धरला. त्या वेळी त्या छोटया पोरीने औरंगझेबाच्या तोंडावर त्याची निर्भर्त्सना केली. ज्या अल्लड मुलीच्या बापावर;—आपल्या सख्ख्या भावावर—औरंगझेबाने मारेकरी घातले होते, त्या मुलीने केलेली निर्भर्त्सना औरंगझेबाने शातपणे सहन केली. जितका क्रूर होता, तितकाच आत्मसयमीही होता. आपल्या क्रौर्याला आपले उलेमा आणि काझी याच्याकडून कुराणे शरीफचे आधार मिळविण्यालाही तो कधी विसरत नसे! त्यामुळे, नुसत्या 'क्रूर' या शब्दाने त्याच्या स्वभावाचे वर्णन होण्यासारखे नव्हते.

क्रौर्य, महत्त्वाकाक्षा, काफिराचा द्वेष याचे त्याने तत्त्वज्ञान बनविले होते. ते इतके की, जो जो आपल्या महत्त्वाकाक्षेला आड येईल त्याला त्याला 'काफीर' ठरविणे, औरंगझेबाला तर्कशुद्ध वाटू लागे! औरंगझेबाच्या जीवनाचा मध्यबिंदू, त्याच्या श्रद्धेचा आधार, त्याच्या आनदाचा विषय कोणता होता? त्याच्या विश्वासाला पात्र कोण झाले होते? असे कोण होते, की ज्याच्या प्रेमाखातर तो स्वत:ला आणि स्वत:च्या महत्त्वाकाक्षेला विसरू शकला असता?

वरवर पहाता तो परम धार्मिक होता. मुरब्बी मुत्सद्द्याशी बोलत असो, अप्सरेसारख्या सुदर बेगमेशी बोलत असो, की पोटच्या पोराशी बोलत असो, त्याच्या हातातली जपमाळ कधीच बाजूला होत नसे! अल्लाच्या इच्छेशिवाय झाडाचे पानही हालत नाही, अशी श्रद्धा तो बोलून दाखवी आणि तशी त्याची खात्री Conviction खरोखरीच होती.

पण ईश्वरी श्रद्धा ही अशी विचित्र गोष्ट आहे की, जे जे घडते ते ईश्वरेच्छेने घडते, असे म्हणणारा माणूस जर महत्त्वाकाक्षा, परधर्मद्वेष यासारख्या जहरी मनोविकारांच्या आधीन झाला, तर 'मी जे जे करतो ते ते ईश्वरच माझ्याकडून करवीत आहे.' ... 'माझी इच्छा ही ईश्वराचीच इच्छा आहे,' असे म्हणण्यापर्यंत त्याची ईश्वरनिष्ठा त्याला वेडा बनविते! वस्तुत: ती 'ईश्वरनिष्ठा' नसून त्याच्या महत्त्वाकांक्षेने आणि सत्तालोभाने घेतलेले ईश्वरनिष्ठेचे मायावी रूप असते ते! औरंगझेब आपल्या प्रिय कन्येशी, झीनतबेगमशी बोलत असो, की दानिष्मंदखानासारख्या तत्त्ववेत्त्याशी बोलत असो, 'अखेर जे अल्लाच्या मनात असेल तेच घडून येईल!' हे त्याचे पालुपद असते.

'वोही होता है जो मजुरे खुदा होता है।' असे म्हणत म्हणत तो भावाचा खून करतो, पित्याला तुरुगात टाकतो, जयसिंगाने दिलेल्या हमीवर विसबून आलेल्या राजा शिवाजीला अटक करतो आणि सर्वांत भयंकर गोष्ट म्हणजे मुल्ला, काझी आणि कुराणे–शरीफ याचा सल्ला घेत घेत संभाजीचे डोळे काढण्याचा हुकूम देतो! कारण या सर्व गोष्टी 'खुदाला मंजूर' आहेत, असेच त्याला सत्तालोभापायी वाटू लागते. संभाजी आणि येसूबाई याच्यासंबंधी करुणा वाटणारी कारुण्यवती झीनतुन्निसा जेव्हा रदबदली करते, तेव्हा 'ज्याला राज्य करायचे आहे, त्याला असेच वागावे लागते!' असे तो समर्थन करतो. जयसिंगाच्या योजनेप्रमाणे आपल्या दरबारी आलेल्या लोकोत्तर शिवाजीराजाशी सलूख करून दक्षिणेतील राज्ये त्याने त्याच्या ताब्यात दिली असती तर त्याच्यावर अल्लाची अवकृपा झाली असती, असे मुळीच नाही. शिवाजीमहाराजावर औरंगझेबाने विश्वास टाकला असता तर, इस्लामला धोका होता, असेही त्याला म्हणता आले नसते. ताब्यात सापडलेल्या तरुण मुसलमान स्त्रियाना साडी-चोळी देऊन महाराजानी सन्मानाने त्याच्या मुसलमान नातेवाइकाकडे सुपूर्त केले होते त्यांनी स्वत:च मोगलदरबारात गर्जून सांगितल्याप्रमाणे ते कैदी म्हणून आग्र्याला आलेले नव्हते, तर एक प्रकारचा तहनामा करून, काही अटीवर रामसिंगाबरोबर ते दरबारात आले होते. त्या अटी मोडून, त्याचा अवमान करून व त्यामुळेच त्यांनी सताप व्यक्त केल्यावर त्याना अटक करून औरंगजेबाने काय साधले? त्याच्या या कृत्यात मुत्सद्दीपणाही नव्हता की धार्मिकपणाही नव्हता. विश्वासघात आणि खुनशीपणाच होता! मग जपमाळ ओढीत तो आपल्या दगलबाजपणाला 'ईश्वरी इच्छा,' 'मजूरे खुदा' वगैरे काही म्हणो राजकारणात दगलबाजी क्षम्य असते; पण ती स्वसरक्षणार्थ केलेली दगलबाजी असावी लागते.

## मुख्य प्रश्न 'मूल्यांचा'

पण औरंगझेबाच्या चरित्रात मुख्य प्रश्न उभा राहतो तो 'औरंगझेब खराखुरा धार्मिक तरी होता का?' हा होय त्याचा दिनक्रम पाहिला तर तो एखाद्या फकिराच्या दिनक्रमाहूनही कडक होता. तो मांसाहार करीत नसे. व्याघ्रजिनावर झोपे झोप फक्त तीन तास घेई नित्य कुराण पठण करी सपूर्ण कुराण त्याला मुखोद्गत होते, पण या सर्व धार्मिकतेमुळे, 'मारेकरी घालणे, सख्ख्या भावाशी दगलबाजी करणे,' यात त्याला अडचण येत नसे. त्याहीपेक्षा आश्चर्याची गोष्ट म्हणजे अहोरात्र कलमा पढणारा हा तक्तनशीन 'फकीर,' आपल्या नव्वद वर्षांच्या हयातीत एकदाही हाजची यात्रा करीत नाही! अर्थात त्याचे कारण उघड आहे. तो हिंदुस्थान सोडून गेला असता तर, त्याच्या मुलानी बंड करून त्याचे राज्य घेतले असते किंवा इकडे शिवाजी आणि दक्षिणेतील सुलतान प्रबळ झाले असते; पण याचाच अर्थ धार्मिकतेला त्याच्या जीवनात दुय्यम स्थान होते, असा होत नाही का?

धार्मिकतेला दुय्यम स्थान होते हाही आम्ही मोठा दोष समजत नाही, पण फरूकीसारखे त्याचे चरित्रकार जेव्हा औरंगझेबाची तुलना अकबराशी आणि दाराशुकोशी करून त्याला श्रेष्ठ ठरवितात, तेव्हा मूलभूत मूल्याचा प्रश्न उपस्थित करावा लागतो. राज्यकर्त्याला निष्ठुर व्हावे लागते हे कबूल, त्याला सार्वत्रिक साशकता दाखवावी लागते हेही काहीसे खरे आहे; पण औरंगझेब निष्ठुर आणि सशयी आहे एवढेच नव्हे. 'त्याला कुणाबद्दल तरी प्रेम वाटत होते का?' हाच मुळी प्रश्न आहे. आणि त्याचे उत्तर दुर्गादासाने देऊन ठेवले आहे. दुर्गादास आपल्या हाती सापडलेल्या दुष्ट मोगलबादशहाचा नातू शिक्षण देऊन प्रेमाने वाढवितो, तर उलट औरंगजेबाच्या हातात शिवाजी आणि संभाजी हे दोघेही एकेका प्रसंगी सापडले होते तेव्हा त्याने प्रेमच काय पण यत्किंचित सहानुभूती दाखविली असती तरी हे दोघे त्याचे 'राजकारणी मित्र' बनले असते,—

'Allies' बनले असते; पण त्या दोघांनाही ठार करण्याचा औरंगजेबाने बेत केला. शिवाजीमहाराजांच्या बाबतीत त्याच्या असामान्य सावधगिरीमुळे औरंगजेबाचा तो दुष्ट बेत फसला संभाजीमहाराज बेदरकार आणि गाफील असल्यामुळे या निर्दय धर्मवेडया सम्राटाच्या पजात अचानक सापडले. त्याना जिवत ठेवण्यास कोणतीच हरकत नव्हती. इतिहासात अनेक राजानी आपले कट्टे दुश्मन आपल्या कैदेत जीवत ठेवल्याचे आढळते; पण या दुष्ट बादशहाने मराठ्याच्या त्या उमद्या छत्रपतीचे डोळे काढण्याचा व जीभ छाटण्याचा हुकूम दिला! हे राक्षसी हुकूम देताना तो आपल्या उलेमाची सल्लामसलत घेण्याला मात्र विसरत नसे. हा सर्व प्रकार पाहिला म्हणजे मोगलाचा हा शेवटचा कर्तबगार बादशहा धर्माकरिता तर जगत नव्हताच, पण राजकारणाकरिताही जगत नव्हता असे म्हणावे लागते. तो जगत होता खुनशीपणाकरिता. त्याचा जीवनाधार होता सार्वत्रिक संशय! त्याने बापालाही तुरुगात टाकले, मुलालाही तुरुंगात टाकले. इतकेच नव्हे तर अरबी-फारशीची पंडिता, रूपसपन्न कवयित्री, दिलरसबानूची मुलगी झेबुन्निसा, हिला देखील तो तुरुगात टाकतो. ती तुरुगातच मरते. जयसिंग आणि जसवतसिंग हे रजपूत राजापैकी प्रमुख व औरंगझेबाच्या सेवेत जन्म काढणारे महाराजे—याचा शेवट औरंगझेबाने काय केला? जयसिगाच्या एका मुलाला (कीरतसिंगाला) त्याच्या पश्चात दुसऱ्या मुलाविरुद्ध उठविले! जयसिंगाच्या पश्चात त्याला राज्य देतो अशी लालूच दाखविली. त्या मूर्खाने आपल्या बापाला विष घातले. जसवतसिंगाच्या पश्चात 'त्याची मुले ही त्याची मुलेच नव्हेत,' असे हा 'धार्मिक' बादशहा म्हणू लागला. म्हणजे त्याला कशाचाच विधिनिषेध नव्हता असे म्हणावे लागले.

अशा या अमानुष आणि खुनशी बादशहाचे इनामदारानी कोणते रूप दाखविले आहे? त्यानी लपविले काहीच नाही; परंतु त्याला वाचकाची सहानुभूती, निदान क्षमा मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. त्या क्षमेला आणि सहानुभूतीला तो पात्र आहे काय? ही औरंगझेबाची शोकातिका आहे, असे इनामदाराचे मत दिसते. इतरानाही औरंगझेबाच्या शेवटच्या दिवसावरून आणि त्यात त्याने काढलेल्या उद्गारावरून पुष्कळदा तसे वाटते असे दिसते. एक दिवस तो उदेपुरीबेगमला म्हणाला, 'या पापी माणसाला आता निदान, प्रार्थना करून तरी सुख मिळवू द्या! जिंदगीभर ज्याचे जे जे देणे होते ते या औरंगझेबाने देऊन टाकले आहे. आता आम्हाला अल्लाशी नाते जोडू द्या!'

दुसरे दिवशी औरंगझेबाच्या अंगात ताप भरला. लगेच सर्वत्र खळबळ माजली. बादशहाची तबियत लवकर दुरुस्त व्हावी म्हणून नमाज व्हायला लागले. अखेरीस आठ दिवसानी हकिमाच्या हाताला यश आले. झीनतने फकीर अवलियाना बोलावून लक्षावधी रुपये खैरात म्हणून वाटले. एक दिवस झीनत म्हणाली, 'अब्बाजान आता निदान शेवटचे तरी ऐकावे... मराठ्याचा मुलुख जिंकून झाला. आता विश्रांतीसाठी एका निवात स्थळी छावणी हलवावी निदान आमच्यासाठी—आपल्या उदेपुरी बेगमेसाठी आमचं म्हणण ऐकाव.'

यावर औरंगजेब म्हणतो 'बेटी; पण खुदानं—आम्हाला दिलेला फर्ज अजून आम्ही पुरा करू शकलो नाही. —— कळवा आमच्या वझिराना! गाझी आलमगिरी औरंगझेब बादशहा आपल्या कर्तव्याकडे पाठ फिरवून आरामासाठी परत फिरू इच्छितो.'

ही औरंगझेबाची 'ट्रॅजेडी' ठरावी असे इनामदाराचे म्हणणे दिसते. एखाद्या नायकाची शोकातिका झाली असे वाटण्यापूर्वी त्याच्यासंबंधी वाचकांना सहानुभूती वाटावी लागते. औरंगझेबाच्या कर्तबगारीसबधी त्याच्या शत्रूनादेखील कौतुक वाटत होते; पण त्याच्या स्वतःसबधी बिचाऱ्या झीनतउन्निसाखेरीज एकाला तरी सहानुभूती वाटत होती की नाही याची शकाच आहे. तो ज्याला 'फर्ज' मानतो त्यामध्ये माणुसकीही नाही की मुत्सद्दीपणाही नाही. औरंगजेबाला फक्त मराठेच दुष्ट आणि कपटी समजत होते असे नव्हे. इराणचा शहादेखील त्याला निर्भर्त्सनेची पत्रे लिहीत होता. पाश्चात्य इतिहासकारही त्याच्यासंबंधी तिरस्कार आणि कीवच दाखवितात. कादबरीकारानीही औरंगझेबासंबंधी तिरस्कार उत्पन्न केला असता तर वाचकाना—कादबरीच्या नायकासंबंधी नव्हे—तरी कादंबरीकारासंबंधी सहानुभूती वाटली असती. आहे त्या स्थितीत मात्र कादबरीकार अशक्य गोष्टीकरिता आटापीटा करीत आहे, असे वाटल्यावाचून राहत नाही.

याचा अर्थ कादबरीकाराचा रोख फसला असला तरी—कादंबरी फसली आहे, असा मात्र खास नाही. ही कादबरी मराठीत औरंगझेबासंबंधीची व औरंगझेबाच्या कारकीर्दीसबधीची एक अमर कलाकृतीच ठरेल. एकही पान एकही संवाद फिका वाटू नये अशी सातशेअठरा पाने लिहणे ही सामान्य गोष्ट नव्हे! अलीकडच्या ऐतिहासिक कादंबऱ्यासबधी एका गोष्टीचे मात्र कोडे वाटते. हे कादबरीकार एक सलग कथानक साधते तर अधिक परिणामकारक झाले असते. स्वामी कादबरीनतरच्या प्रसिद्ध कादबऱ्यानी चित्रपटकथेप्रमाणे (सिनॅरिओप्रमाणे) तुकडे तुकडे साधण्याचे तत्र का स्वीकारले, कळत नाही. त्यामुळे प्रदीर्घ कथानकाची भव्यता कमी होते. प्रचंड इमारतीऐवजी छोट्या छोट्या बंगल्याची कॉलनी पसरल्यासारखे वाटते; पण आजकाल सर्वत्रच दिसणारा रचनेचा हा एक दोष दुर्लक्षिल्यास कादंबरीकार इनामदार यानी एक प्रचंड ऐतिहासिक कथानक या कादबरीच्या रूपाने मराठी वाचकाना सादर केले आहे. त्याबद्दल ते धन्यवादाला पात्र आहेत. □

**इनामदारांचा औरंगझेब**
कॉंटिनेंटल प्रकाशन,
विजयानगरकॉलनी, पुणे ३०
किंमत : पस्तीस रुपये

# आमचे ग्रंथालय

# My Story–

By Uri Geller
( Warner book
pages 287, 1·95 )

हे पुस्तक माझ्या वाचनालयात घेण्याच्या आधी युरी गेलरविषयी बरेच ऐकले व वाचले होते. स्टेनलेस स्टीलच्या चमच्याकडे नुसती नजर रोखून युरी गेलर तो वाकवीत असे. एकदा बऱ्याच मोटारीतील किल्ल्या युरी गेलरने psychokinesis ने वाकविल्या होत्या. ग्रीकमध्ये किनेसिस म्हणजे गती. सायकोकिनेसिस म्हणजे केवळ विचाराने ( विचारांच्या गतीने ) वस्तूवर किंवा घटनांवर काबू ठेवणे किंवा त्या बदलणे वगैरे. याआधी 'माणूस' मध्ये ल्याल वॅटसनच्या 'सुपरनेचर' या पुस्तकाचा परिचय करून देताना त्यात टेड सिरीयोस नावाचा वेटर कॅमेऱ्याच्या लेन्समध्ये बघून 'thought photographs' कशा रीतीने घडवून आणीत असे याचे वर्णन केले होते. हाही एक सायकोकिनेसिसचा प्रकार म्हणावा लागेल.

युरी गेलर याची अतींद्रिय शक्तीची चाचणी स्टॅनफोर्ड रीसर्च इन्स्टिटयूट, U C L A, कॅंट युनिव्हर्सिटी, बर्बेक कॉलेज युनिव्हर्सिटी ऑफ लंडन, फ्रान्समधील फॉक हॉस्पिटल लॅबोरेटरी, लॉरेन्स लीव्हरमोर रेडियेशन लॅबोरेटरी, यू. एस्. नॅव्हल ऑर्डनन्स लॅबोरेटरीज अशा अनेक नावाजलेल्या संस्थांत केली गेली होती. ही चाचणी घेताना अनेक नामवंत शास्त्रज्ञ हजर होते. तरी सुद्धा त्याना युरी गेलरच्या प्रयोगात कोणतीच हातचलाखी दिसून आली नाही.

एवढी अतींद्रिय शक्ती असलेला युरी गेलर श्रोत्यांपुढे जाताना नर्व्हस होत असे ! ही अतींद्रिय शक्ती युरी गेलर शाळेमध्ये असताना सुद्धा त्याच्याकडे होती आणि जेव्हा जेव्हा या अतींद्रिय शक्तीची प्रचीती येत असे तेव्हा तेव्हा गेलर स्वतः स्तिमित होत असे !

एखाद्या लोखंडी किल्लीवर युरी गेलर उलटा हात ठेवीत असे. त्यानंतर हात काढून घेत असे तरी किल्ली ४५ किंवा ९० अंशाच्या कोनाने आपोआप वाकडी होत असे. कधी कधी तर अर्धी किल्लीच वितळून जात असे.

एकदा तर टेक्सासमध्ये युरी गेलरची मुलाखत टेप करण्यात आली. त्याचे काम झाल्यावर गेलरने टेक्सास सोडले. यानंतर काही दिवसानी टेक्सास रेडियोवरून युरी गेलरची टेप केलेली मुलाखत चालविण्यात आली. टेक्सासच्या ॲटर्नी जनरलच्या ऑफिसमध्ये ३ कर्मचाऱ्याना ही रेडियोवर गेलरची टेप केलेली मुलाखत ऐकावी असे एका वकिलाने सुचविले आणि निव्वळ गमतीखातर त्या स्त्रियांनी ( मुलाखत चालू असताना ) टेबलावर चमचे, चाव्या व इतर वस्तू ठेवल्या. त्या स्त्रियानी त्या वस्तूवर आपले ध्यान केंद्रित केले होते. थोड्याच वेळाने आपोआप किल्लीचे दोन तुकडे झाले. चमचा ४५ च्या कोनाने वळला व पेपरक्लीप तर नाहीशीच झाली ! म्हणजे युरी गेलरच्या आवाजातच 'सायकोकिनेसिस' आहे !

यानतर ४ महिन्यानी B B C च्या स्टुडिओमध्ये युरी गेलर मुलाखत देत होता. त्या वेळी त्याला वाकविण्यासाठी एक किल्ली देण्यात आली. युरी गेलरने श्रोत्यांना सुचविले की, जे लोक हा कार्यक्रम ऐकत असतील त्यानी त्यांच्या घरी किल्ल्यांवर किंवा नादुरुस्त घड्याळावर त्याचे लक्ष केंद्रित करावे. हे सागून झाल्यावर युरी गेलरने त्याला दिलेल्या किल्लीवर हात ठेवून काढला आणि त्या कॉमेंटेटरच्या समोरच ती किल्ली वाकायला लागली ! कॉमेंटेटर एकदम ओरडायला लागला, 'अगदी माझ्या समोरच ही किल्ली वाकते आहे. या दृष्यावर माझा विश्वास बसत नाही ! ' त्याचा आवाज इंग्लंड, स्कॉटलड व आयर्लंडमध्ये ध्वनिक्षेपीत होत होता.

यानंतर B B C च्या कार्यालयात एकच गोंधळ उडाला. B B C चे संपूर्ण स्विचबोर्ड ख्रिसमसमधील झाडाप्रमाणे दिपून गेले.

इग्लंड, आयर्लंड, स्कॉटलंट व B B C चे ऑफीस यांच्यामध्ये एकच 'फोनाफोनी' सुरू झाली. लंडनच्या दूर व जवळ किल्ल्या, चमचे व खिळे वाकणे सुरू झाले. वर्षानुवर्षे खराब होऊन पडून राहिलेली घड्याळे सुरू झाली.

युरी गेलरला असे वाटले की, रेडियोवर बोलून अशा गोष्टी होतात तर TV वर डोळ्याने प्रत्यक्ष पहाता येत असल्यामुळे इतर लोकामधील अतींद्रिय शक्ति तो जास्त प्रमाणात जागृत करू शकेल.

जेव्हा त्याच्या TV वर प्रोग्रॅम चालू होता तेव्हा एक प्रख्यात गणिततज्ज्ञ प्रोफेसर टेलर (लंडन युनिव्हर्सिटीमधील) व बायोलॉजिस्ट डॉ. ल्याल वॅटसन (वॅटसनच्या दोन पुस्तकाचा परिचय माणूसमध्ये दिला आहे. Supernature व Romeo Error दि. २–४–७७) हजर होते. एका दुसऱ्या खोलीत हे दोघे व इतर लोक गेले व त्यांनी एक चित्र काढले व लिफाफ्यामध्ये बंद करून चिकटवून टाकले व गेलरजवळ आले. गेलरने डोळे बद केले व गेलरच्या कपाळाजवळ त्याला एक पडदा दिसला व त्या पडद्यावर त्याला एक (Sailboat) शिडाची नौका दिसली. त्या लिफाफ्यातही नौकेचेच चित्र होते.

नंतर टेबलावर काटेचमचे, तुटलेली घड्याळे, व किल्ल्या ठेवण्यात आल्या. गेलरने एका माणसाच्या हातातील एका चमच्याला हात लावला व तो चमचा दुमडला. नतर गेलरने तुटलेल्या घड्याळाकडे पाहिले व ती घड्याळे चालायला लागली. डॉ. ल्याल वॅटसनचे घड्याळ मात्र बद पडले व पूर्वीप्रमाणे एकच गोंधळ व 'फोनाफोनी' सुरू झाली.

दुसऱ्या दिवशी इंग्लंडमधील सर्व वर्तमानपत्रांनी ठळकपणे ही बातमी छापली.

Nature सारख्या नावाजलेल्या मासिकात गेलरबद्दलच्या स्टॅनफोर्ड रिसर्च इन्स्टिटयूट मधील प्रयोगाबद्दल माहिती दिली गेली. तेव्हा गेलरला वाटले आता तरी सर्वांना त्याच्या अतींद्रिय शक्तीबद्दल खात्री पटेल. कारण 'नेचर' हे सामान्य मासिक नव्हे. त्यात कोणतीही माहिती छापली गेली तर सारे जग त्याची दखल घेत असे.

परतु काही जादुगारानी असे सांगितले की, युरी गेलर जे चमत्कार करीत होता ते कोणत्याही चांगल्या जादुगाराला करणे शक्य

होते, म्हणजेच ती निव्वळ हातचलाखी होती. परंतु आर्टर झोरका (Chairman, Occult Investigations Committee, Georgia) याने शेवटी कबूल केले की, युरी गेलरने जे करून दाखविले व ते करताना जितक्या कडक चाचण्या घेतल्या गेल्या ते आम्ही करू शकणार नाही.

एकदा डॉ. वर्नेहर व्हॉन ब्रौन नावाच्या एका प्रख्यात शास्त्रज्ञाने त्याच्या तळहातावर एक जाड सोन्याची आंगठी ठेवली गेलरने त्याला हात सुद्धा लावला नाही. नुसते रोखून पाहिले मात्र आणि डॉ. वर्नेहर व्हॉन ब्रौनच्या हातातली आंगठी दबून अंड्या-सारखी झाली. या डॉक्टरकडे एक इलेक्ट्रिक कॅलक्युलेटर होते. ते बिघडले होते. डॉक्टर-साहेबाना वाटले त्यातील बॅटरीज संपल्या असतील, पण त्याच्या चिटणिसाने सांगितले की, बॅटरीज बरोबर आहेत गेलरने ते कॅलक्युलेटर थोडा वेळ हातात धरले व थोड्याच वेळात ते चालू झाले.

या पुस्तकात प्रख्यात पेटर साल्वॉडॉर डाली बरोबर युरी गेलरचा फोटो आहे. गेलरने चौफेर धम्माल उडवून दिली. इतर अनेक प्रख्यात व्यक्तींना गेलर भेटला.

पुस्तक लिहिण्यात परिपक्वपणा अजिबात आढळत नाही. या मुद्द्यावरून ल्याल वॅटसनने Supernature या पुस्तकात टेड सिरियॉसबद्दल लिहिलेले शब्द आठवतात. त्यात डॉ. वॅटसनने लिहिले आहे की, टेड सिरियॉस सुद्धा अगदीच immature होता. व वॅटसनने अपरिपक्वता व अतींद्रिय शक्ती यामध्ये काही संबंध आहे का अशी शंका उपस्थित केली होती टेड सिरियॉस हा गृहस्थ एक मद्यपी आहे व तो हॉटेल–पोर्टर होता. कॅमेऱ्याच्या लेन्समध्ये बघून तो thought photographs घेत असे हे मी डॉ. ल्याल वॅटसनच्या Supern ature या पुस्तकाचा परिचय करून देताना निदर्शनास आणले होते.

हे पुस्तक वाचण्याच्या आधी युरी गेलर फक्त काटेचमचे, चाव्या, खिळे वगैरे लोखंडी वस्तु वाकवितो असे वाचले, ऐकले होते; पण या पुस्तकात translocation बद्दल वाचले व चकितच झालो. एकदा युरी गेलर एंड्रीजा या इसमाबरोबर ऑसीनिग, न्यूयॉर्क येथे आला होता.

अँन्ड्रीजाचा एक काळ्या रंगाचा वॅलिंग्टन नावाचा कुत्रा होता. तो कुत्रा स्वयंपाक-घराच्या दारात एका क्षणी कापत उभा होता. दुसऱ्या क्षणी युरी गेलर आत आल्या-वर तो कुत्राच नाहीसा झाला ! आणखी २/४ सेकदांनी तो गेलर व अँन्ड्रीजाला लाब रस्त्यावर दिसला. कितीही जलद धावणारे प्राणी तेवढ्या वेळात एवढे लाब जाऊच शकले नसते. किंबहुना त्याला जातांनाच गेलरने व अँन्ड्रीजाने पाहिलेही नव्हते ! म्हणजे तो तिकडे translocate झाला होता !

या व अशा प्रसगांनी पुस्तक काठोकाठ भरले आहे. हे पुस्तक एखाद्या धंदेवाईक लेखकाकडून ghost write केले गेले असते तर जास्त रगले असते. अन्यथा युरी गेलरने एखाद्या खऱ्या ghost ला बोलावणे पाठिवले असते तर त्याने सुद्धा मदत केली असती !

–जे. एन्. पोंडा
–फिनिक्स लायब्ररी

---


**Some New Titles Received**

| | | |
|---|---|---|
| 1. | **Russians** – ( Bestseller )– Hedrick Smith | Rs 12·10 |
| 2. | **The Chinese Ultimatum** – ( Bestseller– Political thriller ) Robin moore & Edward Mcghee– | Rs. 18·35 |
| 3. | **The Boys From Brazil** – ( Bestseller– A Nazi scientist has a plan to clone many Hitlers ! – Novel )– Ira Levin | Rs. 18 35 |
| 4. | **Cockpit** – ( Besteller–Novel )– Jerzy Kosinski (Spy Story) | Rs. 21 35 |
| 5. | **Aspen** – ( Bestseller–Novel )– Burt Hirschfeld | Rs 18 35 |

**'फिनिक्स'ची वैशिष्ट्यें**

★ दीर्घ मुदतीच्या वर्गण्या भरून सभासद होता येते.
★ नॉन मेंबर्सना डेली बेसिसवर पुस्तके वाचावयास मिळतात.
★ पुस्तक किती दिवस ठेवावे असे बंधन नाही.
★ मागणी असलेल्या पुस्तकाच्या ५/६ कॉपीज् असतात. त्यामुळे सभासदाना चांगली चागली पुस्तकें लवकर लवकर मिळतात.
★ पुस्तकांसबंधीची दुर्मिळ माहिती, फोटो व परीक्षणे पुस्तकात चिकटविली जातात. त्यामुळे सभासदांना पुस्तकांसबंधीची बोनस माहिती मिळते.

**दि फिनिक्स लायब्ररी**
७२७ सदाशिव पेठ, पोस्टासमोर, पुणे ३०.

# मराठी सिनेमाची दुखणी

## जुन्या दुखण्यांवर नवी औषधे हवीत !

शिरीष सहस्रबुद्धे

'दगा' या मराठी चित्रपटाच्या निमित्तान त्याचे दिग्दर्शक श्री. वसतराव पेटर याची भेट झाली. तेव्हा त्या चित्रावर चर्चा झालीच, पण मराठी चित्रसृष्टीच्या नेहमीच्या आणि सर्वसाधारण असलेल्या काही दुखण्यावरही सविस्तर बोलणं झालं. या दुखण्यात नवीन असं काही नाही अनेकदा त्यावद्दल लिहिलं-बोलल गेल आहे फक्त चालू परिस्थितीच्या संदर्भात ती पुन्हा एकदा महत्त्वाची वाटली एवढच. चालू सदर्भ दोन प्रकारचा—एक : मराठी चित्रसृष्टीला जरा बरे दिवस आल्याच जे चित्र दिसत ते आणि दोन : निवडणुकानतर चित्रपट – सेन्सॉरशिपचे व इतरही निर्बंध सैल झाल्यानतरच वातावरण.

मराठी सिनेमावाल्याच्या अडचणी / तक्रारी खूप आहेत. नाना प्रकारच्या आहेत. मात्र 'दगा'चे निर्माते-दिग्दर्शक आणि वितरक याची मुख्य तक्रार आहे ती चित्रपरीक्षण-मंडळाबावत. आता सेन्सॉरविरुद्ध चित्रनिर्मात्याची तक्रार असण ही गोष्टही तशी काही नवीन नव्हे 'दगा' या चित्रपटाला सेन्सॉरन 'ए' सर्टिफिकेट बहाल केल तेव्हा त्याच्या निर्मात्या – दिग्दर्शकांना धक्काच बसला कारण आपल्या चित्रपटात सेन्सॉरला आक्षेपार्ह अस काही दिसेलस त्याच्या स्वप्नातही नव्हतं. 'सेन्सॉरबोर्डानेही आम्हाला नक्को आक्षेपार्ह काय आहे, ते सागायला नकार दिला. दिग्दर्शक वसत पेटर सागत होते, 'तुम्ही काही 'कट्स्' सुचवलेत तर आम्ही मान्य करू; पण आम्हाला 'यू' सर्टिफिकेट द्या' अशी विनती आम्ही त्याना केली; पण असा एखादाही निश्चित 'कट्' त्यानी सुचवला नाही. मग 'ए' सर्टिफिकेट का, तर सिनेमा एकदरीत फार भडक (loud) आहे असं मोघम कारण देण्यात आलं.' विशेष म्हणजे 'दिलेलं सर्टिफिकेट खुशीन स्वीकारीत असल्याची लेखी कबुली द्या 'अशी आणीबाणीत शोभलशी आज्ञाही सेन्सॉरबोर्डान सोडली अर्थातच 'दगा' च्या निर्माते-दिग्दर्शकानी ती मानली नाही आणि आम्ही 'ए' सर्टिफिकेट निषेधासह (under protest) नाइलाजाने स्वीकारले आहे, 'असा जबाबही दिला नियमाप्रमाणे आता त्यानी' चित्रपटाचं पुनर्परीक्षण करण्यात याव असं अपीलही केलं आहे तथापि ती वेळ घेणारी प्रक्रिया आहे आणि त्यातून निर्णय येईपर्यंत चित्रपटाच प्रदर्शन थाववण मराठी चित्रपटनिर्मात्याना शक्य नसत. 'दगा' च्या बाबतीतही तसच झाल जाहिरात अगोदरच झालेली, चित्रगृहाच्या तारखा बुक झालेल्या आणि मुख्य म्हणजे इतके दिवस घातलेले पैसे आणखी अडकवून ठेवण परवडण्यासारखं नसल्यान चित्रपट ठरल्यावेळी फक्त प्रौढासाठी प्रदर्शित करण्यात आला. 'मधुचद्र' या काही वर्षांपूर्वी गाजलेल्या चित्रपटाच्या बाबतीत अगदी असाच प्रकार घडला होता आणि शेवटी पाचव्या आठवड्यात चालू असताना त्याला 'यू' सर्टिफिकेट देण्याचा निर्णय सेन्सॉरनं दिला. 'दगा' वद्दलही असच काहीस घडेल अशी आशा सबधिताना आहे.

'दगा' वर भडकपणाचा जो शिक्का मारण्यात आला, तो मुख्यत: त्यातल्या हिंसाचारामुळे. मात्र चित्रपट पाहिल्यावर अस दिसत की त्यापेक्षा कित्येक पट जास्त आणि तीव्र हिंसाचार असलेले अनेक चित्रपट 'सर्वांसाठी' म्हणून उजळमाथ्यान मिरवताहेत. 'शोले' हे एक ठळक उदाहरण. विशेष म्हणजे 'दगा' काढण्याची प्रेरणा आपण 'शोले' सारखी यशस्वी सूडकथा पाहूनच घेतली, 'असं वसतराव पेंटर कबूलच करतात. ( मुळात ही काही फारशी आनददायक गोष्ट नव्हे 'शोले'ची प्रेरणा कुठून आपल्याला ठाऊक आहेच ) 'शोले' मधला हिंसाचार 'दगा'पेक्षा किती तरी गडद,ठळक, तपशीलवार आणि मोठ्या प्रमाणात आहे आणि तरीही 'शोले' सेन्सॉरच्या कात्रीतून 'यू' सर्टिफिकेटसह कसा निसटतो ?

वसत पेटर याना सेन्सॉरबोर्डाकडून या प्रश्नाची दोन उत्तर मिळाली. एक अधिकृत, एक अनधिकृत. अधिकृत अस की मराठी चित्रपटाचा विचार आम्ही महाराष्ट्राच्या मराठी सस्कृतीच्या पार्श्वभूमीवरून करतो हिंदी सिनेमाची तुलना नको आणि अनधिकृत अस की फक्त तुमच्या चित्रपटाबद्दल बोला. 'शोले'च नाव काढू नका. तो 'वरून' पास होऊन आला आहे. 'वर' जाण्याची ताकद अर्थातच 'दगा' च्या निर्मात्याकडे नव्हती, तेव्हा त्याना तक्रार करूनच गप्प बसावं लागल

इथे एक मतभेदाचा मुद्दा येतो 'हिंदी आणि मराठी चित्रपटाना सेन्सॉरन एकाच मापान मोजाव,' ही वसतराव पेटर याची मागणी व 'शोले– मधला हिंसाचार चालला तर आमच्या चित्रपटातला सौम्य हिंसाचारही चालवून घ्यावा', हा त्याचा युक्तिवाद शभर टक्के समर्थनीय वाटणं कठीण आहे. हिंदी आणि विदेशी चित्रपटानाही सेन्सॉर एकाच मापान मोजत नाही हे इथ लक्षात घ्यायलाच हव. हिंदी चित्रपट आणि प्रादेशिक चित्रपट याच्या परीक्षणाच्या कसोट्या सेन्सॉरन वेगवेगळ्या ठेवलेल्या आहेत आणि सेन्सॉरबोर्डाचीच नव्हे तर सपूर्ण सेन्सॉरशिपचीच आमूलाग्र पुनर्रचना होत नाही, तोपर्यंत सेन्सॉरकडून यापेक्षा वेगळ्या अपेक्षा करण चुकीच ठरेल. 'सेन्सॉरकडे अशा निश्चित व वेगवेगळ्या कसोट्या, मानदड नाहीतच' हा वसत पेंटर– अरविंद सामत द्वयीचा दावा वस्तुस्थितिनिदर्शक वाटत नाही या दृष्टीनं सेन्सॉरच माग उल्लेखिलेल अधिकृत उत्तर पटण्यासारख वाटत. एवढ मात्र नक्की की मराठीतल्या सर्व चित्रपटाना सारख्याच कसोट्या लावल्या गेल्या पाहिजेत. दोन मराठी चित्रातही डावं – उजव थोड्याफार प्रमाणात होत असल्याचा जो आरोप केला जातो ती निश्चितपणेच गभीर दखल घेण्याजोगा आहे.

मराठी चित्रनिर्मात्याचे इतरही आक्षेप

आहेतच.' एखादा चित्रपट आम्ही तयार करून सेन्सॉरकडे नेला म्हणजे आम्ही एखादा गुन्हा करून आलो आहोत, अशा प्रकारची वागणूक आम्हाला मिळते. सेन्सॉरचा पवित्रा शिकाऱ्याचा असतो आणि आम्ही सावजासारखे तावडीत सापडलो आहोत, असा आभास निर्माण होतो, ' हा श्री. पेंटर– सामत याच्या आक्षेपाचा साराश चित्रपरीक्षणमंडळाने चित्रकलावताना सहानुभूतिपूर्ण मार्गदर्शन करावं, फौजदारकी करू नये ही अपेक्षा रास्तच आहे आणि ती पुरी होत नसेल तर ही बाब चिंताजनक आहे. मराठी चित्रपरीक्षणमडळाचे सदस्य हे मराठी साहित्य–नाट्य–चित्रपट – समीक्षा इत्यादी क्षेत्रातील नामवतच असतात, ते मराठी चित्रनिर्मात्यांचे सरसकट वैरी आहेत असं मानण चुकीचं ठरेल. तरीही अशी तक्रार का उद्‌भवावी ?

मराठी सिनेमाची इतर दुखणी नेहमीचीच आहेत. भाडवल नाही ते जमवलं तरी तंत्रज्ञान कमी. तत्रज्ञ मिळवले तरी स्टुडिओ व यंत्र-सामुग्रीच दारिद्र्य. चित्रगृहाची चणचण. हे कोळसे ' दगा 'च्या निमित्तानं पुन्हा एकदा उगाळण्यात फारसा मतलब नव्हता. मात्र एक – दोन अडचणी नव्यान जाणवल्या, त्या माडाव्याशा वाटतात. एक : चांगल्या कथानकाचा अभाव आणि दोन : चागल्या समर्थ अभिनेते — अभिनेत्रींची उणीव. अर्थात या अडचणीकडे बोट करून मराठी चित्रपटकर्त्यांना आपले दोष फार काळ झाकता येतीलसं वाटत नाही. चागल्या कथा आताच का मिळेनाशा झाल्या ? मराठीत चागले लेखक– कथाकार संपले काय ? श्री. वसतराव पेंटर याना व इतर सबधिताना या आणि अशा प्रश्नाच्या बाबतीत वरील चर्चेत निरुत्तर व्हाव लागल हे नमूद केलच पाहिजे. खास सिनेमासाठी, चित्रानुकूल अशा कथा हिंदीतील दिग्दर्शकाना लिहून मिळतात तसा प्रयत्न मराठी चित्रनिर्माते– दिग्दर्शकानी कधी केला आहे काय ? नटनटीच्या शोधाचेही तेच नवे अभिनयनिपुण चेहरे मराठीत यावेत यासाठी मराठी सिनेमावाल्यानी काही पद्धतशीर प्रयास केले काय? किंवा डॉ श्रीराम लागू, अमोल पालेकर यासारखे हिंदी चित्रसृष्टी गाजविणारे मोहरे मराठीत यावेत यासाठी किती प्रयत्न झाले? जबरदस्त कथा व आव्हानात्मक भूमिका मिळाल्यास मराठी चित्रात जरूर काम करण्याचे आश्वासन डॉ. लागू – पालेकर यानी वारवार दिलेले नाही काय? ' उषा चव्हाण-शिवाय दुसरी कोणीही नायिका नजिकच्या काळात मराठीला उपलब्ध होण्याची शक्यता नाही, ' असा सूर लावताना मराठी नाटकात काम करणाऱ्यांपैकी अनेक समर्थ स्त्री–पुरुष ( विशेषत. स्त्री ) कलावत मराठी चित्रपटात का येत नाहीत याचा विचार मराठी सिनेनिर्मात्यानी केला आहे काय ?

मराठी सिनेमावाल्याना हवी असलेली सरकार व जनतेची सहानुभूति आज मिळते आहे आणि ती अधिक प्रमाणात मिळायला हवी आहे. पण त्यापूर्वी या आणि अशा प्रश्नांची उत्तरं त्याना समाधानकारकपणे सोडवावी लागतील. □


पूर्णिया

अनिल अवचट

किंमत : सहा रुपये

राजहंस प्रकाशन

पुणे ३०


# द गा

धाऊक प्रमाणावर दिलेला.

बाबा कदम याच्या या नावाच्या कादंबरीवर आधारलेला हा सप्तरंगी मराठी चित्रपट म्हणजे अनेकपदरी सूडकथेचा प्रवास. कथा बाबा कदमांची, तेव्हा नव्याने सागण्याच प्रयोजन नाही. खेडेगावातल्या मास्तरान ( अशोक सराफ ) गावपाटलावर व त्याच्या सग्यासोयऱ्यावर सूड घेण्याचा प्रयत्न करणं हा सूडकथेचा एक धागा, एक पदर; तर त्या प्रयत्नात अकारण दुखावल्या गेलेल्या नायकान– ' माया'न ( यशवत दत्त ) आपली आई, पाटील, धर्माशेठ आणि शेवटी मास्तर या सर्वांचा सूड घेण्याचा प्रयत्न करणं हा दुसरा पदर मायाच्या प्रेयसीच्या ( उषा चव्हाण ) मामामुळे उद्‌भवलेल्या कटकटी आणि त्यातून त्याचा झालेला खून हा आणखी उपपदर. ह्याचा विचार मूळ कथेपेक्षाही जास्त प्रमाणात करून दिग्दर्शक वसत पेंटर यानी कथेत जरूर ते बदल केले आहेत ते ऐकल्यामुळे चित्राच्या शेवटाबाबत उत्सुकता होती. तथापि सूडकथेतून अपरिहार्यपणे उद्‌भवणारा शोकात कायम ठेवण्यात आला आहे माया व अजू दोघाचाही मृत्यू पोलिसाच्या गोळ्यानी होतो, हा शेवट इथे अटळच होता अर्थात मायाने त्यापूर्वी अजूचा मामा, आपला मित्र मग्या आणि मास्तर अशा खलकपूचे मुडदे पाडलेले असतातच. मायाची बालमैत्रीण सुमनचा खून मास्तर करतो तो वेगळाच.

चित्रपटाची निर्मितिमूल्ये वरच्या दर्जाची आहेत सूडकथेला जरूर असणारे तणावाचे वातावरण दिग्दर्शक वसत पेंटर यानी यशस्वीपणे निर्माण केले आहेत आणि नायक यशवत दत्तन त्याना उत्तम साथ दिलेली आहे. यशवत दत्तनं भूमिका गभीरपणानं घेतल्याच व मनःपूर्वक आणि परिश्रमपूर्वक निभावल्याच जाणवत. मात्र चित्रपटाच गीत/सगीत सामान्य दर्जाच आहे. गाणी लक्षात राहण्याजोगी वा ठेवण्याजोगी नाहीत. चित्रपटाचा पूर्वार्ध कथेची / पात्राची तोडओळख करण्यातच खर्ची पडतो आणि तो निरर्थक नाचगाणी व पुनरावृत्त प्रेमप्रसंगामुळे अकारण लाबला आहे. उत्तरार्धात मात्र भावनिक तणाव व ॲक्शन यामुळे चित्र बरीच पकड घेतं. नायिका उषा चव्हाणलाही उत्तरार्धातच थोडाफार वाव मिळाला आहे. दुय्यम पात्रे ठीक. त्यातही अशोक सराफ. सूडकथा पूर्णतः वैयक्तिक पातळीवरच फिरत असल्याचे लक्षात घेऊन चित्रपट थोडा अधिक आटोपशीर व्हायला हवा होता.

□

'झालं, आमचाही एक जमाना होता, आम्ही तो गाजवला. आता नवे नवे चेहरे पुढे येतील'... ही निवृत्तीची भाषा या मुलीच्या तोंडी खरं तर शोभत नाही.

# आम्हीही म्हणू....एक होती जया भादुरी

वंदना शृंगारपुरे

एका पत्रकाराच्या घरी तिने जन्म घेतला. चारचौघीसारखीच लहानाची मोठी झाली मॅट्रिक झाल्यानतर मात्र मध्यमवर्गीय नियमानुसार आर्टकडेही गेली नाही की होमसायन्स शिकली नाही. अभिनय वगैरे शिकायचा स्वप्नाळू ध्यास तिने घेतला पुण्याच्या अभिनयशाळेत शिकताना ती कशी बसमधून हिंडत होती, मैत्रिणीबरोबर डेक्कनवर फिरत होती, साध्या शिलाईचे साधे स्कर्ट-ब्लाऊज घालीत होती या गोष्टीही आपण ऐकल्या आणि नतर एके दिवशी त्याच सस्थेच्या कुठल्याशा कार्यक्रमाला ती स्वतःच्या लाबलचक गाडीतून स्वतःची सेक्रेटरी, हेअरड्रेसर घेऊन कशी उतरली आणि प्राध्यापकाच्या मनोभावे पाया पडली त्या कथाही ऐकल्या. आता तीच एक हिंदी चित्रपटसृष्टीतली दतकथा बनून राहिली आहे

अभिनयाच्या पदविकेनतर तिला चित्रपटसृष्टीचे दरवाजे ठोठावणे वगैरे प्रक्रियेतून जावेच लागले नाही एक तर तिने त्याहीआधी जागतिक कीर्तीच्या रायबाबूच्या 'महानगर'मध्ये अभिनयाचा श्रीगणेशा केलेला होताच मुबईतही सर्वोत्तम दिग्दर्शक नायिकेभोवती फिरणाऱ्या दुर्मिळ कथा आणि तितकेच व्यावसायिक व कलात्मक यश तिच्या वाट्याला कसे सहजपणे आले. तिच्या पहिल्याच चित्रपटातून दिग्दर्शकाने प्रेक्षकापर्यंत सदेश पोचवला की बाळानो, ही फिल्मी दुनिया वेगळी आहे. नटनट्यांची लोकप्रियता क्षणभगुर आहे वगैरे. घरोघरचे पालक, पाल्याबरोबर तो चित्रपट पाहून आले आणि म्हणू लागले, 'अगदी बरोबर दाखवलय या सिनेमात अलीकडच्या मुलाचं नटनट्याचं वेड असच घालवळं पाहिजे' पण १५।१६ रीळ खर्चून दिग्दर्शकाने इतके सागितले त्याचा परिणाम काय झाला तर हिचा जमाना तिथूनच सुरू झाला तिची फॅन-मेल तिच्या सेक्रेटरीना आवरता येईना, सिनेसृष्टीत नवनवे उच्चाक घडविलेल्या राजेश खन्ना, लाटेत स्वतःचे स्थान तिने मिळवले हे विशेष लाब शेपट्याला एकाएकी केवढी प्रतिष्ठा प्राप्त झाली! दोन भुवयामध्ये बारीक कुंकू, प्रसाधनरहित चेहरा आणि नाजूक प्रिटच्या साड्या नेमलेल्या तिच्या घरगुती आवृत्त्या जिकडे तिकडे दिसू लागल्या. एरवी हिंदी सिनेमातल्या नटीशी identify होणे, म्हणजे सिमल्यात शिकणे, शेकडो रुपयांची प्रसाधने आणि कपडे यांचा नास करणे आणि वाढदिवसाला केक कापून गाणी म्हणणे तसे जडच जाणार आहे; पण हिच्या वावेतीत ते सामान्यातल्या सामान्य मुलीलाही सहज परवडणारे होते. आपली प्रिया, वधू, सून, मुलगी अशी साधी असावी, तिने असा अगभरून दोन्ही खाद्यावरून पदर घ्यावा असे हिला पहाणाऱ्या प्रत्येक प्रेक्षकमनाला वाटले. लहानथोरासकट सर्वांना इतके उदात्त वगैरे वाटायला लावणारी ही हिंदी नायिका अभूतपूर्वच म्हटली पाहिजे.

वयात येणाऱ्या प्रत्येक मुलीप्रमाणे तिनेही दिवास्वप्ने पाहिली असतील; पण फरक म्हणजे तिची सगळीच्या सगळी स्वप्ने जागेपणीही खरी ठरली. हिंदी सिनेमाला नामजूर असणारे—सुमार रूप, सुमार बाधा याच्यासह तिने त्याच सृष्टीवर अक्षरश: अंमल केले. राज्य केले चित्रपा देवर, राजिंदरसिग बेदीपासून इशारा, मनोजकुमारपर्यंतच्या सर्व दिग्दर्शकाच्या चित्रपटात हृषीकेशचीही नायिका गरजेची गोष्ट झाली. आजच्या व्यावसायिक हिंदी चित्रपटाचा अनाभिषिक्त नायक तिने प्रियकर, नवरा या दोन्ही भूमिकातून पटकावला हेही यश तसे या सृष्टीत दुर्मिळच. त्या जोडीला हिंदीतल्या एका थोर साहित्यिकाची ती सूनबाई झाली एक मुलगा एक मुलगी असे चौकोनी कुटुबही तिने पूर्ण केले ज्या त्या ढोलाने तिने जे ते मिळवले आणि हे सर्व कुठलाही भडकपणा व अप्रतिष्ठेशिवाय. तिच्या लग्नाच्या वार्तेने मैत्रिणीचे लग्न ठरल्याचा आनद झाला. हे इतके सुघटित आयुष्य ती जन्माला येतानाच त्या रुद कपाळावर लिहून घेऊन आली असावी अभिनयाची किती तरी लहानमोठी पारितोषिके तिने सहज मिळविली आणि आता निवृत्त झाली तीही तिच्या ग्रेसमध्येच. जिवाला चटका लावून अजून हिचे दहाबारा चित्रपट छान गेले असते असे प्रेक्षक म्हणत असतानाच तिने काम बद केले निवडणुकीच्या धुमश्चक्रीत तिच्या निवृत्तीची छोटीशी बातमी वाचली तेव्हा चक्क डोळ्याला पाणी आले. तिच्या अभिनयाप्रमाणेच निवृत्तीतही लोकानी हळहळावे इतकी क्षमता होती. एक होती मीनाकुमारी म्हणताना मीनाकुमारीचे अनेक चित्रपट, तिच्या दर्दभऱ्या आयुष्याच्या कथा, तिच्या कविता, तिची व्यसने याचे एक मतरलेले वातावरण आठवते. एक होती जयाभादुरी म्हणताना हातापायाची बोटेही जास्त होतील इतके चित्रपटच आठवावे लागतील आणि याशिवाय तिचे वैशिष्ट्य ठरलेली तिची पाच फूट उंची, लाब काळाभोर केसाचा शेपटा, मर्यादेबाहेर बोलके डोळे, बदलते मूड्स टिपणारी लवचिक जिवणी आणि मुक्त छदातले ते हसणे!

कपाळावर मध्यभागी एक आठी उमटवून, रुसक्या चेहऱ्याने धाकट्या भावडासह, कर्दनकाळ आजोबाशी टक्कर द्यायला एकदा ती निघाली, तर एकदा कॉलेजमधल्या एका

यडबंबू पोट्टयाबरोबर खंडाळचाला पळून जाऊन वर तू काळजी करू नकोस, मी नोकरी करीन असे मोठचा गभीरपणे सांगत बसली. अकाली गर्भपात झाल्यावर नवऱ्याच्या मिठीतही थंड कवडयांसारखे डोळे घेऊन कॅमेऱ्याला सामोरी गेली, तर पावसात मुलाचा अपघाती मृत्यू झाल्यावर, बोलता, ऐकता येत नसताना, ते दु.ख नुसत्या डोळचांतून सांगून गेली. असाध्य दुखण्यात मृत्यू समोर ठाकल्यावर आतून ढासळली, पण बाह्यत' हसून फिरसे बॅटरी चार्ज करनी पडेगी म्हणून सर्वांना रडवून गेली. टागोराच्या समाप्तीची नायिका होऊन झुल्यावर तिचे ते दुर्मिळ हसू हसत, काळयाभोर केसाचा पिसारा झुलवीत मृण्मयी बनली. इतकेच काय पण सज्जातून वाजाचे सूर ऐकताना ती कोवळी तरुण विधवा दग्ध डोळयातून आणि पांढऱ्या फडफडणाऱ्या साडीच्या माध्यमातून अर्धा डझन कलावतांच्या भाऊगर्दीतही आपली भावमुद्रा रसिकमनावर उमटवून गेली.

मुबईत नेमेचि होणाऱ्या नटनटयांच्या एका लुटुपुटूच्या क्रिकेटसामन्यात ती खेळली तेव्हा एका स्त्री पत्रकाराने लिहिले होते, 'सावळा मेकअप न केलेला तेलकट चेहरा, त्यावर मुरुमाचा एखादादुसरा फोडसुद्धा आणि एक घट्ट वेणी अशा अवतारात कोणी तरुण मुलगी आपला चेहरा आरशातसुद्धा पाहणार नाही, पण ही त्या अवतारात निवातपणे क्रिकेट खेळली हजारो प्रेक्षकाच्या नजरातले कौतुक झेलीत तिची हीच गोष्ट और होती. तिने कधी खोटचा, भडक, लडिवाळ पोजेस देऊन फोटो लपविले नाहीत, स्वस्त प्रसिद्धीशी हातमिळवणी केली नाही का कपडयाशी वा प्रसाधनाशी व्यावसायिक तडजोड केली नाही. त्यामुळे एखाद्या मान्यवर दिग्दर्शकाशी खटका उडाला तरी तो तिच्या व्यक्तिमत्त्वाचा एक विशेष बनला. भडक विधाने तिच्या मुलाखतीतून आम्हाला कधीच वाचायला मिळाली नाहीत पिवळचा पत्रकारितेचा ( yellow journalism )ला तर तिने सदैव विरोधच केला

तिचा अभिनय नावडणारेही काही कमी भेटले नाहीत. तिच्या हसण्याबोलण्यातल्या, अवखळपणा करण्यातल्या आणि प्रेम आणि क्रोध प्रकट करण्याच्या त्याचत्याचपणाचा निषेध अनेकानी अनेकदा केला; पण खरे तर कुणी त्या विरोधाला मनापासून उचलून धरलेच नाही तिचे तेचते पण इतके स्वयभू, निर्मळ आणि निर्भेळ होते की अखेरच्या चित्रपटापर्यंत ते हुवेहुवेसच राहणार तिच्या डिप्लोमा फिल्ममधली ती अल्लड, अनघा 'सुमन'च वेगवेगळचा रूपात या पंधरावीस चित्रपटांत भेटली; पण दर वेळी नवीच वाटली.

निवृत्तीनंतर दिलेल्या एका मुलाखतीत ही वेडाबाई ( बहुधा खोटयाच ) गंभीरपणाने म्हणाली, 'झाल, आमचाही एक जमाना होता तो आम्ही गाजवला. आता आम्ही विस्मृतीत जाऊ. नवे नवे चेहरे येतील.' तिच्या त्या आगाऊ प्रौढपणाची मोठी मजा वाटली. वये, तू तर अगदी पन्नाशीला पोचलेल्या चरित्रअभिनेत्रीच्या थाटात बोललीस. तू राहतीस तर आम्हाला हवीच होतीस; पण निवृत्त झाल्यानं जास्तच हवीहवीशी राहशील, स्मरणात राहशील. उगीच उतारवय झाल्यावर, तडजोडी करीत, नगण्य भूमिकातून 'मी अजून आहे'चा खोटा अट्टाहास करणारी तू पाहवलीच नसतीस. त्यापेक्षा हा चटका परवडला!

हिच्या नवऱ्यानेही आपल्या अभिनयात त्याचा प्रदेश दणाणून सोडलाय. त्याच्या यशाला हिच्या व्यक्तिमत्त्वाचा एक महत्त्वाचा पदर आहे हिच्या निवृत्तीनतर त्याने बिचाऱ्याने असख्य शिव्याशाप खाल्ले पक्का पक्षेसिव्ह आहे, 'तिची कला दाबून टाकतोय.' 'अगदी हिंदू नवरा आहे, तिने खरे म्हणजे पड खाऊन घरात बसू नये' असे स्त्री-स्वातंत्र्यवादी सूर सिनेपाक्षिकात उमटलेसुद्धा. तिचे आयुष्य एक सार्वजनिक आयुष्य झाल्यामुळे हे अपरिहार्यच होते; पण तिची निवृत्ती आता सर्वांनी कुरकुरत का होईना मान्य केली आहे आता फक्त ती सिनेमात पुन्हा येणार येणारच्या सिनेवाङमयाचा खप वाढवणाऱ्या अफवा ऐकायच्या, मॅटिनीला गर्दीत, उन्हात जाऊन तिचे चित्रपट पाहयचे, सटीसहामाशी कुठल्याशा फ्लॉवरशो किंवा बारीक कृतीच्या उद्घाटनावेळचे तिचे शात, सोज्ज्वळ फोटो पाहायचे आणि तिचे 'सामान्यत्व हेच तिचे असामान्यत्व होते' असली पुस्तकी पण शब्दशः खरी वाक्ये आठवत म्हणायचे, एक होती जयाभादुरी!

□

## समीक्षकाला अजून 'डोळा' मिळायचा आहे हेच खरे...

# मृणाल सेनचा 'मृगया' दुसरी प्रतिक्रिया

दिवाकर देशपांडे

आपल्या वर्षारंभ अंकातील (४ जून) 'मृगया' चित्रपटाचे समीक्षण वाचले. 'माणूस'-मध्ये सदर समीक्षकाने लिहिलेले माझ्या वाचनातील हे पहिलेच समीक्षण आहे. सदर समीक्षण खरोखरीच नवोदित असेल तर त्याला 'प्रोत्साहन' देण्याचा हा प्रामाणिक हेतू आहे; पण जर समीक्षक जुनाच असेल तर मी प्रोत्साहन देण्यासाठी म्हणून 'ठीक आहे,' 'बरे आहे,' असे गुळगुळीत शब्द न वापरता जरा कठोर शब्द वापरीन.

या ठिकाणी मी एक नमूद करू इच्छितो की, मी स्वतः जाणकार असल्याचा दावा करून हे लिहीत नाही; परतु चित्रपट पाहिल्यानतर जी त्याविषयीची जाणीव होते त्या अनुषगाने समीक्षणाची ही 'समीक्षा.'

आपले समीक्षक समीक्षणाची सुरुवातच मुळी, 'मिठु चक्रवर्ती आणि साधू मेहरचा देखणा अभिनय चित्रपटाला वाचवू शकत नाही...' अशी करतात.

आणि माझ्या मते समीक्षणाची मूळ गृहीत तत्त्वेच येथे चुकली आहेत सर्वसाधारणत. आपण चित्रपटाचे समीक्षण करताना अभिनयाला नेहमीच वरचा दर्जा देतो; पण मृगया चित्रपटात अभिनयाला एवढा वरचा दर्जा देऊन समीक्षण करणे योग्य नाही त्याचे कारण चित्रपटातील सर्वच नटमडळी जबरदस्त ताकदीची आहेत. त्याच्या अभिनयाची परस्पराशी तुलना होऊ शकत नाही बरे, अभिनयाची चर्चाच करावयाची होती तर मग सदर समीक्षकाने सर्वच नटाच्या अभिनयाविषयी बोलावयास हवे होते.

पण नायिका ममता शंकर, सावकार, इंग्रज अधिकारी आदीच्या भूमिका करणाऱ्या नटाच्या अभिनयाविषयी समीक्षणात साधा

उल्लेख नाही. या सर्वांचा अभिनय मिठू आणि साधूच्या तुलनेत यत्किंचितही उणा नव्हता. नक्षलवादी तरुणाची भूमिका केलेला समित भाजा थोड्या वेळात बराच प्रभाव टाकून जातो हेही आपल्या समीक्षकाने टिपलेले नाही. शेवटी हे समीक्षण म्हणजे वाचकांनाच विचारलेल्या दहा-पाच सवंग प्रश्नांची मालिका ठरते आणि माझ्यासारख्या समीक्षणे वाचून चित्रपटाला जाणाऱ्या सामान्य वाचकाची दिशाभूल होते.

समीक्षणात एके ठिकाणी म्हटले आहे की, मिठू चक्रवर्तीचं राजबिंडेपण मात्र त्याच्या या भूमिकेतला ठळक दोष आहे.

कमाल आहे, जंगलात राहून वाटेल तसे कष्ट घेणाऱ्या एका कलंदर तरुणाचे शरीर राजबिंडे असणार नाही तर कसे? किमान तो एक चित्ता मारणारा शिकारी वाटावा असे तर त्याचे शरीर हवेच. कदाचित समीक्षकाने हाणामारीची हिंदी चित्रपटे भरपूर पाहिल्यामुळे चित्ता मारणारा हिंदी 'हिरो' शशी कपूरसारखा नाजूक असला तरी चालेल असे त्याला वाटत असावे.

समीक्षणात एके ठिकाणी सवंगपणे म्हटले आहे की, आदिवासींची शेती, नृत्यं फिल्मस् डिव्हिजनच्या माहितीपटात शोभावीत अशी आहेत

समीक्षकाला असे वाटावे हाही परत अति (देमार) हिंदी सिनेमे पाहण्याचा परिणाम असावा आदिवासी नृत्ये ही आदवासी नृत्येच आहेत. फिल्मस् डिव्हिजनच्या लोकानी 'मृगया' सारखी आदिवासी नृत्ये चित्रित केली असतील तर तो त्यांचा ठळक असा गुण आहे कारण इतकी 'ओरिजनल' आदिवासी नृत्ये हिंदी सिनेमात पहावयास मिळतच नाहीत. उलट आदिवासी नृत्याच्या नावावर हिंदी सिनेमात ओंगळ व हिडिस शरीरप्रदर्शन करण्यात येते याची हजारो उदाहरणे आहेत आणि चित्रपटाची नायिका ममता शकर ही स्वत नृत्याची अभ्यासक व नर्तिका आहे ती प्रसिद्ध नर्तक उदयशकर यांची कन्या आहे याची समीक्षकाने नोद घ्यावी.

माझ्या मते ममता शकरसारखी नृत्यातली जाणकार नृत्यात कोणत्याही सवगपणा खपवून घेणार नाही, पण नृत्य समीक्षकाचे 'मन रिझविणारे' नसले तर ममता शकर आणि दिग्दर्शक मृणाल सेन यांचा काय दोष? त्यानी हे नृत्य 'मन रिझवण्यासाठी' टाकलेले नाही हे नृत्य कथावस्तूचा अपरिहार्य भाग आहे.

शेवटी नेहमीप्रमाणे प्रश्नाची सरबत्ती करून समीक्षकमहोदयानी विचारले आहे—'कोण हुतात्मा?'

'बायकोवर अत्याचार झाला म्हणून वैयक्तिक स्वार्थासाठी सावकाराचा बळी घेणारा आदिवासी?

'...साम्यवादी देशाला हौतात्म्याची ही नवी व्याख्या मानवण्यासारखी आहे काय?'

हे सर्वच्या सर्व प्रश्न समीक्षकाने विचारल्यास त्यास दोष तरी कसा द्यावा? कारण माणूस शेवटी किती पल्ल्याची दुर्बिण लावून वेध घेतो याला खरे महत्त्व आहे. समीक्षकांनी आपल्या 'कुवती' नुसार समीक्षण केले आहे.

अशाच प्रकारचे प्रश्न आपण अर्नेस्ट हेमिंग्वेला विचारू शकतो

'समुद्रात मासे मारता मारता हजारो कोळी मरतात. शेवटी एका म्हाताऱ्या कोळ्याच्या अशा मरणावर एवढी कादबरी? आणि तिला नोबेल पारितोषिक? छा!'

'ययातीच्या भोगवादाचे वर्णन करणाऱ्या 'ययाती' कादंबरीस ज्ञानपीठ—पुरस्कार?' असा प्रश्न आपण वि. स. खांडेकरांना करू शकतो.

पण जे या कलाकृतीचा खोलात जाऊन अभ्यास करतात ते असले प्रश्न विचारीत नाहीत.

'मृगया' ही एका चळवळीची कहाणी आहे. ग्रामीण भागात होणाऱ्या जागृतीची कहाणी आहे. चित्यासारख्या हिंस्र श्वापदाशी दोन हातांनी लढणारा ग्रामस्थ पिढ्यान पिढ्या सावकाराची गुलामी स्वीकारतो, निमूटपणे मान्य करतो; पण त्याच्यातही केव्हा तरी जागृती निर्माण होते व तो सावकाराची शिकार करतो.

तसा प्रत्येक क्रातीमागे स्वार्थच असतो, आपणास न्याय मिळावा, आपले शोषण टळावे हा दलितांचा स्वार्थच असतो; पण त्याचे स्वरूप व्यापक असते. हा स्वार्थ सामाजिक जाणिवेतून निर्माण होतो. असा स्वार्थ साधण्यासाठी वाट्टेल तो त्याग करण्याची तयारी असते. 'मृगया' हा सगुण स्वार्थ व दुर्गुण स्वार्थ सघर्ष आहे असे आपण सोप्या शब्दात म्हणू शकतो.

नायक शेवटी कोर्टात म्हणतो की, आमची पिके लुटणारी डुकरे मारली तर चालतात आमचे पोर पळवून नेणारा चित्ता मारला तर आमचे कौतुक होते, मग माझी बायको पळवून नेणारा 'सावकार' मारला तर मला 'फाशीची शिक्षा?'

हा प्रश्न क्षणभर सुन्न करणारा आहे गरिबाच्या होणाऱ्या हिंस्र शोषणाचे हे एक भेदक चित्रण आहे. प्रत्येक शिकारीस बक्षीस देणारा इग्रज साहेब या ठिकाणी अवाक् होतो. या शिकारीबद्दल तो त्या ग्रामीण तरुणास बक्षीस देऊ शकत नाही; पण कोर्टात साक्ष देताना तो त्यास दोष देण्यासही तयार होत नाही (या ठिकाणी खरे तर दिग्दर्शक ठळकपणे आपले अस्तित्व जाणवून देतो—ते जाणवले तर पाहिजे!)

आणि अशा शोषणाविरुद्ध लढताना प्राप्त झालेले ते हौतात्म्य आहे रशियासारख्या साम्यवादी देशालाही हौतात्म्याची व्याख्या मानवो अथवा न मानवो पण तुम्हा-आम्हाला ती मानवते का नाही हे महत्त्वाचे आहे. मृणाल सेन हा चित्रपट रशियात पाठवतात म्हणजे हे प्रश्न त्याना त्या देशाच्या लोकाना विचारायचे नाहीत. ज्यांच्यासाठी त्यानी हा चित्रपट तयार केला आहे त्या तुमच्यासारख्या समीक्षकाना आणि माझ्यासारख्या सामान्य प्रेक्षकास विचारावयाचा आहे आणि आपणास या प्रश्नावर विधायक व रचनात्मक उत्तर द्यावयाचे आहे.

चित्रपटनिर्मितीचा हेतू लक्षात घेता खरे तर इतर प्रश्न गौण ठरावेत, (हे माझे मत आहे) पण समीक्षणाच्या कसोट्या पाळण्यासाठी त्याच्या सर्वच अगावर चर्चा व्हावी तीही तशी झालेली नाही. (या उलट माणूसमधलीच 'चानी'ची समीक्षा करताना जाणीवपूर्वक तांत्रिक अंगाची व्यापक चर्चा झाली आहे. शातारामानी कथावस्तूशी (इतर दिग्दर्शकाच्या तुलनेत) जास्तीत जास्त प्रामाणिक राहण्याचा प्रयत्न केला आहे हे जरी समीक्षकाने मान्य केले नसले तरी ते समीक्षण अभ्यासपूर्ण होते)

'हा चित्रपट मृणाल सेनचा असावयास नको होता' असे एक वाक्य समीक्षकानी उगाचच फेकले आहे. त्याना हा चित्रपटदिग्दर्शक चाद किंवा फार तर शक्ती सामंत हृषीकेश मुखर्जी याचा असावा असे वाटते की काय?

मुळात इतक्या सयमाने कथावस्तू हाताळण्याचे सामर्थ्य असलेल्या मृणाल सेनच्या हातीच ही कथा लागली याबद्दल आपण 'परमेश्वराचे' आभार मानले पाहिजेत. अन्यथा चित्रपट कसा झाला असता याची कल्पनाच अति भयानक आहे.

असो. समिक्षकाना अजून 'चित्रपटाचा 'डोळा' मिळावयाचा आहे हेच खरे! □

# लेकिन बिहार जैसा था वैसाही रह गया : पृष्ठ ४ वरून

भांडवलशाहीच्या बाजूच्या कार्यक्रमाच्या विरुद्ध आम्ही घटनात्मक मार्गाने कसे झगडलो हे सागण्याचाच होता. यावरून आणीबाणीतील अत्याचाराबद्दलच्या आठवणी पटन्यातील नागरिकाच्या मनातून अजून पुसलेल्या नाहीत याची दखल कम्युनिस्टसुद्धा घेत होते हे सिद्ध झाले. परतु एका कामगाराला भाषणाबद्दल विचारल्यावर तो म्हणाला, 'अरे साब, ये सब पढावा है।' मग मला आठवले की आणीबाणी उठल्यानतर पुण्यातील माझे कम्युनिस्ट मित्रही मला हेच सागत होते. सूत्रबद्ध सैद्धातिक प्रचार होऊनही बिहारी जनमानसाची पकड या पक्षाला घेता येत नाही ही वस्तुस्थिती स्पष्ट होत होती.

जनतापक्षाच्या ज्या राष्ट्रीय नेत्याच्या सभा गाधी मैदानात झाल्या त्यास तुफान गर्दी असे. येथे जनता मन्त्र्याबद्दल व चद्रशेखर-बद्दल लोकाना काय अपील झाले असेल तर ते म्हणजे त्याची नम्रता १० तारखेला रात्री चौधरी चरणसिगाची सभा होती. येथील लोक चरणसिगाच्या नावाआधी 'चौधरी'चा आवर्जून उल्लेख करतात. त्यांची सभा ऐनवेळी रद्द झाली. तेव्हा मी एका फाटक्या अगाच्या आणि फाटक्या कपड्याच्या हातगाडीवाल्यास विचारले. तेव्हा तो उत्तरला, 'चौधरी चरणसिग को दिल्लीमे ठहरना पडता है, क्योकी वहाँ जट्टी साब है। वो कोई ऐसा वैसा काम न करे इसलिए चौधरी चरणसिग जैसा जबरदस्त आदमीही वहाँ चाहिए।' मला त्याचा 'जट्टी' हा शब्द कळला नाही. मी सरळ विचारले, 'भाई, ये ,जट्टी' क्या होता है?' त्याने माझ्याकडे हसून पाहिले आणि सागितले, 'आपको जट्टी मालूम नही? अपने प्रेसिडेन्ट जट्टी तो है न! उनकीही तो कानून अब बिहारमें चल रही है, उसको प्रेसि-डेन्शियल रूल कहते हैं।' या बिहारी अशिक्षित, गरीब श्रमिकाची राजकीय समज खरोखर वाखाणण्यासारखी आहे. बिहार आदोल-नाचा एक महत्त्वाचा परिणाम म्हणूनच अशी राजकीय समज वाढू शकली असे मला वाटते.

पटन्याच्या कापडबाजारामध्ये हिंडलो. तेथे एक राजस्थानी व्यापारी भेटला. तो नुकताच राजस्थानमधून आला होता. त्याचे गाव शिक्कर जिल्ह्यात आहे. त्याने तर सागितले की, 'जनता-लहर वहाँ बहुत तेज है। दो सौ सिटोमेंसे देड सौ सीट जनता पार्टीको मिल जाएँगे।' काँग्रेसचा प्रचार कसा काय आहे असे विचारल्यावर त्याने मोहनलाल सुखाडियाचे भाषणच सागितले. 'मी मद्रासहून येथे आलो तेव्हापासून मला काँग्रेसच्या पराभयाची (लोकसभा-निवडणुका) तीन कारणे दिसतात.' 'पहले तो शेडयूल कास्टने हमारी साथ दियी थी. लोकसभा इलेक्शनमे नही दियी। दूसरे मुसलमान लोगोंने भी हमारी साथ पिछले इलेक्शनमे छोड दी। तीसरा कारण है, जबरन नसबदी। यहाँ जबरन-नसबदीका जादा इस्तमाल हुआ, इसलिए कांग्रेसको पीछेहाट हुअी लेकिन तामिल-नाडुमें नही हुआ। इसलिए वहाँ कांग्रेस जीत गयी। वहाँ जबरदस्ती क्यो नही हुअी? वहाँ मैं था।' अशा तऱ्हेने स्वत ची व्यक्तिगत लोकप्रियता ते वाढवीत होते. येथून पुढे कांग्रेसच काय; पण कोण-ताही पक्ष सत्तेवर आला तर जबरदस्ती करू शकणार नाही असे ते म्हणताच सभेतील श्रोत्यांनी 'जयप्रकाश झिंदाबाद'च्या घोषणा दिल्या. जनता-सरकारवर मोहनलाल सुखाडिया जे आरोप करतात त्यातून कांग्रेस-मानस लक्षात येते. 'मोरारजीभाई तो बहुत पुराने लीडर है। मैं आपका आदर करता हूँ। लेकिन ऐसा कभी रेकॉर्ड नही है की मइ तक बजेट सादर नही किया। जनता पार्टीके सरकार २६ मई को बजेट सादर करनेवाले थे, लेकिन वो भी पोस्टपोन किया, उस वक्त मोरारजीभाईने कहा, 'इलेक्शन के बाद करेंगे।' क्यो? क्यो कि, उनको भी मालूम है, जनताको लहरसे यह सरकार बनी है, वैसो लहर इसबार नही आएगी। शायद उनका सरकार टिकेगा या नही ऐसी शका उनके मनमे है। तो भाईओ, देखो, हमही आपका स्थिर सरकार देनेवाले हैं।'

पटन्यातील कांग्रेसच्या २५ पासून ३००–४०० पर्यंत गर्दी अस-लेल्या सभेतही असाच प्रचार चालू आहे, परंतु तो लोकाना अपील होत नाही शहरी भागापेक्षा खेड्यातील लोक कांग्रेसच्या पुढाऱ्याना जास्त जागरूकतेने प्रश्न विचारतात प्रश्नाचे उत्तर न दिल्यास सभा उधळतात उत्तर बिहारमध्ये असे प्रकार प्रामुख्याने घडले मुजफरपूर जिल्ह्यातील एका खेड्यात कांग्रेसच्या पुढाऱ्याला एका शेतकऱ्याने सागितले, 'पहले दस हजार का बाड (बाँड) लिख दे दो और अपनी नसबदी का सर्टिफिकेट दिखाव तब एक व्होट मिल जाएगा।'

## जोशीजीके गॉववाले

९ जून! उद्या बिहारमधील १/३ उमेदवाराचे भाग्य मतपेटीत बंद होणार! बिहारमधील निवडणुकातील मतदान प्रत्यक्ष पाहण्या-साठी आज सारन जिल्ह्यातील काही मतदारसघाकडे निघालो छपरा हे सारन जिल्ह्याचे हेड क्वार्टर. प्रत्यक्षात 'सारन' नावाचे गाव या जिल्ह्यात अस्तित्वात नाही. गगानदीच्या 'उसपार' अस-लेल्या 'सोनपूर' या मतदारसघात फिरण्यासाठी महेंद्र घाटावरून स्टीमरने निघालो पहलेजा-घाट म्हणजे पटन्याच्या विरुद्ध किनाऱ्या-वरील स्टीमरचे स्टेशन. स्टीमर धक्क्याला लागण्यापूर्वीच लाँग जप, हाय जप वगैरेंचा वापर करून सुमारे ५०–६० हमाल अत्यत वेगाने स्टीमरमध्ये येताच स्टीमर थाबत आहे याची जाणीव उतारकरूंना येते. त्याचबरोबर इथल्या गरिबीची जाणीवही होते पहलेजा घाटा-जवळच 'खडका' (गंगाजल) हे छोटे खेडे आहे तेथे जनता पक्षाच्या कचेरीजवळ दोन कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची चालली होती. प्रकरण हातघाईवर येत होते मी ते सोडविण्याचा प्रयत्न केला निरवा-निरव झाल्यावर मी भाडणाचे कारण विचारले तर समजले, की त्यातील एकजण टी. सी होता व एक खडका गावचा मजूर या गावातील लोक स्टीमरचे कधीही तिकिट काढीत नाहीत कारण विचारले तर परवडत नाही असे साफ सागून टाकतात. अशाच एका मजुराला टी. सी ने अडविले होते. तेव्हा त्याने त्याला पुन्हा आमच्या गावात आल्यावर बघतो असा दम दिलेला होता. त्या वचनपूर्ती-साठी ही मारामारीची तयारी चालू होती.

खडकामधील छात्र सघर्ष समितीचा कार्यकर्ता देवव्रतसिग भेटला. त्याने सोनपूर मतदारसघातील माहिती पुरविली या क्षेत्रामध्ये सुमारे १ लाख १० हजार मतदार आहेत. त्यापैकी रजपूत ३९ हजार, यादव २८०००, मुसलमान १६०००, मागासवर्गीय २० हजार अशी जातीवार विभागणी आहे. जनतापक्षातर्फे उभे असलेले उमेदवार म्हणजे रामसुदर दास हे चमार जातीचे आहेत. त्याच्या विरुद्ध काँग्रेसऐवजी कम्युनिस्ट (CPI) उमेदवार धुरदरसिग उभे आहेत. रजपुताचे वर्चस्व असलेल्या या मतदारसंघात कम्युनिस्टानी रजपूत उमेदवार उभा केला तरी बहुताशी रजपूत कार्यकर्ते दास-जीच्या बाजूने काम करीत होते. याशिवाय दोन यादव व दोन रज-पूत असे चार अपक्ष उमेदवार उभे असल्याने या भागात जातीयतेचा कोष फोडून लोक पक्षीय दृष्टिकोनातून मतदान करतील असे वाटले. जातीयता या भागात कमी असण्याचे प्रमुख कारण शोधू गेल्यास अनेकाच्या मुलाखतीतून जे पी., बिहार आदोलन, आणीबाणीतील अत्याचार यातच ते असल्याचे बोलले जाते. आणीबाणीतील अत्या-चाराचा कळस या विभागात झालेला दिसून येत होता. गगानदीच्या काठावर गोळीबारात मेलेल्या मुलाची प्रेते वाहून आलेली येथील लोकानी पाहिलेली आहेत. एकाने तर सागितले की तीन किलोमीटर लांबीच्या भागात रक्तामुळे गगेचे पाणी लाल झाले होते। बिहारी

मनुष्य अत्यंत सहिष्णु असेच म्हणावे लागेल कारण बहुतेकजण 'गोळीबारात लहान लहान मुलांना मारल्याचे दुःख नाही, निदान प्रेते तरी ताब्यात द्यायची होती ' असे म्हणाले चौकशी केल्यावर समजले की पोलिसानी काही मुलाची प्रेते रेल्वे इजिनाच्या बॉयलरमध्ये फेकली होती त्याची राखसुद्धा मिळू शकली नाही, पण त्यामुळे लोकाच्या काळजाला जी घरे पडली ती अजून बुजलेली नाहीत, म्हणूनच येथे खेडयापाडयातील लोकानी मतदानाच्या बदोबस्तासाठी सुद्धा पोलिसाना येऊ दिले नाही गावातलेच ग्रामपचायतीचे रखवालदार हे काम करीत होते. नंतर सोनापूर या गावी गेलो दासजीना भेटलो त्यानी एस्. एम् जोशीच्या आठवणी सागितल्या 'बरबट्टा' नावाच्या खेडयात सुरेंद्रसिगच्या घरी मुक्कामास गेलो. तेथे तर काशीयात्रेवरून आलेल्यास जसे घरातील लहानथोर लोक नमस्कार करतात तसा आम्हाला नमस्कार करीत होते कारण विचारल्यावर सुरेंद्रसिग म्हणाला, 'आप जोशीजीके गाँववाले हैं इसलिए यहाँ के लोग प्रणाम करते है।' त्यानतर एस्. एम जोशी माझ्याकडे कसे आले होते, कोठे बसले होते, काय बोलले वगैरे आठवणी तो सागत होता दुसऱ्या दिवशी निरनिराळ्या बूथवर जेव्हा आम्ही हिंडत होतो तेव्हाही तो आपल्या मित्राना अगदी अभिमानाने सागत होता की 'ये जोशीजीके गांववाले है। पूनासे आये हैं, मेरे यहाँ ठहरे हैं।।

मणिकुमार सिह्न हा कार्यकर्ता जे पी. ना पिताजी तर एस् एम्. ना चाचाजी म्हणतो. त्याने पिताजी आणि चाचाजीच्या आठवणी सांगून रात्र संपविली. जे. पी. नी जेव्हा मोर्चा आयोजित केला तेव्हा स्टीमर, रेल्वे सर्व ठिकाणी चेक होता. तेव्हा गगाकाठावरून आदल्या दिवशी रात्री हजारो मुले नदी पार करून कशी गेली ते त्याने सागितले. पटन्यामध्येही गगाकाठावर पोलिसपहारा होताच. तो चुकविण्यासाठी एकाला ताटीवर झोपवून प्रेतयात्रेने अनेकजण मोर्चात पोहोचले होते त्या वेळी जानकी बहनने म्हटलेले गाणेही त्याने म्हणून दाखविले.

'जयप्रकाश की बिगुल बजी तो जाग उठी तरुणाई है।
चलो जवानो तिलक लगाने क्रांति द्वार पर आयी है॥

या गाण्यावर त्याने एक कॉमेंट केला, 'नेहरूके समय लता मगेशकरने एक गाना गाया था उसको जानकी बहनने ये गानेसे झूटा बना दिया!'

या मतदारसंघातील जनतापक्षाशी सामना करणारा कम्युनिस्ट उमेदवार असल्यामुळे कम्युनिस्टानी पटन्यात काढलेल्या मोर्चाबद्दल विचारले तेव्हा एका मोर्चात गेलेली बाई म्हणाली, 'मालीक कहखीन चले ले ल, त हम्मे चलली ओ! ( मालक म्हणाला मोर्चामध्ये चला! तुम्हाला काही तरी देऊ तेव्हा आम्ही मोर्चास गेलो. ) खाना नही देलखीन, भूखे मर रहीय!' ( परतु त्याने काहीच दिले नाही. आम्ही आज भूके मरत आहोत )

सोनपूर–जक्शनमध्ये काम करणारा कामगारवर्गही कम्युनिस्टाच्या विरुद्धच बोलत होता. रेल्वेसपातील गद्दारीची आठवण तो कम्युनिस्ट उमेदवारास करून देत होता. कम्युनिस्ट म्हटला की हिंसा असेही समीकरण येथील लोक करतात. एक जण म्हणाला, "व्होटिंगके समय देखो, जब उनकी हार सामने आती है तब वे हुल्लगुल्ला करते है!"

## जे. पीं. चा प्रभाव

१० जून रोजी बिहारमधील या खेड्यातील मतदारसंघात होणारे मतदान पाहिले. ७॥ वाजता सुरू होणाऱ्या मतदानासाठी सात वाजल्यापासूनच रागा लागलेल्या होत्या. स्त्रिया मात्र अत्यत दबत दबत येत होत्या. त्याना एकच भीती होती. ती म्हणजे दंगल होण्याची. दगल झाली तर आम्ही पळून कसे जायचे म्हणून चार–पाचच्या गटानी मतदानकेंद्राजवळ थाबून, गोंधळ होत नाही असे पाहून त्या मतदान करीत होत्या. एका बूथवर तर १४–१५ वर्षांचा मुलगा मतदानासाठी आला होता. त्याला शेवटी दम देऊन बाहेर काढण्यात आले; पण त्याचे लॉजिक तो स्पष्ट सागत होता. "लोकसभा-निवडणुकीमध्ये मी मतदान केले. आताच का नाकारता?" आणि कार्यकर्तेसुद्धा त्याला समजावीत होते, 'ओ टाइम अलग था।' एका बूथवर खुद्द मॅजिस्ट्रेटसाहेबानीच मतदान बद केले कारण काय तर लोक गडबड करतात, नीट रागा लावीत नाहीत वगैरे. प्रत्यक्षात बिहारचा माणूस मला तरी इतका गरीब वाटला की, एखाद्या सुशिक्षित माणसाने सागितलेले तो सरळपणे ऐकतो. तरी सुद्धा हे मॅजिस्ट्रेटसाहेब असे का वागले, याबद्दल मी विचारले. तर मला उत्तर मिळाले, 'वो, सी पी. आय. वाले हैं।'

मतदानापूर्वी आणि मतदानाच्या वेळी येथे जनता-लहर दिसत होती. शहरी भागातील उदासीनता पाहून आल्यावर हे चित्र एकदम वेगळे वाटते. 'दासजीचा विजय निश्चित' असेच ठामपणे सर्वजण सागत होते. या खेड्यापाड्याच्या क्षेत्रात रुजलेला जे पीं. चा सदेश आमच्यात कसा रुजविता येईल याचा विचार करीतच आम्ही पटन्यास परतलो.

दुसऱ्या दिवशी पटन्यातील वृत्तपत्रावरून बिहारमध्ये निवडणुकीच्या पहिल्या फेरीत गोळीबार, दंगली वगैरेंमुळे १० लोक ठार झाल्याचे समजले. देशभर या बातम्या ठळक मथळे व्यापतील प्रत्यक्षात बिहारी माणूस मात्र म्हणतो, हे मतदान अत्यत शाततेने पार पडले. इतक्या दिवस देशातील इतर भागात बातम्याही पोहचत नव्हत्या; पण यापेक्षा मोठ्या प्रमाणात हिंसा होत असे
□

बिहारचा हा निवडणूकदौरा संपवून निवडणुका पूर्ण होण्यापूर्वीच आम्ही परतीच्या प्रवासास लागलो. पटना स्टेशनवरच पुण्यातील एका यात्राकपनीचा डबा दिसला. महाराष्ट्रीय माणसाशी बोलावे म्हणून डब्यामध्ये बिहारच्या हकिकती सागितल्या येथील जनमानसातील जयप्रकाशजीबद्दलची आदरभावना सागितल्यानतर एक महाराष्ट्रीय म्हणाला, 'पण हेच बिहारी ५ वर्षांपूर्वी जे. पी. ना काय म्हणत होते हे माहीत आहे का? शेवटी काहीही होणार नाही, जे पी. इतक्या दिवस काय करीत होते' वगैरे नक्राश्रु ढाळणे सुरू झाले. त्याचा सिनिसिझम् पाहून बिहारी माणसाचा सरळपणा विशेष वाटला. बिहारी माणूस आज जरी राजकारणाबद्दल निराशेने बोलत असला तरी ५ वर्षांनी जनतापक्षालाही आम्ही हुसकावून लावू असेही बोलतो त्याच्यात सिनिसिझम दिसत नाही. राजकारणात नैतिक शक्तीचाही प्रभाव असतो यावर श्रद्धा ठेवण्याइतपत त्यांची आस्तिक्य बुद्धी जागृत आहे म्हणूनच आणीबाणीमध्ये इथले तरुण हे सारे बदलणार अशा विश्वासाने संघर्ष उभारीत होते. मला वाटते हाच खरा प्राण आहे. म्हणूनच जे. पी. ना येथील लोक देश की जान असे म्हणतात.

एक मात्र खटकले ते म्हणजे क्रांतिदूताची भूमिका करणाऱ्या बिहारी माणसाचे राहणीमान अजूनही खालावलेले आहे. १० वर्षांपूर्वी दुष्काळामध्ये काम करण्यासाठी मी बिहारमध्ये राहिलो होतो. त्या वेळचा बिहार आणि या वेळचा बिहार यात आर्थिक दृष्ट्या काहीच फरक दिसत नाही. १० वर्षांपूर्वीची बिहारी माणसाच्या तोडची लाचारीची भाषा मात्र बदललेली आहे हेच जे पीं. च्या आंदोलनाचे यश मानावे लागेल. यातच संपूर्ण क्रांतीची बीजे आहेत. जनता सरकार बिहारमध्ये आल्यावर ही बीजे रुजली पाहिजेत असा आशावाद सघर्षवाहिनीचे कार्यकर्ते सांगतात; परतु जर ही क्रांती येथेच संपली तर मात्र एका बिहारी माणसाने सांगितलेल्या ओळी खऱ्या ठरतील.

"सिद्धार्थ यहाँ आये, गौतम बुद्ध बने,
जिनेन्द्र यहाँ आये, महावीर बने,
गांधीजी यहाँ आये, महात्मा बने,
जॉर्ज यहाँ आये भी नहीं, मिनिस्टर बने,
लेकिन बिहार जैसा था वैसा ही रह गया।"

□

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

**२५।६।७७ ते १।७।७७**

### मेष : नोकरीत प्रमोशन

सध्या तुमची रास बरीच आघाडीवर आहे. केतू बारावा असला तरी त्यामुळे इतर ग्रहांचे सामर्थ्य कमी लेखू नका. राशीतच शुक्र आहे. मंगळासारखा सामर्थ्यवान ग्रह राशीस वजन देत आहे. सुखस्थानी शनी आहे. या वेळी प्रगती आणि यश तुमच्या सेवेला हात जोडून उभे राहणार आहे. मेष ही मंगळाच्या सामर्थ्याची रास आहे. त्यामुळे नोकरीत तुम्हाला प्रमोशन मिळून खूप दिवसांची इच्छा पुरी होणार आहे. या वेळी बेकाराना हमखास नोकरी मिळेल. आता दिलेली आश्वासने प्रत्यक्षात येतील. उद्योगासाठी अगर इतर कोणत्याही कारणासाठी पैसा कमी पडणार नाही. अनपेक्षित अर्थलाभ होईल. प्लॉट अगर फ्लॅट विकत घेणे सहज जमून जाईल. शुभ दिनांक २८–१.

**महिलांना :** अनेक दिवसाची इच्छा पुरी होईल.

**विद्यार्थ्यांना :** हुषारीने इतरांवर वजन माराल.

### वृषभ : पैशाची कामे होतील

आठवड्याशेवटी शुक्र पहिला होणार आहे. त्यानंतर सर्व अडचणी कमी होणार आहेत. रवि–बुधांसारखे दोन संपत्तिमान ग्रह धनस्थानी आहेत. त्यामुळे या वेळी आर्थिकदृष्ट्या हा आठवडा फारच प्रगतीचा जाईल. उद्योगात आजवर केलेले प्रयत्न या वेळी फल देणार आहेत राजकारण व सरकार या दोन्ही क्षेत्रांत तुमचे हितसंबंध जुळून येणार आहेत त्यामुळे आगामी काळात खूप फायदा होईल. अनेकाचे सहकार्य मिळेल, प्रकाशन, लेखन व इतर बौद्धिक क्षेत्रांत तुमचे कौशल्य कौतुकाचा विषय होईल. नोकरीच्या बाबतीत मागच्यापेक्षा हा आठवडा प्रगतीचा जाईल. बेकारांची व्यथा दूर होईल. कलावंताना समाधान मिळेल. प्रवास होईल. शुभ दिनाक २८–३०.

**महिलांना :** नोकरीत अधिकारप्राप्ती होईल.

**विद्यार्थ्यांना :** संगीतकलेचा अभ्यास होईल.

### मिथुन : खर्चावर बंधन ठेवा

शुक्र बारावा आहे. गुरू बारावा आहे. व्ययस्थानी ग्रह असले की, आर्थिक चणचण भासणे स्वाभाविक आहे. तुम्हाला इतर ग्रह उत्तम आहेत. रवि–शुक्र सहयोग तुमचे सार्वजनिक क्षेत्रातील वजन व प्रतिष्ठा वाढवणार आहेत. शब्दाला मोठेच वजन प्राप्त होणार आहे. नोकरीतील कार्यक्षमता वाढून कामाचा उरक चांगला होईल. रेंगाळलेली कामे मार्गी लागतील. लेखनात प्रगती होईल. कल्पना चागली उजळून निघेल लोकप्रियता वाढेल. कलावंतांना मागणी येईल धंद्यात प्रगतीचे नवे पर्व सुरू होईल. व्यापार सुधारेल. जुने येणे वसूल होईल. हाती घेतलेले काम पुरे होईल. स्वतंत्र धंदा सुरू करायला अनुकूलता आहे. बेकारी शिल्लक राहणार नाही. शुभ दिनाक २८–३०.

**महिलांना :** प्रगती व यश हाती येईल.

**विद्यार्थ्यांना :** नवीन आकर्षक बदल होईल.

### कर्क : नोकरीत ताण

बारावा बुध म्हणजे खर्चाची नवी नवी प्रकरणे अनपेक्षितपणे उभी राहाणे होय, तुमचा स्वभाव मुळातच खर्चाळू आहे. त्यामुळे तुम्ही या वेळी खर्चावर अधिक नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. कोणालाहि जामीन राहू नका. नोकरीत साधारण अनुकूल वातावरण राहाणार आहे. तरीपण कामाचा ताण फार पडणार आहे सहकारी गैरहजर अगर इतर कामाला गेल्यामुळे सहकाऱ्याचे काम करावे लागेल. विशेष करून ज्याची फिरतीची नोकरी आहे त्याना अधिकच ताण पडेल. बेकरांना मात्र काम मिळेल. अनेक दिवसाच्या आशाआकाक्षा सफल होतील. तब्येतीची फारशी काळजी नको जुना आजार असेल तर दूर होईल. जुन्या स्मृति आनद देतील. कौटुंबिक सुख मिळेल. शुभ दिनाक ३०–१.

**महिलांना** . मनाचा आनंद हातून चागले काही तरी घडवील.

**विद्यार्थ्यांना :** अभ्यासावर लक्ष केंद्रित करा.

### सिंह : अनपेक्षित यश

तुम्ही लोक सध्या बरेच खुषीत आहात आणि त्याचे कारण म्हणजे तुमचे ग्रह सध्या तुमच्यावर बरेच खूष आहेत. लाभस्थानी बसून रविने तुमचे आर्थिक बळ वाढवण्याचे ठरवले आहे तो तुम्हाला रेसमध्ये वा लॉटरीमध्ये मोठे यश देणार आहे. कर्ज काढले असेल तर ते बरेच कमी करण्यासारखी स्थिती आता तुम्हाला प्राप्त होणार आहे. नोकरीत आता तुम्ही मरेपर्यंत काळजी करू नका. तुमच्यावर मालक वा वरिष्ठ अधिकारी बेहद्द खूष राहाणार आहेत. या वेळी तुम्हाला जर तुमचे काही हित साधावयाचे असेल तर ते साधून घ्या. बेकारी सपून जीवनात नवे व्यावसायिक पर्व सुरू होईल. राजकारण व सार्वजनिक कार्य यात मात्र म्हणावे तेवढे यश येणार नाही. थोडी लोकप्रियता घटेलच. शुभ दिनांक ३०–१

**महिलांना :** माहेरवास, प्रसन्न वातारण लाभेल.

**विद्यार्थ्यांना** · हुषारीने सगळयाना खूष कराल.

### कन्या : आपुलकी मिळेल

भाग्यस्थानी गुरु, राशीत राहू व दशमात रवि अशी सर्व महत्त्वाच्या ग्रहाची सध्या तुमच्यावर बरीच कृपा आहे. त्यामुळे मनाची साशकता कमी होईल. शारीरिक सामर्थ्य व स्वास्थ्य मिळेल. विलंबाने का होईना ज्या ज्या क्षेत्रांत नवे प्रयत्न केले असतील त्या त्या क्षेत्रांत यश मिळणार आहे. गाठीभेटी होतील. व्यवहारी जगात चार पैसे मिळवू शकाल. लोकप्रियता वाढेल. वरिष्ठाच्या

मर्जीने काही काम होईल. अनेक दिवसाची अपेक्षा पूर्ण होईल. नोकरीत विराधकाचे मित्र होतील. कार्यक्षमतेवर वरिष्ठ खूष राहातील. मन प्रसन्न राहील. पैशाची काळजी राहाणार नाही. हातून सत्कार्य घडेल. प्रवासाचा बेत मात्र तहकूब करावा लागेल एकदरीत ग्रहमान ठीक आहे. शुभ दिनाक २८–३०

**महिलांना** सर्व प्रकारची काळजी दूर होईल

**विद्यार्थ्यांना** नवीन शालेय वातावरण आकर्षक ठरेल

### तूळ · प्रगतीचा मार्ग

रवी भाग्यस्थानी आला आहे हीच सध्या तरी तुमची फार मोठी जमेची बाजू आहे सध्या मगळ ससारात काही ना काही अडचणी निर्माण करण्याचा प्रयत्न करणार आहे; पण किरकोळ त्रासापलीकडे तुम्हाला त्याची फारशी झळ लागणार नाही आठवा गुरू फारसा अनुकूल नाही. तरी पण तो आर्थिक बाजू साभाळण्याचा प्रयत्न करणार आहे रेस व लॉटरीमध्ये लाभ होईल अनपेक्षित लाभ होईल लेखकांना लोकप्रियता लाभेल ग्रथ प्रकाशित होतील. राहू बारावा आहे, त्याची दखल घ्यावी. नोकरीत केव्हाही अकारण प्रतिकूल घडू शकेल हातून चुका होऊ देऊ नका पैशाचे व्यवहार काळजीपूर्वक करणे आवश्यक आहे बाकी सर्व ठीक. शुभ दिनाक २९–३०.

**महिलांना** नोकरीच्या दृष्टीने अनुकूलता राहील.

**विद्यार्थ्यांना** सहानुभूती भरपूर मिळेल.

### वृश्चिक : नोकरीत लाभ

अकरावा राहू ही तेवढी वाईट गोष्ट नाही. लाभस्थानी बसून राहू तुमची आर्थिक आघाडी भक्कम करण्याची कामगिरी करीत आहे तुम्ही रेसमध्ये तुमचे नशीब पाहू शकता. शेती, व्यापार, इजिनियरिंग उद्योग, स्टेशनरी, खते वगैरे धंदा फार तेजीत चालणार आहे. पडून राहिलेल्या मालास मागणी येईल तुम्ही जर खरेदी–विक्री करणार असाल तर त्यात लाभ होईल चालू नोकरीत बराच लाभ पदरात पडणार आहे. पगारवाढ मिळेल तुमचा प्रमोशनचा हक्क असेल तर तो तुम्हाला प्राप्त होईल. बेकारीची समस्या आता नाहीशी होईल. स्वतत्र उद्योगासाठी मदत वा नोकरी मिळेल आरोग्याची मात्र काळजी घ्या. प्रवास होईल शुभ दिनाक २९–३०

**महिलाना** : नोकरीची खूप दिवसाची इच्छा पुरी होईल

**विद्यार्थ्यांना** : डोके भडकून घेऊ नये

### धनु : लाभदायक

आठव्या शनीची तुम्ही आता मुळीच काळजी करू नका त्याची तुम्हाला भीती नको तो आता तुमचे काहीही वाईट करणार नाही राशिस्वामी गुरू मात्र अनुकूल नाही तो सहावा आहे गुप्त शत्रू उठाव करण्याचा सभव आहे त्याच्यावर डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवा सध्या तुमचे लक्ष राहूवर असू द्या तो तुम्हाला मदत करायला उत्सुक आहे. दहावा राहू ही चागली घटना आहे. दुय्यम धद्यात अनपेक्षित लाभ, चालू व्यापार तेजीत येऊन अनपेक्षित पैसा मिळणे, धद्याला बरकत येणे वगैरे घडणार आहे. प्रतिष्ठा, पैसा; मोठेपणा असे काही तरी घडणार आहे. नोकरीची आघाडी प्रगतीचा नवा टप्पा गाठील नवे पर्व सुरू होईल. जे होणे नाही असे वाटत होते तेच अनुकूल होईल प्रगतीच्या नव्या वाटा दृष्टिपथात येतील शुभ दिनाक २९–१.

**महिलांना** नोकरीत मोठेपणा मिळेल

**विद्यार्थ्यांना** : शैक्षणिक बदल उत्साह निर्माण करील.

### मकर : थोडे थाबा

मकर राशीच्या व्यक्तीना एकमेव राहू हाच तेवढा अनुकूल आहे रवी सहावा झाला आहे. तो विरोध पातळ करण्याचा प्रयत्न करील एवढेच, पण प्रत्यक्षात त्याचा उपयोग आज तरी काही होणे नाही. धदाव्यवसाय तसा व्यवस्थित चालेल त्यात अडथळा येणार नाही, परतु नवे काही घडणार नाही वरिष्ठाबरोबर असावे तेवढे सख्य राहणार नाही. त्यात तुम्हाला माघार घ्यावी लागणार आहे साधारण तडजोडीची भूमिका ठेवणे श्रेयस्कर होईल. कारण काळ बरा नसला म्हणजे माघार हीच मुत्सद्देगिरी ठरते तुमच्यासारखा माणूस 'वेळे'ची वाट पाहत बसेल यात शका नाही पैसा कमी पडणार नाही चालू नोकरीत एरवी ठीक. शुभ दिनाक २६–२९.

**महिलाना** अत्यत सावधगिरीने वागणे आवश्यक

**विद्यार्थ्यांना** तब्येतीची काळजी घ्या.


# पुरंदऱ्यांचा मरकारवाडा

लेखक
ब. मो पुरदरे

मूल्य : सात रुपये
राजहस प्रकाशन, पुणे ३०

**कुंभ : वनवास संपला**

पाचवा रवी ही एकच घटना तुमच्या बाबतीत एवढी सुखकारक आहे की, या वेळी ज्योतिषशास्त्रदृष्ट्या तरी तुमचा वनवास संपला आहे असेच समजायला हवे. नोकरीत सारे काही मनासारखे घडणार आहे. तुमच्याबद्दल वरिष्ठाच्या मनात जे गैरसमज होते ते आता दूर होणार आहेत. तुमच्या मागण्या मान्य होतील. तुम्हाला वरिष्ठ जागेची जबाबदारी स्वीकारावी लागेल. व्यापार तेजीत येणार आहे. जुना पडून राहिलेला माल विकला जाईल गुतून पडलेले पैसे मिळतील. शेअर्समध्ये लाभ होईल. रेस-मध्ये अपेक्षित यश मिळेल. आर्थिक बाजू भक्कम होईल. राजकारणात यश मिळेल वकिली व्यवसाय सुधारेल. बेकारांना चागले काम मिळेल. परदेशी प्रवासाची खूप दिवसाची इच्छा पुरी होईल. शुभ दिनाक २९-३०.

**महिलांना** : नोकरीत प्रमोशन-बढती मिळेल.

**विद्यार्थ्यांना** : नाविन्याचा आनंद मिळेल.

**मीन : आर्थिक प्राप्ती**

गेले काही दिवस तुम्हाला होत असलेला त्रास कमी होऊन तुमच्या जीवनात नवे पर्व सुरू होणार आहे आठवड्याच्या सुरवाती-लाच एखादी शुभ घटना घडणार असून ती तुमच्या भविष्यकालीन कर्तृत्वाची नादी ठरणार आहे. तुम्ही स्वतंत्र व्यवसाय करीत असाल तर तुमचा धंदा प्रगतीचा नवा टप्पा गाठणार आहे. नवे पर्व सुरू होणार आहे. प्रेससारखा धदा सुरू करीत असाल तर तो उत्तम प्रकारे लाभ देईल अनेकाचे सहकार्य मिळेल, नातेवाईक व मित्र याची मदत मिळेल मन उत्साही राहील. नोकरीत उत्तम प्रकारे तुमचे वजन बसणार आहे. वरिष्ठावर तुमचे वजन बसणार आहे. त्यामुळे त्याच्या मर्जीने तुमची कामे पार पडतील रेगाळत पडलेली कामे पार पडणार आहेत शुभ दिनाक २८-३०

**महिलांना** : अनेक बाबतीत मनोरथ पूर्ण होणार आहेत.

**विद्यार्थ्यांना** : अभ्यासात मोठे यश मिळणार आहे. ☐

**यंदाची महाराष्ट्र शासनाची पारितोषिके लाभलेली**

**दोन ‘ राजहंस ’ प्रकाशने**

# टॉलस्टॉय एक माणूस

**सुमती देवस्थळे**

# श्रीग्रामायन

**श्री. ग. माजगावकर**

**या दोन्ही पुस्तकांच्या नवीन आवृत्त्या लवकरच प्रकाशित होत आहेत.**